मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत**.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

नवभारत

वर्ष ५१ । अंक ९ । जून १९९



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नवभारत मासिकास
हार्दिक शुभेच्छा

सुमाशिल्प लि.

९३/५ अ, एरंडवणे, पुणे ४११ ००४
टेलिफोन : +९१-२१२-३७१३१२, ३७६७११, ३७८६९७, ३७९६१९,
फॅक्स : +९१-२१२-३७८७०४.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ५१ । अंक ९ । जून १९९८
ज्येष्ठ-आषाढ, शके १९२०
किंमत रु. १५/-
वार्षिक वर्गणी रु. १६०/-

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच, असे नाही.

*नवभारत*ची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक-मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

* *नवभारत*, ऑक्टोबर, १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

प्राज्ञपाठशाळामंडळ
अध्यक्ष व विश्वस्त :
मे.पुं. रेगे

संपादक :
वसंत पळशीकर

साहाय्यक संपादक :
अ.र. कुलकर्णी, एस्.डी. इनामदार,
अ.ना. ठाकूर

संपादकीय पत्रव्यवहार :
वसंत पळशीकर
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ,
वाई – ४१२ ८०३ (जि. सातारा).

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
श्री.ग. दीक्षित
व्यवस्थापक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ, ३१५ गंगापुरी,
वाई – ४१२ ८०३ (जि. सातारा)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाचा मंडळाच्या "नियतकालिकांचा स्थायी निधी" योजनेत समावेश केला असला तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच, असे नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नवभारत

अ नु क्र म

संपादकीय	**बौद्ध धम्माचे भारतातील भवितव्य** – मे.पुं. रेगे	तीन
लेख	**तंत्रज्ञान व्यवस्था आणि समाजाचे ऐकात्म्य साधणारी व्यवस्था** – केनेथ बुल्डिंग	१
	रणजित देसाई यांची *स्वामी* – आ.ना. पेडणेकर	१५
वाद-संवाद	**तत्त्वज्ञान आणि विज्ञान** – देवीदास वागूल	१९
ग्रंथ-समीक्षण	**तटस्थ इतिहासकाराची वस्तुनिष्ठ दृष्टी?** – वसंत पळशीकर	२१

मुखपृष्ठ : **सुजित पटवर्धन**

गौतम बुद्धांचे गुप्तकालीन (इ.स. ५००) आणि गांधारयुगीन (इ.स. ४००-५००) शिल्प, "आर्ट ट्रेझर्स ऑफ द वर्ल्ड", पॉल हॅम्लिन लंडन यावरून, स्नेहसदन, पुणे यांचे सौजन्याने. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे रेखाचित्र, चित्रकार : स्वर्गीय व्ही.एन. ओके, साधना साप्ताहिकाचे सौजन्याने.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

बौद्ध धम्माचे भारतातील भवितव्य

बौद्ध धम्माचा स्वीकार करा, 'मार्गदाता' असलेल्या बुद्धाने दाखवून दिलेल्या पथावरून वाटचाल करा, असे बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आवाहन अस्पृश्य मानल्या गेलेल्या जाती-जमातींना उद्देशून तर होतेच; पण ते विचारी हिंदूंना, किंबहुना सर्व विचारी माणसांना उद्देशून केलेले आवाहन होते. अस्पृश्यांच्या दृष्टीने हिंदू धर्म सोडून बौद्ध धम्मात केलेला प्रवेश हा त्यांच्या आत्मप्रतिष्ठेच्या प्रस्थापनाचा मार्ग होता. इतर माणसांचा माणूस म्हणून जो दर्जा आहे तो आमचाही आहे, माणसाला जे हक्क जन्मतः प्राप्त होतात असे मानण्यात येते ते आमचेही हक्क आहेत, ते सर्व आम्हांला प्राप्त झाले पाहिजेत असा आमचा दावा आहे, ही गोष्ट त्यांनी ह्या धर्मांतराद्वारे जाहीर केली. आत्मप्रतिष्ठेची ही प्रस्थापना जर फलद्रूप व्हायची असेल तर त्यांना नवीन सामाजिक अस्मिता (आयडेन्टिटी) धारण करणे आवश्यक होते. उच्च-नीच-भावावर आधारलेल्या हिंदू समाजातील जातिव्यवस्थेतील सर्वांत कनिष्ठ, अस्पृश्य जाती ही स्वतःची ओळख पूर्णपणे आणि कायमची पुसून टाकेल अशी ही नवीन अस्मिता असणे आवश्यक होते. जातिव्यवस्थेला धार्मिक आधार चातुर्वर्ण्याच्या संकल्पनेपासून लाभतो. बुद्धाने 'वर्ण' ह्या संकल्पनेचे प्रामाण्य स्पष्टपणे नाकारले होते. एखाद्या व्यक्तीला ती बौद्ध होण्यापूर्वी जर कोणतातरी वर्ण असेल तर बौद्ध धम्म स्वीकारल्या क्षणी तो समूळ गळून पडत असे. तेव्हा मी बौद्ध धम्मानुयायी आहे अशा स्वतःच्या स्वतःला आणि इतरांना करून दिलेल्या ओळखीमुळे मूळची जात धुऊन काढली जात असे; जातीमुळे वाट्याला येणाऱ्या अन्याय्य सामाजिक लांछनापासून मुक्त होता येत असे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी सुमारे दोन लाख महारांनी आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या समवेत बौद्ध धम्माचा समारंभपूर्वक आणि विधीपूर्वक स्वीकार केला. (त्यांच्या बरोबर आंबेडकरांच्या विचारप्रणालीवर कडवी निष्ठा असलेले काही सवर्णही होते.) त्या दिवसापासून जवळजवळ सर्व महार स्वतःला बौद्ध धम्मानुयायी मानू लागले; मग त्यांनी विधीपूर्वक बौद्ध धम्माचा स्वीकार केला असो, नसो. एका मोठ्या जमावाने-जमातीने हिंदू धर्म सोडून एका वेगळ्या धर्मात प्रवेश केला ही गोष्ट हिंदू समाजाला फारशी लागली असे दिसत नाही. ज्यांनी हे धर्मांतर केले त्यांनी एका वेगळ्या धार्मिक समाजात – बौद्ध समाजात – प्रवेश केला असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही; त्यांनी भारतात नव्याने बौद्ध समाजाची स्थापना केली असे म्हणणे अधिक योग्य होईल. अनेक शतकांच्या कालावधीनंतर भारतात बौद्ध समाज फिरून अस्तित्वात आला होता.

सामान्यपणे पाहता बौद्ध धम्माच्या ह्या पुनरुत्थानामुळे हिंदू समाज विचलित, रुष्ट झाला असे म्हणता येणार नाही. दुसरा लक्षणीय मुद्दा असा की, महाराष्ट्रातील इतर अस्पृश्य जातींनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला नाही. त्या हिंदू धर्माला चिकाटीने धरून राहिल्या. पुढील अनेक वर्षे अस्पृश्यतेचा पारंपरिक डाग आपल्याला चिकटलेला असेल ही कल्पना त्यांना असतानाही ते हिंदू राहिले. ह्याचे एक कारण असे असेल – हा केवळ माझा तर्क आहे – की, बौद्ध धम्माचा आपण स्वीकार केला तर आंबेडकर आपले सर्वोच्च नेते आहेत ही गोष्ट मान्य केल्यासारखे होईल असे त्यांना वाटले असेल आणि आपापल्या जातीचा अभिमान आणि इतर जातीविषयीची असूया ह्या गोष्टी आंबेडकरांचे अनुयायित्व स्वीकारण्याच्या आड आल्या असतील. शिवाय कनिष्ठ जातींचे हिंदू म्हणून आपले भवितव्य पूर्णपणे काळोखी, निराशाजनक आहे असे त्यांना वाटले नसेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि भारतीय राज्यघटना अंमलात आल्यानंतर जी लोकशाही राजवट अस्तित्वात येईल तिच्यात समाजातील मागासलेल्या, गरिबीने ग्रासलेल्या जातीजमातींसाठी सरकार मदतीचा हात पुढे करील, त्यांच्या सामाजिक प्रगतीसाठी, आर्थिक उन्नतीसाठी योजना कार्यान्वित करील आणि समताधिष्ठित समाजाच्या दिशेने देश वाटचाल करीत राहील असे आश्वासन त्यांना स्वातंत्र्यलढ्यातील लोकमान्य सेनानींकडून मिळाले होते आणि त्याच्यावर त्यांचा बहुधा विश्वास होता. अशा योजना जर निर्धाराने राबविण्यात आल्या तर जातिव्यवस्थेचे आपोआप हळूहळू विसर्जन होईल असा अनेकांचा विश्वास होता. अशा योजना पुरेशा निर्धाराने अंमलात आल्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नाहीत ही दुर्दैवी गोष्ट आहे.

महारांनी बौद्ध धम्म स्वीकारून केलेल्या सामूहिक धर्मांतराचा राग हिंदू समाजाला आला नाही त्याचे एक कारण असे की, हिंदू समाजाची विवेकबुद्धी तोपर्यंत जागी झाली होती आणि आपण शेकडो वर्षे अस्पृश्य जातींना किती अमानुष वागणूक देत आलो आहोत याचे भान त्यांना आले होते. १९ व्या शतकात, पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीय नेत्यांनी धार्मिक आणि सामाजिक सुधारणेसाठी जी वैचारिक आंदोलने उभारली होती त्यांचा हे मानसिक स्थित्यंतर घडवून आणण्यात काही वाटा होता. महात्मा जोतिबा फुले हे जातीच्या उतरंडीत बऱ्याचशा कनिष्ठ असलेल्या जातीत जन्माला आले होते. कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीतील लोकांनी – शूद्रांनी – संघटित व्हावे व ब्राह्मणी आधिपत्याविरुद्ध बंड करावे असा संदेश त्यांनी परिणामकारक रीतीने ह्या जातींना दिला, त्यांना सामाजिक आत्मविश्वास दिला. सामाजिक व राजकीय क्षेत्रात पुढाकार घेऊन समताधिष्ठित समाजव्यवस्थेच्या दिशेने प्रगती करण्यासाठी आवश्यक ते सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्यक्रम हाती घेऊन ते पार पाडण्याची ईर्ष्या त्यांच्या मनात जागी केली. आंबेडकरांनी जोतिबांना आपले एक गुरू मानले आहे. जोतिबांनी रचलेल्या पायावर त्यांनी आपल्या कार्याची उभारणी केली. पण त्यांनी, स्वाभाविकपणे, दलितांना संघटित करण्यावर, त्यांच्या गाऱ्हाण्यांना उग्र हुंकार देण्यावर, राजकीय जीवनात त्यांना बलिष्ठ स्थान प्राप्त करून देण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. गांधीजींनीही सवर्ण हिंदूंच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन केले. आपल्या बांधवांना, सह-मानवांना अस्पृश्य मानून त्यांनी मानवतेविरुद्ध पाप केले आहे, त्याचे निराकरण, त्याची भरपाई त्यांनी केली पाहिजे, ह्या पापाबद्दल त्यांनी प्रायश्चित्त घेतले पाहिजे ही शिकवण त्यांनी सवर्णांना सातत्याने दिली आणि हे प्रायश्चित्त कसे घ्यावे ह्याचे उदाहरणही स्वतः घालून दिले. ह्यातून आंबेडकरांच्या कार्याला त्यांच्याकडून साहाय्यच झाले. ह्यामुळे जेव्हा अस्पृश्यांच्या एका मोठ्या समाजाने आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बौद्ध धम्मात प्रवेश केला तेव्हा सवर्णांना त्याचे फार मोठे वैषम्य वाटले नाही. आपले बोलणे कसेही असले तरी प्रत्यक्षात अस्पृश्यांचे सामाजिक स्थान उंचावण्यासाठी आपण फारसे काही केलेले नाही, भविष्यात आपण त्यांना सर्वतोपरी समान मानू असे आश्वासन त्यांना लाभेल असे आपले वर्तन झालेले नाही ही आंतरिक जाणीव त्यांना होती. आणि तुम्ही आपले वर्तन लक्षणीय प्रमाणात बदलले नाही तर आपण हिंदू राहणार नाही अशी पुरेशी नोटीस आंबेडकरांनी त्यांना दिली होती.

पण आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेल्या धर्मपरिवर्तनाने हिंदू समाजाला धक्का बसला नाही ह्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण असे की, इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्म ह्यांच्यासारखा बौध्द धम्म परकीय धर्म आहे अशी भावना हिंदूंमध्ये नाही. जर आंबेडकरांनी इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्म स्वीकारला असता तर धरणीकंप व्हावा तसा धक्का हिंदू समाजाला बसला असता. त्याचे काय परिणाम झाले असते ह्याचे निदान करणे सोपे नाही. बौद्ध धम्माचा स्वीकार करताना हा विचार आंबेडकरांच्या मनात क्षणभरही आला असेल असे मला सुचवायचे नाही. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या वर्षांत, औपचारिकपणे बौद्ध धम्माचा स्वीकार करण्याच्या फार पूर्वी ते मनाने बौद्ध झाले होते. बुद्धाच्या शिकवणीचे जे सार आहे ते सत्य आहे आणि मानवाला अत्यंत उपकारक आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता.

बौद्ध धम्म आणि सर्वसामान्य लोकांत पसरलेला हिंदू धर्म ह्यांच्यामधील नाते दुभंगलेले (ambivalent) आहे. एकत्र कुटुंबातील चुलत भावंडांत असावे तसे ते आहे. त्यांच्यात आपलेपणाचे आणि परकेपणाचे विचित्र मिश्रण आहे. उच्च वैदिक, श्रौतस्मार्त विचारधारा घेतली तर तिच्या दृष्टीने बौद्धमत पाखंडी आहे कारण ते वेदांचे प्रामाण्य अमान्य करते. सामान्यपणे हिंदूंमध्ये वेदांविषयी अत्यंत पूज्यभाव आढळतो. आपल्या धार्मिक श्रद्धेचे, आचरणाचे वेद हे उगमस्थान आहे असे ते मानतात. पण हे एक कल्पित (fiction) आहे. बहुसंख्य हिंदू घेतले तर वेदांचा आशय काय आहे ह्याची काहीही कल्पना त्यांना नसते. वैदिक श्रौतस्मार्त परंपरा ब्राह्मणांपुरती मर्यादित आहे आणि आज तिचे स्वरूप अत्यंत क्षीण आहे. बहुसंख्य ब्राह्मणांनी श्रौत-स्मार्त संस्कार, विधी सोडून दिले आहेत; त्यांच्या ब्राह्मण्याला आज धार्मिक आधार राहिलेलाच नाही. लोकांत पसरलेला जो हिंदू धर्म आहे तो म्हणजे अनेक देवदेवतांची – कौटुंबिक, स्थानिक, पौराणिक देवदेवतांची – उपासना करणाऱ्या पंथांचे एक मोठे कोंडाळे आहे. त्यांच्या देवदेवतांविषयीच्या कल्पना, विधी, उपासनेची तंत्रे इ. गोष्टींचा वेदांशी काही संबंध नाही. आगमग्रंथ, पुराणे ह्यांच्यावर त्या आधारलेल्या आहेत आणि हे वेदांहून स्वतंत्र असलेले ग्रंथ आहेत. तथापि जेव्हा ह्या सिद्धान्तांना

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

दार्शनिक, तत्त्वज्ञानात्मक रूप देण्यात येते तेव्हा वैदिक उपनिषदांपासून ते निष्पन्न होतात असा प्रयत्न अनेकदा करण्यात येतो. वैष्णवपंथ हा असाच एक संख्येने मोठा आणि प्रभावी असलेला पंथ आहे. त्याच्या दृष्टीने बुद्ध हा विष्णूचा, वैष्णवांच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ असलेल्या देवाचा, पुरुषोत्तमाचा अवतार आहे. प्रसिद्ध वैष्णव कवी जयदेव बुद्धाच्या अवतारकार्याचे वर्णन करताना म्हणतो की, वेदांनी सांगितलेल्या यज्ञांत पशूंची हत्या होते; सदय हृदयाच्या बुद्धाने हे घडताना पाहिले आणि अशा यज्ञांचा धिक्कार केला. ह्यासाठी विष्णूने (हरीने) बुद्धावतार धारण केला.

निन्दसि यज्ञविधेः अहह श्रुतिजातं
सदयहृदयदर्शित पशुघातम्
केशव धृतबुद्धशरीर।

पंढरपूरचे विठ्ठलाचे मंदिर हे महाराष्ट्रातील एक अत्यंत पवित्र मंदिर आहे आणि श्रीविठ्ठल हा बुद्ध आहे. धर्मकार्याचा संकल्प सोडताना आज आपण बौद्धावताराच्या कालखंडात जगत आहोत असे म्हटले जाते.

जर आपण 'उच्च' वेदान्ती परंपरेकडे वळलो तर माध्यमिक बौद्धांचे शून्य आणि शंकराचार्यांनी स्वीकारलेले, मन आणि वाचा ह्यांच्या पलीकडे असलेले ब्रह्म यांच्यांत फारसा भेद नाही असे दिसून येते. शंकराचार्य हे प्रच्छन्न बौद्ध आहेत अशी इतर वेदान्तीमतांनी त्यांच्यावर टीका केली आहे हे प्रसिद्ध आहे. प्रज्ञा, मैत्री, करुणा, मुदिता (इतरांच्या आनंदात आनंद मानणे), उपेक्षा (इतर आपल्याला कसे वागवितात ह्याविषयीचा निर्विकारपणा) हे सद्‌गुण आपल्या चित्तात वाणवावे असा बुद्धाचा उपदेश होता आणि बौद्ध भिक्षू ह्या नैतिक गुणांची साधना आपल्या जीवनात करीत असतात. बुद्धाच्या प्रभावामुळे वैदिक परंपरेने हे सद्‌गुण आत्मसात केले आणि साधारण धर्म हे अभिधान त्यांना दिले : अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच (शुचिता) आणि इंद्रियनिग्रह हे साधारण धर्म आहेत. बहुनिन्दित मनुस्मृतीमध्ये जे साधारणधर्म सांगितलेले आहेत ते असे : धृति (संतोष), क्षमा, दम, अस्तेय, शौच, इंद्रियनिग्रह, धी (शास्त्रांचे यथार्थ ज्ञान), विद्या (आत्मज्ञान), सत्य, अक्रोध. साधारणधर्म हे सर्व वर्णांच्या व्यक्तींना प्रमाण आहेत. मानवी जीवनाची जी कोंडी आहे तिच्या स्वरूपाचे आणि तिच्यापासून लाभू शकणाऱ्या मुक्तीचे वर्णन करण्यासाठी बौद्ध आणि अद्वैती ज्या संकल्पना वापरतात आणि मुक्ती साधण्यासाठी जी साधना ते करतात त्यांच्यांत फारसा भेद नाही. जो भेद आहे तो असा की, बौद्ध भिक्षू यासाठी बुद्धाच्या शिकवणीचा आधार घेतात तर वैदिक संन्यासी आपली साधना उपनिषदांत प्रकट झालेल्या ज्ञानावर आधारलेली आहे असे मानतात. हिंदू आणि मुस्लिम समाजात ऐतिहासिक आणि सैद्धान्तिक वितुष्ट चालत आलेले आहे. (त्याचे निराकरण करण्याचे प्रयत्नही झालेले आहेत.) हिंदू आणि ख्रिस्ती समाजांमध्येही असे वितुष्ट अधिक सूक्ष्म स्वरूपात आहे. पण हिंदू आणि बौद्ध समाजात असे वितुष्ट असण्याचे ऐतिहासिक किंवा सैद्धान्तिक कारण नाही. उलट, मला धोका दिसतो तो असा की, कालान्तराने बौद्ध समाजाला हिंदू समाजातील एक जात असे स्थान व स्वरूप प्राप्त होईल. माझी अशी कल्पना आहे की, आंबेडकरांनी बौद्ध सिद्धान्तांचा व जीवनमार्गाचा गाभा काय आहे ह्याचे आपल्या *बुद्ध आणि त्याचा धम्म* ह्या ग्रंथात जे काळजीपूर्वक विश्लेषण केले आहे त्याचे एक कारण अशी भीती त्यांना वाटत होती हे असेल. अर्थात् हे ह्या ग्रंथरचनेचे एकमेव कारण नाही.

१९३० च्या सुमाराला भारतीय अस्पृश्य जमातींचे राष्ट्रीय स्तरावरील सर्वश्रेष्ठ पुढारी म्हणून आंबेडकरांचा उदय झाला. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ असावेत ह्या मागणीच्या संदर्भात गांधीजींसारख्या नेत्याशी त्यांनी जो संघर्ष केला त्यातून त्यांचे अखिल भारतीय स्तरावरील नेतृत्व सिद्ध झाले. त्यावेळी त्यांचे अनुयायित्व स्वीकारणारा जनसमूह हा प्रामुख्याने महार समाजापुरता मर्यादित राहिला. पण स्वातंत्र्यानंतरच्या अर्ध-शतकात भारतभरच्या सर्व अस्पृश्य जातीजमातींचा, त्यांना सामाजिक दास्यापासून मुक्त करणारा प्रेपितसमान महान नेता हे स्थान त्यांना प्राप्त झाले आहे. अस्पृश्यांचे (दलितांचे) ठिकठिकाणचे स्थानिक नेते त्यांचे अनुयायित्व अंतःस्फूर्तीने स्वीकारतात. पण हे नेते आणि त्यांचे अनुयायी आंबेडकरांचे धर्मांतराचे आंदोलन पुढे चालवीत आहेत, बौद्ध धम्माचा स्वीकार करून त्याचा आपल्या अनुयायांत प्रसार करीत आहेत असे दिसत नाही. त्यांचा भर राजकीय सत्ता आणि सामाजिक-आर्थिक उद्दिष्टे साधण्यावर आहे. राजकीय सत्तेत सहभागी होऊन शासकीय यंत्रणेवर काबू मिळविणे आणि या मार्गाने दलितांच्या सामाजिक-आर्थिक मागण्या पदरात पाडून घेणे हा मार्ग ते चोखाळीत आहेत. ह्यात गैर असे काहीच नाही. पण निवडणुका जिंकणे हा स्पर्धात्मक खेळ आहे आणि ह्या खेळात

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

काही जातींचा एकमुखी पाठिंवा लाभणे, एका जातीचे सदस्य म्हणून लोकांची आपल्या जातीवर जी निष्ठा असते ती आकर्पून घेणे फायद्याचे असते. निवडणुकीच्या राजकारणामुळे जाती क्षीण होण्याऐवजी दृढ होतात. बौद्ध धम्मावर आधारलेला, जातीपातीपासून मुक्त असलेला समतावादी भारतीय समाज निर्माण करण्याचे आंबेडकरांचे स्वप्न विरल्यासारखे झाले आहे.

मात्र महाराष्ट्रात बौद्ध धम्म स्थिरावला आहे. दलितांनी प्रारंभी जरी बौद्ध धम्म औपचारिकपणे स्वीकारला असला तरी ते हळूहळू समग्र बौद्ध तत्त्वज्ञानात्मक आणि आध्यात्मिक परंपरा आत्मसात करतील – विशेपतः महायान बौद्ध पंथाची – आणि मनाने व अंतःकरणाने बौद्ध बनतील अशी चिन्हे आहेत. हे जर घडून आले तर आंबेडकरांनी *बुद्ध आणि त्याचा धम्म* ह्या ग्रंथात जी भूमिका मांडली आहे तिच्या पलीकडे ते जातील. कारण ह्या ग्रंथातील आंबेडकरांची भूमिका पारंपरिक बौद्धमताच्या काहीशी अलीकडे स्थिरावली आहे. आंबेडकरांच्या भूमिकेप्रमाणे धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म. पण धम्म असलेली ही नीती पवित्र असली पाहिजे. ह्या संदर्भात पवित्र ह्याचा अर्थ 'अतीत' (transcendent) असाच होऊ शकतो. नीती ह्या अतीताकडे झेपावत असते आणि अतीतात रुजलेली असते. हे अतीततत्त्व म्हणजे ईश्वर किंवा ब्रह्म असे मानायचे कारण नाही. जी ह्या लोकात, ह्या जीवनात प्राप्त करून घेता येते अशी चित्ताची अवस्था ती असू शकेल. पण ती सर्व प्रकारच्या ऐहिक साफल्यापलीकडे जाणारी, जिच्यात व्यक्तीच्या पृथक् व्यक्तिमत्त्वाचा लोप झालेला असतो आणि जीवमात्राविषयीच्या एकात्मतेच्या भावनेने अंतकरण भरून गेलेले असते अशी ती अवस्था असेल. ही निर्वाणाची अवस्था हे जर माणसाचे परमसाध्य असेल तर मानवी प्रकृतीचे समग्र स्वरूप काय आहे आणि माणसाचा विश्वाशी संबंध काय आहे ह्याविपयीचे काही दार्शनिक (तत्त्वज्ञानात्मक) सिद्धान्त त्यात – निर्वाण हे माणसाचे परमसाध्य असण्यात – अभिप्रेत असणार. बौद्ध दार्शनिक परंपरेत ह्याविपयी खूप खोल विचार झाला आहे. हा वारसा नवबौद्ध आत्मसात करतील आणि त्याचा विकासही करतील अशी माझी खात्री आहे. बौद्ध वारसा अशा रीतीने जतन करणारा बौद्ध समाज हिंदू समाजाच्या निकट असणे हे हिंदू समाजालाही लाभदायक ठरेल.

मे.पुं. रेगे

लेखक-परिचय

❖ **देवीदास बागूल** : मराठी साहित्याचे व्यासंगी अभ्यासक व लेखक; ललित कलांचे जाणकार समीक्षक; नामवंत छायाचित्रकार; पुस्तकांची मुखपृष्ठे व मजकूर यांच्या मांडणीच्या विपयात वैशिष्ट्यपूर्ण कार्य. **पत्ता** : ६५/२० कृतांजली अपार्टमेंटस्, एरंडवणे, पुणे ४११ ००४.

❖ **आ.ना. पेडणेकर** : इंग्रजीचे निवृत्त प्राध्यापक; लघुकथाकार, कवी व समीक्षक; टॉलस्टॉय यांच्या *वॉर अँड पीस* या अक्षर वाङ्मयकृतीचे संक्षिप्त भापांतर *युद्ध आणि शांती* प्रसिद्ध. **पत्ता** : ६ अनुपमप्रभा, अमरसी रोड, मालाड (प.). मुंबई ४०० ०६४.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तंत्रज्ञान व्यवस्था आणि समाजाचे ऐकात्म्य साधणारी व्यवस्था

केनेथ बुल्डिंग+

विश्वाचा इतिहास, विशेषतः मानवी इतिहास, अतिशय गुंतागुंतीचा व स्थलकालसापेक्ष आहे. स्थळाची तीन परिमाणे, तर काळाचे एक परिमाण इतिहासातील घटना नोंदवतात. अशा व्यापक इतिहासात काही आकृतिवंध शोधण्याचा सामाजिक 'गतिकी' (डायनॅमिक्स) प्रयत्न करते; असे आकृतिवंध की जे इतिहासाच्या ओघात पुनःपुन्हा पुनरावृत्त होत राहतात. असे काही आकृतिवंध आपल्या हाती लागले तर भविष्यात काय घडेल याचे भाकित करता येण्याची शक्यता वाढते. ज्यांचे आपणांस नियंत्रण करावयाची इच्छा आहे, हवा तसा आकार देण्याची इच्छा आहे असे परिस्थितीतील घटक आणि ज्या घटकांचे आपण नियंत्रण करू शकणार नाही असे घटक यांच्यामध्ये काही स्थिर संवंध जर आपल्याला आढळले, तर आपल्या नियंत्रणाची कक्षा वाढवता येईल; आणि भविष्य केवळ जाणण्यावर न थांबता, ते काही अंशी घडवता येईल. आपण जेव्हा जेव्हा नियोजन करतो तेव्हा तेव्हा भविष्याला आकार देण्याचे काम करतो. कारण आज आपल्या मनात भविष्यावद्दलचे जे चित्र असते ते चित्र भविष्याला घडविणाऱ्या, भविष्य निश्चित करणाऱ्या कारणांचा एक भाग असते.

स्थळकाळावर ऐसपेस विखुरलेला इतिहास नावाचा जटिल आकृतिवंध एकजिनसी नाही. या आकृती वंधाची तुलना एखाद्या थरावर थर असणाऱ्या केकशी करता येईल. विविध सामाजिक व्यवस्थांची वा आकृतिवंधांची या केकसारखी रचना आपण डोळ्यासमोर आणू शकतो. यातील प्रत्येक व्यवस्थेला स्वतःची अशी गतिकी असते. तिच्या कालच्या रूपावरून तिचे उद्याचे रूप अंशतः ठरत असते, वऱ्यापैकी नियमित व सुनिश्चितपणे. त्याशिवाय, या समांतर व्यवस्था परस्परांवर परिणाम करतात (आकृति क्र. १ पाहा). अ,व,क या तीन, परस्परांशी समांतर असणाऱ्या पण एकाच समग्र समाज-

आकृती क्र. १ : परस्परांवर आघात-प्रत्याघात करणाऱ्या गतिमान उपव्यवस्थांच्या समांतर मालिकेच्या स्वरूपातील समाज व्यवस्था



* या लेखाचे भाषांतर करण्याच्या कामी श्री. गं.रा. पटवर्धन व श्री. सी.पं. खेर यांनी घेतलेल्या परिश्रमावद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. भाषांतर निर्दोष होण्याच्या दृष्टीने प्रा. अ.य. जोशी यांनी अनेक सूचना केल्या. त्यांचेही आभार. – *संपादक*

\+ केनेथ वुल्डिंग (Kenneth Boulding) हे ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ होऊन गेले. त्यांना १९६४ साली अर्थशास्त्रज्ञ या विषयातले नोवेल पारितोषिक प्रदान केले गेले. अर्थशास्त्रावरोवरच त्यांचे अन्य सामाजिक शास्त्रांचे अध्ययन सखोल होते याचा प्रत्यय त्यांच्या *कॉन्फ्लिक्ट अँड डिफेन्स, मीनिंग ऑफ द ट्वेंटिएथ सेंच्युरी, इकॉनॉमिक्स अॅज ए सायन्स, द इम्पॅक्ट ऑफ सोशल सायन्सेस* या ग्रंथांमधून येतो. त्यांनी १९६५-६६ साली लिहिलेला *टेक्नॉलॉजी अँड द इंटिग्रेटिव सिस्टिम* हा लेख *टुडेज चेंजिंग सोसायटी, ए चॅलेंज टू इंडिव्हिज्युअल आयडेंटिटी* या क्लॅरेन्स सी. वॉल्टन यांनी संपादित केलेल्या (इन्स्टिट्यूट ऑफ लाइफ इन्शुरन्स, न्यूयॉर्क, १९६७) या ग्रंथात प्रसिद्ध झाला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

व्यवस्थेच्या अंतर्गत तीनव्यवस्था, जशा की आर्थिक, राजकीय, धार्मिक. आडवे बाण त्या त्या व्यवस्थेची स्वायत्त आंतरिक गती दाखवतात, तर कर्णरेषा एका व्यवस्थेचा अन्य व्यवस्थांवरील परिणाम दाखवतात. म्हणजे, प्रत्येक व्यवस्था काही अंतर्गत गतिकीच्या परिणामस्वरूप तर काही अन्य व्यवस्थांच्या आघातांचा परिणाम म्हणून बदलत राहते, व या सर्व व्यवस्थांच्या चलनवलनामधून एकंदर समाजव्यवस्थेची काळाच्या परिमाणात वाटचाल होत जाते. उदाहरणार्थ, आर्थिक गुंतवणूक (इन्व्हेस्टमेंट) आणि आर्थिक साधनस्रोतांचे क्षेत्रीय वाटप यांचे अर्थव्यवस्थेमधील 'चित्र', बऱ्याच अंशी, पुढील पाचदहा वर्षांनंतर आर्थिक स्थिती कशी असेल ही गोष्ट ठरवीत असते. आर्थिक विकासप्रक्रियेची स्वतःची अशी गतिकी असते. त्याच वेळी, राजकीय व्यवस्था वा धार्मिक रचना अशा अन्य व्यवस्थांचे आर्थिक व्यवस्थेवर आघात होत राहतात. नवीन राज्यसरकारे किंवा धर्मकारणातील फेरवदल यांचा आर्थिक वाढीवर खोलवर परिणाम होतो. याच प्रकारे इतर प्रत्येक व्यवस्थेची स्वतःची अशी एक गतिकी असते, स्वायत्त घाट असतो आणि त्याच्यावर आर्थिक व्यवस्थेचे, तिच्यातील बदलांचे परिणाम होत राहतात. ज्या समाजामध्ये वेगवान आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान असते त्या समाजाच्या राजकीय वा धार्मिक संरचनांमध्येही आर्थिक विकासप्रक्रियेच्या रेट्याचे खोलवर व दूरगामी आघात होतात.

पूर्ण समाजव्यवस्थेला आपण 'थरावर थर रचलेल्या केक'ची उपमा दिली आहे. या 'थरां'ची व्याख्या काहीशी आपल्याला सोयीची अशी करण्याला पर्याय नाही. एकेक थर सुस्पष्टपणे आरेखित करून वेगळा करता येत नाही. समाज-व्यवस्थेच्या ज्या घटक उपव्यवस्था असतात त्या 'कडां'ना एकमेकीत इतक्या मिसळलेल्या असतात, की एक व्यवस्था कुठे संपली व दुसरी कुठे सुरू झाली, हे सांगणे मुश्कील. पण समाज व्यवस्था ही निम-स्वायत्त अशा उपव्यवस्थांची बनलेली आहे अशी कल्पना करणे, त्या त्या उपव्यवस्थेचे म्हणून स्वतःचे व्यवहार-क्षेत्र असते असे गृहीत धरणे विश्लेषणाच्या दृष्टीने सोयीचे असते. कारण त्यामुळे उपव्यवस्थांमधील आंतर क्रिया-प्रतिक्रियांचा, आघात-प्रत्याघातांचा ऊहापोह करता येतो. त्यांपैकी दोन महत्त्वाच्या उपव्यवस्था निवडून त्यांच्या क्रियाप्रतिक्रियांचे विश्लेपण मी या निबंधात प्रामुख्याने करणार आहे. दोन्ही बऱ्याच प्रमाणात स्वायत्त आहेत. त्यांच्या बाबतीत आकृति क्र. १ मध्ये आडवे बाण दाखविले आहेत ते शक्तिशाली व पक्के आढळतात. म्हणजे असे की, या उपव्यवस्थांची नजीकच्या भविष्यकाळातील वाटचाल त्यांच्या भूतकाळावरून आंतरिक गतिकीच्या आधारे पुष्कळ प्रमाणात ठरत जात असते. दोन्ही एकमेकींवर अतिशय ठोस आघात करीत असतात. या दोन व्यवस्था म्हणजे तंत्रज्ञान (टेक्नॉलॉजी) व्यवस्था आणि समाजाचे ऐकात्म्य (इन्टिग्रेशन) साधणारी व्यवस्था या होत.

तंत्रज्ञानव्यवस्था

मानवाच्या उपयोगासाठीच्या मानवनिर्मित भौतिक तसेच सामाजिक वस्तू वा रीती, संस्था, यंत्रणा आदि यांच्याशी संबंधित व्यवस्था ती तंत्रज्ञान व्यवस्था होय. यांच्याशी माणसांची होणारी क्रिया-प्रतिक्रिया, विशेषेकरून या प्रकारच्या आणखी नव्या गोष्टी निर्माण करण्याच्या ओघात घडणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया यांचा समावेश समाजजीवनाच्या तंत्रज्ञानव्यवस्था अंगामध्ये होतो. तंत्रज्ञान म्हटले की आपल्याला अवजारे, हत्यारे, यंत्रे यांची आणि अशा गोष्टी वापरण्याच्या तंत्रांची आठवण होते. मानवी कौशल्ये, भूमिका/कार्य ('रोल') आणि संघटन/यंत्रणा यांचा पण विचार मनात येतो. शस्त्रे, वेदी/कुंड, वा कीर्द/खतावणी या जशा मानवनिर्मित गोष्टी आहेत तद्वतच शासनसंस्था, धर्मपीठ/मठ, वा व्यापारी मंडळी याही मानवनिर्मित आहेत. मानवजातीच्या प्रारंभावस्थेतील अणकुचीदार दगड, धनुष्यबाण, भाला ही आयुधे, निवारा, वल्कले यांच्यापासून मानवनिर्मित वस्तूंच्या उत्पादनाची, तंत्रविद्येची सुरुवात झाली. मानवनिर्मित वस्तूंच्या संख्येत, विविधतेत व जटिलतेत कालौघात भर पडत गेली. हाच तंत्रज्ञानाचा इतिहास होय. शेतीतंत्राचा, धातुशास्त्राचा (मेटॅलर्जी), चाके असलेल्या वाहनांचा, गलबतांचा, रस्त्यांचा, प्राण्यांना पाळीव बनविण्याचा व त्यांचा वापर करून घेण्याच्या तंत्राचा, गावे व नगरे वसविण्याचा, साम्राज्ये प्रस्थापित करण्याचा, वस्तुविनिमयासाठी चलन म्हणून पैशाचे ('मनी') प्रचलन करण्याचा, पतपेढ्यांचा, बँकांचा – अशा नाना अंगांनी आपण वाटचाल केली. असे करीत करीत आज आपण वीज, अणुशक्ती, आगगाडी, विमाने, संगणक, राष्ट्र-राज्ये आणि संयुक्त राष्ट्रसंघ इथवर पोचलो.

येथे केलेल्या व्याख्येनुसार, तंत्रज्ञानामध्ये आपण सर्वच मानवनिर्मित गोष्टींचा समावेश करीत आहोत. सामाजिक उत्क्रांतीच्या या व्यापक प्रक्रियेचे (१) भौतिक तंत्रज्ञान आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

(२) सामाजिक तंत्रज्ञान असे दोन भाग करायला हवेत. भौतिक तंत्रज्ञानाची वाटचाल, त्याचा विकास हा एका आंतरिक गतिकीच्या प्रेरणेनुसार होतो. या मानवनिर्मित गोष्टींकडे जीवसृष्टीत उत्क्रांत होत गेलेल्या जीवजाती म्हणून आपण पाहू शकतो. एखादी वस्तू घेतली तर तिची लोकसंख्या, जन्मप्रमाण, मृत्युप्रमाण या धर्तीवर. वस्तूचे उत्पादन हा तिचा जन्म आणि तिचा उपभोग पूर्ण होऊन ती निकामी वनते तो तिचा मृत्यू. या कोनामधून पाहिले असता, गेल्या साठ वर्षांमध्ये मोटारींनी जग भरून गेले आहे. मोठ्या आकाराचा, चाकरूपी चार पाय असलेला, धातूचे शरीर असलेला, व ज्याचा चालक मेंदू सुटा, अलग काढता येतो असा एक नवीन कीटक जणू असे मोटार वा वस्तूकडे पाहता येते. ही एक जणू सामाजिक जीवजातीच आहे – मोटारींचे कारखाने ही त्यांना जन्म देणारी गर्भाशये, अभियंत्यांच्या डोक्यात स्फुरणाऱ्या प्रातिभ कल्पना म्हणजे शुक्राणु, निकामी झालेल्या मोटारी जेथे टाकून दिल्या जातात ते त्यांचे स्मशान व त्यांचे टाकून दिले जाणे हा मृत्यू आणि त्यामधील काही भाग सुटे करून पुन्हा वापरणे वा त्यांमधील धातूंचे भाग वितळवून त्यांचा पुनर्वापर करणे म्हणजे काही एका प्रमाणात त्यांचा पुनर्जन्म! ज्या 'यादृच्छिक सर्जनात्मक वदला'मधून ('म्युटेशन') मोटार ही वस्तू उत्क्रांत झाली त्या वदलामुळे – म्हणजे मोटारनामक प्रजातीच्या वाढीमुळे – साऱ्या जगाच्या पर्यावरणीय व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला आहे. जीवजाती व सामाजिक जाती, दोहोंच्या संख्येत त्यामुळे वदल घडून आला आहे. घोड्यांची संख्या घटली, 'सुपरमार्केट' नामक दुकानांच्या जातीची संख्या वाढली, रस्त्यांच्या खालचे जमिनीचे क्षेत्र वाढले, त्यांच्या वाजूंनी विशेष प्रकारच्या वनस्पतिसृष्टीची वाढ झाली, जंगलांमध्ये पेटणाऱ्या वणव्यांचे स्वरूप वदलले, वातावरण प्रदूषित झाले आणि समुद्रातील वरच्या थरातील पाण्यात आढळून येणाऱ्या शिसे या धातूच्या प्रमाणात काही पटींनी वाढ झाली. भौतिक तंत्रज्ञानाचा विकास एका आंतरिक गतिकीनुसार होत असतो या म्हणण्याचे मोटारी हे एक उत्तम उदाहरण आहे. मोटारीची निर्मिती ज्या काळात झाली त्याआधी ती होऊ शकली नसती. रवर-संयोजन (व्हल्कनायझेशन), तेल-पृथक्करण यासारखे किमान दोनशे शोध आधी लागणे मोटारीच्या निर्मितीसाठी आवश्यक होते, तर एकदा ते शोध लागल्यानंतर मोटारीची निर्मिती थोपवणे अवघड होते. एक विशिष्ट अनुकूल सामाजिक वातावरण असले आणि समाजव्यवस्थेकडून या शोधांसाठी संशोधकाच्या पदरात नाना प्रकारचे लाभ पडतील अशी स्थिती असेल तर जगाच्या वेगवेगळ्या भागांत, वेगवेगळ्या संशोधकांकडून स्वतंत्रपणे काही शोध हे साधारणपणे एकाच काळात लागतात ही वस्तुस्थिती हा, भौतिक तंत्रज्ञानाचा विकास होण्याची स्वतःची एक स्वतंत्र आंतरिक गतिकी असते, या म्हणण्याचा पुरावा आहे.

ऐकात्म्य व्यवस्था

मी जिला 'ऐकात्म्य-व्यवस्था' म्हणत आहे ती तंत्रज्ञान-व्यवस्थेपेक्षा आपल्या कमी परिचयाची आहे. कारण अशी काही व्यवस्था समाजात कार्यरत असते ही कल्पना पुष्कळशी नवी आहे. संपूर्ण समाजव्यवस्थेचा एक घटक-स्तर असा असतो ज्याला हे नाव द्यायला हवे असे माझे मत आहे. त्याची स्पष्टता करण्याची व या घटकाला 'ऐकात्म्य-व्यवस्था' म्हणणे कसे समर्थनीय आहे ते सांगण्याची माझी तयारी आहे. प्रतिष्ठा/दर्जा, जमात/समुदाय, अस्मिता, स्वीकृती/अधिमान्यता, निष्ठा, प्रेम, आदर, सन्मान या व यासारख्या शब्दांना अर्थगर्भता असते; या शब्दांचे वैशिष्ट्यपूर्ण आशय व आकार असतात. त्यांच्या साहाय्याने वा मार्फत त्या त्या समाजाची एकात्म स्वरूपाची वांधणी होत असते. या सर्व शब्दांचे नकारात्मक प्रतिशब्दही वापरात असतात : दुरावा, वैर, वहिष्कृत, द्वेष, द्रोह, अवैध, दुष्टवुद्धी इत्यादी. समाजाला एकत्र वांधणाऱ्या वा, उलटपक्षी, तिचे विघटन करणाऱ्या, आणि यासारख्या संकल्पनांनी स्पष्ट केल्या जाणाऱ्या, समाजजीवनाच्या पैलूंची आपण या देशात (म्हणजे अमेरिकेत) गंभीरपणे दखल घेतलेली नाही. व्यक्तिगत पातळीवर ठरणाऱ्या त्या खाजगी, तऱ्हेवाईक गोष्टी आहेत – जसे, दोन प्रेमिकांचे परस्परांशी चालणारे वर्तन – असे तरी आपण मानतो; किंवा आपण त्या गृहीत धरून चालतो. उदाहरणार्थ, सत्ता व संपत्ती यांना स्वयंसिद्ध अधिमान्यता/स्वीकृती समाजात प्राप्त होते असे मानतो. असे मानण्यात आपण मोठी चूक करतो. आपली धोरणे फसण्याचे वा आजच्या आपल्या राजकीय जीवनाच्या दुरवस्थेचे ते सर्वाधिक महत्त्वाचे कारण आहे असे माझे मत आहे. उदाहरणार्थ, व्हिएतनामचे उदाहरण घ्या. उत्तर व्हिएतनामचा प्रदेश वेचिराख करून टाकण्याची लष्करी ताकद आपणापाशी आहे म्हणून आपली उद्दिष्टे, आपली मागणी यांना स्वीकृती, अधिमान्यता प्राप्त होणारच या भ्रमात आपण राहिलो. प्रत्यक्षात असे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

काही घडलेले नाही.[१] आपल्या पूर्वी फ्रान्सची तेथे सत्ता होती. फ्रान्सच्या तुलनेत आपण दसपटीने जास्त लष्करी बळ तेथे पणाला लावले असूनही, एक स्थिर, स्वतंत्र आणि लोकशाही समाज दक्षिण व्हिएतनाममध्ये प्रस्थापित करण्याचे आपले उद्दिष्ट आपण गाठू शकलो नाही. याचे साधे कारण असे की, व्हिएतनामी समाजात आपणांस स्वीकृती, अधिमान्यता मिळविता येत नाही. उलट, आपण वापरीत असलेल्या बळाच्या मात्रेमुळे एरवी जी अधिमान्यता आपणांस मिळू शकली असती ती नष्ट होत आहे.

"अनुदानांचे अर्थकारण"

कोणताही समाज घेतला तर त्या समाजात अनुदानांची देवाणघेवाण होत असते; समाजव्यवस्थेचा तो एक भाग असतो, असे आढळते. "अनुदानांच्या अर्थकारणा"ची संरचना व प्रमाण यांच्या परिभाषेमध्ये ऐकात्म्य-व्यवस्थेची प्राथमिक स्पष्टता वा मांडणी करणे शक्य आहे. एका व्यक्तीकडून वा समाजघटकाकडून दुसऱ्या व्यक्तीस वा समाजघटकास, प्रतिफलाची अपेक्षा न राखता, जे एकतर्फी हस्तांतरण होते वा जो त्याग केला जातो त्याला अनुदान म्हणता येईल. तर, विनिमय घडतो तेव्हा उभयपक्षी हस्तांतरण घडून येते. आता, प्रतिफलाशिवायच अ कडून ब ला हस्तांतरण तेव्हाच होऊ शकते जेव्हा त्यांच्यात एकात्म स्वरूपाचे संबंध असतात; म्हणजे, अ एक ना एक प्रकारे ब शी एकरूप होतो, आणि समाईक हितसंबंध असलेल्या एका जमातीचे, समुदायाचे, वा समाजाचे आपण दोघेही सभासद आहोत असे अ ला ब विषयी वाटते तेव्हाच असे हस्तांतरण वा त्याग राजीखुशीने होतो. दया वाटून ज्या भिकाऱ्याला आपण एखादा छदाम देतो त्याचा आपला जो एकात्म संबंध असतो त्याचा स्तर अगदी प्राथमिक, कनिष्ठ पातळीवरचा असतो असे म्हणूया. तोही एक आपल्यासारखा माणूस आहे बिचारा, ही ती पातळी असेल. हा अनुबंध जुजबी असेल, पण तो असतो हे खरेच. अनुदानाचे अर्थकारण, अगदी पैशाच्या रूपातल्या अनुदानांचा तेवढा विचार केला तरी, अभ्यासले तर जागतिक पातळीवरील ऐकात्म्य व्यवस्थेच्या संरचनेविषयी ते आपणांस पुष्कळ काही सांगून जाईल. राष्ट्र-राज्य (नेशन स्टेट) ही सर्वाधिक बलिष्ठ अशी ऐकात्म्य व्यवस्था आहे हे उघड दिसते. कारण स्वतःच्या नागरिकांना ज्या प्रमाणात राज्यसत्ता अनुदान देते त्या तुलनेत राष्ट्राबाहेरील व्यक्तींना वा समुदायांना फारच कमी अनुदान राष्ट्रे देतात असे सहज आढळेल. बहुतेक सुसंघटित व 'विकसित' राष्ट्रांमध्ये, ठोकळ राष्ट्रीय उत्पादनाच्या (ग्रोस नॅशनल प्रॉडक्ट) किमान दहा टक्के एवढे अंतर्गत अनुदान स्वतःच्या नागरिकांना शासनसंस्था देत असते. तर परदेशी मदतीचे प्रमाण बहुधा एक टक्क्यापेक्षाही पुष्कळ कमी असते. देशांतर्गत स्वेच्छया दिली जाणारी धर्मादाय मदत, धार्मिक भावनेपोटी दिल्या जाणाऱ्या देणग्या, मिशनरी वृत्तीने केले जाणारे सेवाकार्य व त्यासाठी खर्ची पडणारी रक्कम अशा प्रकारच्या रकमांची बेरीज केली तरी ती ठोकळ राष्ट्रीय एकूण उत्पादनाच्या एक टक्क्याच्या आसपासच भरेल.

अनुदानांचे अर्थकारण जर आपण अभ्यासले तर ऐक्याची, एकात्मतेची भाषा करणाऱ्या, देखावा करणाऱ्या कितीतरी ऐकात्म्य-व्यवस्था या एकात्मता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने किती कमजोर असतात हे स्पष्ट होईल. वर्ग ही व्यवस्था घ्या. एकात्मता निर्माण करण्याच्या दृष्टीने ती कमालीची असमर्थ अशी व्यवस्था आहे. 'जगभरच्या श्रमिकांनो, कामगारांनो एक व्हा' ही केवळ घोषणा राहते; कामगारांचे, श्रमिकांचे असे ऐक्य प्रस्थापित होत नाही. ऐकात्म्य व्यवस्था म्हणून 'जागतिक समाजवाद' फार दुबळा आहे. सोविएत रशिया व लाल चीन यांची विचारप्रणाली (आयडियालॉजी) वरकरणी एकच असूनही सोविएत रशियाने लाल चीनसाठी जवळपास काहीच त्याग केला नाही, त्याला मदतीचा हात दिला नाही. तेव्हा चीनचा रशियावर राग असावा यात आश्चर्य काही नाही. वरकरणी एकात्म असलेल्या व्यवस्थेला अनुदानांचे अर्थकारण व्यवहारात राबविता न आल्याने प्रत्यक्षात फाटाफूट घडून आल्याचे उदाहरण आपणांस पाहावयास मिळाले. चीनच्या आर्थिक विकासात रशियाचे योगदान दर चिनी माणसामागे दर वर्षी एक सेंट (एक शंभरांश डॉलर) एवढेच होते. तेही कर्ज म्हणून. विशेष कठीण परिस्थितीत सापडलेले असताना चीनला ते फेडावे लागले. या उलट, उझबेगी लोकांसाठी पुष्कळ जास्त अर्थसाहाय्य करण्यास रशिया पुढे आला, कारण उझबेगिस्थान हा सोविएत संघराज्याचा एक घटक आहे; (व्हाइट) रशियन व उझबेगी हे दोघेही एकाच राष्ट्र-राज्याचे सभासद आहेत. रशियनांनी चीनसाठी जवळपास काहीच मदत देऊ केली नाही. साम्यवादी पूर्व जर्मनीचे तर सोविएत रशियाने

१ व्हिएतनाममधील युद्धात अमेरिका आपल्या सर्व लष्करी सामर्थ्यानिशी उतरली होती त्या काळात लिहिलेला हा लेख आहे. – संपादक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शोपणच केले. एकाच विचारप्रणालीवर या दोन राष्ट्र-राज्यांची उभारणी झालेली असूनही. कालचे फ्रेंच साम्राज्य हे ऐकात्म्य व्यवस्थेचे सर्वाधिक सशक्त असे उदाहरण आहे. स्वतःच्या साम्राज्यातील वसाहतींमधील लोकांसाठी फ्रान्सच्या एकूण ठोकळ राष्ट्रीय उत्पादनाचा जेवढा हिस्सा फ्रेंचांनी दिला तितका अन्य कोणत्याही देशाने दिलेला नाही.

पैशाच्या किंवा वस्तूंच्या रूपाने अनुदान/साहाय्य देणे म्हणजेच सर्व काही नाही. एकात्म करणाऱ्या आत्मीय नात्याचे पराकोटीचे गमक म्हणजे दुसऱ्यासाठी प्राण देणे होय. त्या अलीकडच्या टप्प्यात मोडणारे अनेक प्रकारचे त्याग पण 'दाना'च्या कोटीत समाविष्ट होतात. "स्नेह्यासाठी प्राण वेचणे यापरते श्रेष्ठ प्रेम नाही" अशी म्हण आहेच. वेळ, बुद्धी, श्रम इत्यादींचेही दान करता येते. याप्रमाणेच बाजारभावापेक्षा कमी भावात विनिमय करणे हाही दानाचाच एक प्रकार आहे. भोपळा देऊन बदल्यात जो आवळा स्वीकारतो तो दानच करीत असतो. आणि असा विनिमयव्यवहार हे एकात्मतेच्या नात्याचे गमक किंवा प्रतीक असते. या प्रकारच्या नात्याच्या व्यवस्थेचे गतिक (डायनॅमिक्स) मुलुखावेगळेच असते. 'दान' या शब्दापेक्षा 'त्याग' हा शब्द अधिक प्रचलित आहे. त्याग केला जातो हे एकात्मतेच्या नात्याचे एकाच वेळी गमकही असते आणि एकात्मतेला जन्म देणारे कारणही असते. एकदा आपण कशाच्या वा कोणाच्या साठी त्याग करावयास सुरुवात केला की, आपण व्यर्थ त्याग केला अशी कबुली स्वतःला देणे ही गोष्ट फार कठीण जाते. त्याग करण्याचे समर्थन त्याग करण्यामधूनच निर्माण होते; ज्या प्रकारच्या नातेसंबंधांच्या व्यवस्थेमध्ये एकमेकांसाठी त्याग करणे समर्थनीय ठरते अशी व्यवस्था त्यागामधून अस्तित्वात येते आणि त्या व्यवस्थेच्या हितासाठी मग त्याग करणे व्यर्थ ठरू शकत नाही. धर्मरक्षणासाठी बलिदान करणाऱ्या हुतात्म्यांच्या त्यागाच्या अधिष्ठानावर धर्मसंस्थेची भक्कम इमारत उभी राहते तर सैनिकांनी सांडलेल्या रक्तावर राज्यसंस्थेची भक्कम उभारणी होत असते. ज्यांनी पूर्वी बलिदान केले आणि ज्यांच्याशी आपण मनाने एकरूप झालेले असतो त्यांचे बलिदान "व्यर्थ ठरेल" असे वर्तन आपण करू शकत नाही अशी आपली भावना बनते. प्राणार्पणामध्ये वैशिष्ट्यपूर्ण, अपवादभूत अशी भावनांची उत्कट गुंतवणूक होत असते; आत्मीय नात्याची पराकोटी गाठल्याचे ते गमक असते. ज्यांना पावित्र्य प्रदान केले गेले आहे अशा कितीएक संस्थांचा उगम मानवी बलिदानामध्ये आढळून येतो. ॲझटेक लोकांमध्ये प्रचलित असलेल्या धर्माची धारणा नरबली देण्यावर विसंबून होती. अर्वाचीन काळातले याच्याशी तुल्यबल व समांतर उदाहरण राष्ट्र-राज्याचे आहे. युद्धात रणभूमीवर तरुणांच्या निरंतर आहुतीची राष्ट्र-राज्य मागणी करीत असते. तिचे अस्तित्व व तिचे पावित्र्य असे बलिदान होत राहण्यावर अवलंबून आहे. लोकांची राष्ट्राला निष्ठा राहावी, लोकांचे राष्ट्रप्रेम जाज्वल्य राहावे यासाठी असे बलिदान अखंडितपणे होत राहावे ही राष्ट्र-राज्याची गरज आहे. ज्याला सतत नरबळीचा नैवेद्य द्यावा लागतो असा मोलोक हा देव जगातल्या प्राचीनतम देवांपैकी एक आहे एवढेच नाही, त्याची सद्दी आजही चालू आहे.

ऐकात्म्य व्यवस्थेचा विकास घडून येण्याच्या ओघात एका गोष्टीचा शोध नेहमीच लागलेला आहे. खराखुरा बळी देण्यामधून जी कार्ये/उद्दिष्टे साध्य केली जातात त्यांपैकी सर्वच नाही तरी बरीच कार्ये/उद्दिष्टे त्याऐवजी अन्य कशाचा बळी देऊन वा बळी दिल्याचे नाटक (व विधी) करून साध्य होऊ शकतात. प्राचीन संस्कृतींमध्ये राजाच्या मृत्यूनंतर त्याचे दफन करतेवेळी परलोकात त्याच्या गरजा भागण्याच्या दृष्टीने त्याचे सेवक-दासी यांना त्याच्या प्रेतासह गाडले जाई (जिवंत वा मारून). नंतर प्रत्यक्ष माणसांच्या ऐवजी त्यांची प्रतीके असलेल्या मूर्ती/पुतळे यांचे दफन केले जाऊ लागले. प्राचीन धर्मांमध्ये नरबळी दिले जात. पुढे त्यांच्याऐवजी पशुबळी दिले जाऊ लागले. गिरीजाघरात पशु बळी देण्याची जुदाईक (Judaic) धर्मात प्रथा होती. त्याच्याऐवजी ख्रिस्ती धर्मात सर्वस्वी प्रतीकात्मक असा 'मास'चा विधी रचला व स्वीकारला गेला. या विधीत ख्रिस्ताचे मांस व रक्त यांचे सेवन करण्याचा विधी पाव व मद्य यांचे सेवन करून, व त्या सेवनाद्वारे ख्रिस्ताशी एकजीव होण्याची गोष्ट साध्य करून, पार पाडला जातो. राष्ट्रे आज परकीय मदत देऊ करतात त्याकडेही या आलोका-मधून पाहणे शक्य आहे. आत्मीय संबंध प्रस्थापित करण्यासाठी राज्य पैशाच्या रूपात बळी देत आहे असे समजता येईल. राष्ट्र-राज्य ही संस्था जशी परिपक्व व प्रौढ-समंजस बनत जाईल तसा एक टप्पा असा गाठला जाईल की, राष्ट्र-राज्याच्या एकात्मतेसाठी प्राणाच्या ऐवजी संपत्तीच्या रूपात बलिदान देणे सर्वस्वी उचित मानले जाईल, आणि आजच्या प्रकारे कित्येक माणसांचे बळी देणे ही प्रथा ओंगळ व निरर्थक

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मानली जाईल अशी आपण आशा करूया. धर्मासाठी वा तुम्ही ज्याची उपासना करता त्या देवासाठी धर्मयुद्ध करायला वा प्राणांचे बलिदान करायला पुढे या अशी हाक आज कोणी देत नाही.[२] तद्वतच उद्या देशासाठी बलिदान करा, अशी हाक देणे यातही कमालीच्या उद्धटपणाचा प्रत्यय लोकांना येईल.

ऐकात्म्य व्यवस्थेचे ऐक्य

ऐकात्म्य व्यवस्था ही संकल्पना विकसित करण्यात, तिचे निरूपण करण्यात आपण आणखी पुष्कळ वेळ व बुद्धी कामी लावू शकू. अशी एक व्यवस्था समाजात अस्तित्वात असते, आणि ती एक महत्त्वपूर्ण सामाजिक वास्तव आहे, आणि तिचा म्हणून एक सलग प्रवाह असतो. सर्व ऐकात्म्य व्यवस्थांचा उगम धूसर असतो. पण एकदा त्या अस्तित्वात आल्या की मग त्यांची पुढची वाटचाल एका आंतरिक प्रक्रियेद्वारा होत जाते. बलिदाने एकात्म असल्याची भावना परिपुष्ट करतात, आणि ज्यांच्या 'चरणां'शी ही बलिदाने केली जातात त्या 'दैवतां'ची आणखी मोठ्या प्रमाणात बलिदानांची मागणी करण्याची शक्ती त्या आधीच्या बलिदानांमुळेच वाढते. बलिदानांनी एकात्मतेची भावना दृढ व सघन बनते जिच्या परिणामी पुढच्या आवर्तनामध्ये बलिदानांचे प्रमाणही वाढते. अशा चढत्या श्रेणीच्या आवर्तनांच्या शेवटी एक प्रकारे शिखर गाठले जाते. शिखरस्थ असलेली व्यवस्था कमालीची बलिष्ठ असते. सभासदांकडून बलिदानाची सर्वंकष मागणी करण्याइतकी तिची सभासदांच्या भावनांवर तिची पकड असते. आणि मग पुष्कळदा असे घडते की, छोट्याशा अनपेक्षित धक्क्याने ती सारी व्यवस्था ढासळते, उद्ध्वस्त होते. देवळे ओस पडतात, राजांना सिंहासन सोडावे लागते वा त्यांना पदच्युत केले जाते, साम्राज्य धुळीला मिळते. याच्या बुडाशी बलिदान-त्याग यांचा अतिरेक असल्याचे आढळून येते. 'अती'चा इमला 'माती'त जातो.

व्यवस्थेच्या वेदीवर एकतर्फी बलिदानांचे प्रमाण वाढत जात जात अतिरेक होऊन समाजाचा/राष्ट्राचा विनाश ओढवतो – सुदैवाने, हा एकच मार्ग ऐकात्म्य व्यवस्था स्वाभाविकपणे, अटळपणे अनुसरते वा अनुसरू शकते असे नाही. पण आणखी एक आकृतिबंध आढळतो. त्याला मी 'पारस्परिकता' ('रेसिप्रोसिटी') असे नाव देतो. वरकरणी पारस्परिकता आणि विनिमय यांच्यात साम्य आढळते आणि त्यामुळे पारस्परिकता आणि विनिमय यांच्यात गोंधळ घातला जातो. जेथे विनिमयात्मक संबंध असतो तेथे संबंधाचा आधार देवाण- घेवाण हा असतो. संबंध सशर्त असतो. अ ब ला काही देतो तेव्हा ब पण अ ला त्याच्या बदल्यात काही देणार ही 'शर्त' अध्याहृत असते. पारस्परिकतेचा संबंध असतो तिथे ब ने काही देण्याच्या शर्तीवर अ ब ला काही देत नसतो. हीच गोष्ट ब ने अ ला काही देण्याच्या बाबतीत खरी असते. पारस्परिकतेच्या आधारावर संबंध असतात तेव्हाही उभय पक्षी काही दिले व काही घेतले जात असते. म्हणजे, या व्यवहाराचा तोंडवळा विनिमयासारखाच असतो पण पारस्परिकतेच्या व्यवहारांची जातकुळी अनुदान वा त्याग यांची असते. ख्रिसमस सणाच्या वेळी ज्या भेटवस्तूंची देवाण-घेवाण होते त्याचे उदाहरण घेता येईल. कुटुंबाचे संघटन, जवळिकीच्या मैत्रीचे संबंध दृढ राखण्याच्या दृष्टीने – म्हणजेच या पातळ्यांवरील ऐकात्म्य व्यवस्था गाढ करण्याच्या दृष्टीने – भेटवस्तूंची देवाण-घेवाण हा एक अतिशय महत्त्वाचा विधी आहे. या व्यवहारात 'विनिमयाच्या शर्ती' ('टर्म्स ऑफ ट्रेड') याना महत्त्व नसते असे नाही. जी व्यक्ती नाताळाच्या सणाप्रसंगी कोणाला भेटवस्तू देत नाही त्याला लौकरच, त्यालाही कोणी भेटवस्तू देत नाही हा अनुभव येतो. तरीसुद्धा, भेटवस्तू दिली जाते तेव्हा, त्या बदल्यात काय मिळणार आहे याचा विचार न करता, कोणतीही शर्त न घातला वा मनात न बाळगता भेटवस्तू दिली जावी अशी अपेक्षा असते. यामुळे भेटवस्तूंच्या देवाण-घेवाणीमधून संबंध एकात्म, आत्मीय बनण्याचा परिणाम घडून येतो. पैशाच्या रूपात देवाण-घेवाण करण्यामधून ऐकात्म्यतेच्या दिशेने जेवढे पाऊल पुढे पडते त्यापेक्षा वस्तूंच्या देवाण-घेवाणीमधून पाऊल जास्त पुढे पडते.

पारस्परिकता वाढत गेली तर त्या प्रक्रियेचा शेवट एकतर्फी बलिदानांच्या अतिरेकामधून होणाऱ्या परिणामासारखा होत नाही; पारस्परिकतेचा अतिरेक झाल्याने समाज-कोसळत नाही. पारस्परिकतेच्या वाढीमुळे निकोप बंधुभाव व दर्जाची समानता यांच्यात वाढ होण्याच्या दिशेने पाऊल पुढे पडते. याउलट जेथे एकतर्फी त्याग व बलिदान यांच्यावर भर असतो तेथे

---

२ दुर्दैवाने बुल्डिंग यांचे हे विधान भारत-पाकिस्तान, बांगला देश या देशांच्या बाबतीत खरे नाही. धार्मिक कट्टरता व दुराग्रही धर्मवादी राजकारणी प्रवृत्ती वाढत चालली आहे व त्यांमधून धर्माचे रक्षण करण्यासाठी वा शत्रुस्थानी असलेल्या परधर्मीयांचे निर्दालन करण्यासाठी बलिदान करण्याचे आवाहन जगात इतर देशांमध्येही वाढत्या प्रमाणावर केले जात आहे. – *संपादक*

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्रेणीबद्धता, संघटनेच्या अंतर्गत दुभंगलेपण व भयगंड आणि संघटनांतर्गत अस्थैर्य या प्रकारचे परिणाम घडून येतात. 'देश तुमच्यासाठी काय करणार हे विचारू नका; तुम्ही देशासाठी किती त्याग करण्यास तयार आहात ते स्वतःला विचारा' हे आवाहन 'बलिदान सापळ्या' माणसांना अडकविणारे आहे. या आवाहनामधून देशासाठी त्याग व बलिदान यांचा एक ना एक दिवस अतिरेक होणार आणि या अतिरेकाची परिणती राष्ट्रीय ऐकात्म्य व्यवस्थेच्या विघटनामध्ये होणार. आता, बाजारपेठी अर्थव्यवस्थेतील मोठ्या कंपनीने पुढीलप्रमाणे आवाहन केले असता आपली प्रतिक्रिया काय होते ते पहा : 'जनरल मोटर्स[३] तुमच्यासाठी काय करू शकते असे विचारू नका, तुम्ही जनरल मोटर्स साठी काय करू शकता ते विचारा.' समर्थ ऐकात्म्य व्यवस्था ही जिचा एक अंगभूत भाग आहे असे राष्ट्र-राज्य आणि विनिमय व्यवस्थेच्या परिघातच सर्वस्वी कार्य करणारी कंपनी यांनी केलेल्या एकाच आशयाच्या आवाहनांना आपला फार वेगळा प्रतिसाद येतो असे आपल्या लक्षात येते. जनरल मोटर्सचे आवाहन आपण मनावर घेत नाही.

आर्थिक व्यवहारापुरतेच ज्यांचे कार्य बव्हंशी सीमित आहे अशा सर्व संस्थांशी, सर्वांचेच देवाण-घेवाणीचे व्यवहार समाधानकारक शर्तीवर चाललेले असतात. जनरल मोटर्स कंपनी आपल्यासाठी काय करू शकते असा प्रश्न आपण जरूर विचारतो आणि त्याचे उत्तर 'बरेच काही' असे असते. त्या कंपनीत आपण नोकरी करीत असलो तर, आपल्याला चांगले वेतन मिळते, हे उत्तर येईल. आपण खरेदीदार असलो तर, कंपनी आम्हाला मोटारी पुरविते (व त्या समाधानकारक सेवा देतात) असे उत्तर येते. पण निव्वळ विनिमयाच्या चौकटीत कंपनीचे काम चालत असल्यामुळे, कंपनीच्या व्यवहारांमधून ऐकात्म्य व्यवस्था अगदी दुबळ्या स्वरूपात आकारास येते. जनरल मोटर्स कंपनीवर कोणाचेच फार प्रेम नसते ही समस्या आहे. ऐकात्म्य व्यवस्थेच्या भूमिकेत बदल होऊन जनरल मोटर्स अधिमान्यता गमावून बसेल हा धोका कायम राहतो. हा धोका टाळावयाचा असेल तर पारस्परिकतेवर आधारित व्यवस्था उभारणे हाच यावरचा उपाय आहे असे दिसते. विनिमय व्यवस्थेच्या अंगी असणारे गुण – आणि ते मोठे आहेत – आणि ऐकात्म्य व्यवस्थेची गुणवैशिष्ट्ये यांचा संयोग पारस्परिकतेवर आधारित व्यवस्थेमध्ये होत असतो. म्हणजे वर्षभर आपण नाताळ साजरा करावा असे मी सुचवतो आहे असे नाही. पण पारस्परिकतेची गुणवैशिष्ट्ये समाजव्यवस्थेत आपण कशी सामावून घेऊ शकू त्याचा काही विचार आपण नक्कीच करावयास हवा असे मला म्हणावयाचे आहे. तुम्ही केलेल्या खरेदीसोबत एक कूपन वा 'टोकन' तुम्हांला मिळते, व जिला भेटवस्तूचे स्वरूप असते, ही एक नवी रीत अलीकडे अवलंबिली जात आहे. त्यामुळे एरवी जो फक्त शुद्ध विनिमय व्यवहार ठरला असता त्याला पारस्परिकतेचे परिमाण प्राप्त होते. निव्वळ विनिमय व्यवस्थेला पारस्परिकतेचे वळण कसे देता येईल याचे हे एक चांगले सूचक उदाहरण म्हणता येईल.

'माझा देश माझ्यासाठी काय करू शकतो' असे फार स्पष्टपणे व मोठ्याने नागरिकाने विचारणे कदाचित योग्य होणार नाही; पण 'देशा'ने – म्हणजे राज्यसत्तेने – मात्र अतिशय स्पष्टपणे, व चांगले मोठ्याने, आपण नागरिकांसाठी काय करू शकतो असे विचारले पाहिजे. राजेशाही व अनियंत्रित सर्वंकष राज्यसत्तेची अधिमान्यता नष्ट झाली आणि लोकशाहीची त्या जागी प्रतिष्ठापना झाली यामागचे तत्त्वच हे आहे की, एकतर्फी बलिदान/त्याग यांवर आधारित व्यवस्था ही स्थिर व टिकाऊ नसते; राज्यसत्तेचा व्यवहारही पारस्परिकतेला अनुसरून व्हायला हवा. राज्यसत्ता व नागरिक यांच्यात जी देवाण-घेवाण होते त्याच्या शर्ती काय असाव्यात हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. नागरिक राज्यसत्तेसाठी जो त्याग करतो त्याच्या मोबदल्यात त्याला जे मिळते त्याचे प्रमाण योग्य असले पाहिजे हे एक फार वैध असे सामाजिक मूल्य आहे. आमच्या पदरात राज्यसत्ता पुरेपूर माप टाकीत आहे की नाही हा प्रश्न विचारावयास नागरिकांना परवानगी नसते. पण नागरिकांच्या वतीने राज्यसत्तेला जाब विचारणारे कोणीतरी असले पाहिजे. लोकशाही राज्यव्यवस्थेचे सारे तात्त्विक अधिष्ठानच हे आहे की, सत्तेवर असलेले सरकार जर नागरिकांना देवाण-घेवाणीच्या व्यवहारात न्याय देत नसेल, म्हणजे शर्तींचे पारडे जर सरकारच्या बाजूने फार झुकते ठेवलेले आहे असे अनुभवाला येत असेल, तर नागरिकांनी मतपेटीच्या माध्यमातून त्या सरकारला पदच्युत करावे. निकोप, स्वस्थ एकात्मतेची खरी गुरुकिल्ली पारस्परिकता हीच आहे असे, दुसरीकडे, म्हणता येईल. म्हणजे, देश

३ जनरल मोटर्स ही अमेरिकेतील एक अव्वल स्थानावरील कंपनी आहे. आपल्याकडील तुल्यबळ कंपन्यांची नावे घ्यायची झाल्यास टाटा स्टील, रिलायन्स, इंडाल्को, बजाज ऑटो इत्यादींची घेता येतील. – *संपादक*

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आमच्यासाठी काय करणार असा प्रश्न न विचारता देशासाठी नागरिकांनी विनशर्त त्याग वा समर्पण केले पाहिजे आणि देशानेही नागरिकांसाठी विनशर्त जेवढे म्हणून माप पदरात टाकता येईल तेवढे टाकले पाहिजे.

पारस्परिकतेवर आधारित संबंधाच्या बाबतीत एक अटळ असा विरोधाभास आहे. भेटवस्तूंची देवाण-घेवाण होते तेव्हा ती कोणत्याही शर्तीशिवाय व अपेक्षेशिवाय असली तरी, आधीच्या देण्या-घेण्याचा जो अनुभव असतो त्या अनुभवाच्या आधारे माणसे भेटवस्तू देत-घेत राहावयाचे की नाही ते ठरवितात. म्हणजे, आपण सढळ हाताने भेटवस्तू देत आलो पण समोरची व्यक्ती सतत कंजूप वृत्ती प्रकट करीत आली आहे असा जर अनुभव असेल तर, पारस्परिकता संपुष्टात येते. ज्या ऐक्याच्या, आत्मीयतेच्या नात्यावर पारस्परिकता अखेरीस विसंबून असते ती ऐकात्म्य व्यवस्था अखेर कोलमडते.

दोन व्यवस्थांमधील आंतरसंबंध

आकृती क्र. १ मध्ये तिरप्या व उभ्या बाणांनी दर्शविलेले, तंत्रज्ञान व ऐकात्म्य या दोन व्यवस्थांमधील संबंध अतिशय गुंतागुंतीचे व कमालीचे महत्त्वाचे आहेत. या लेखात काही संभाव्य संबंध सूचित करणे तेवढे शक्य आहे. या संबंधांमध्ये खोलवर पारस्परिकता आहे. तंत्रज्ञान व्यवस्थेतील गतिमानता व नवनवोन्मेषशालिनी क्षमता ही बऱ्याच प्रमाणात समाजात एकात्मता असण्यावर अवलंबून असते. ऐकात्म्य व्यवस्थेच्या पायाभूत आधारावरच तंत्रज्ञान व्यवस्थेची कामगिरी अवलंबून असते. तद्वतच तंत्रवैज्ञानिक क्षेत्रातील घडामोडी व स्थित्यंतरे यांचा निष्ठा, अधिमान्यता आणि भावना यांच्या व्यूहावर प्रचंड प्रभाव पडत असतो, आघात होत असतो. काही उदाहरणांच्या साहाय्याने हा मुद्दा स्पष्ट करावयाचा प्रयत्न करूया.

गेल्या तीनशे वर्षांमध्ये पाश्चात्त्य जगतात जी प्रचंड तंत्रवैज्ञानिक घोडदौड झालेली आहे ती किती अपवादभूत व विशेष घडामोड आहे याकडे आपण बहुधा ध्यान देत नाही. वस्तुतः आजवरच्या मानवी इतिहासातील ही एक कमालीची बुचकळ्यात टाकणारी घडामोड आहे. विज्ञान आणि विज्ञानावर आधारित तंत्रज्ञान हे थोर मन्वंतर युरोप-अमेरिकेतच का घडून आले, ते चीनमध्ये का घडून आले नाही, हा प्रश्न आपण उपस्थित करायला हवा. जोसेफ नीडम यांनी तो उपस्थित केला आहे. इ.स. १६०० पर्यंतचा कालखंड घेतला तर, चीन याबाबतीत अग्रेसर देश होता. पृथ्वीवरील अत्यंत प्रगल्भ व सुसंस्कृत समाज, श्रेष्ठ समाज हा चीनचा स्वतःविषयीचा दावा सार्थ होता. ख्रिस्तजन्मापासूनच्या पहिल्या सोळाशे वर्षांमध्ये बहुतेक सर्व महत्त्वाचे तंत्रवैज्ञानिक शोध चीनमध्ये लावण्यात आले आणि युरपपर्यंत ते पोचायला, पुष्कळदा, तीनशे वर्षांचा काळ जावा लागला. अठराव्या शतकातील युरोपीय विद्वान चीन हा जगातला सर्वात प्रगत, विकसित व सुसंस्कृत देश आहे असे म्हणत. आता, इ.स. १६०० नंतरच्या तीनशे वर्षांच्या कालखंडाचा विचार केला तर, या काळात चीनमध्ये लक्षणीय असे कोणतेच शोध लागले नाहीत वा कामगिरी झाली नाही. आधुनिक विज्ञान युरोपात उदय पावले, त्याचा तेथे उत्कर्ष झाला आणि तेथेच (व अमेरिकेत) सर्व महत्त्वाच्या घडामोडी घडल्या असे चित्र समोर येते. हे तीन-चार शतकांचे मागासलेपण भरून काढण्यासाठी आज चीन कसोशीने धडपड करीत आहे. हे असे का घडले याचा उलगडा अद्यापि समाधानकारकरित्या करता आलेला नाही. पण या दोन समाजांची धारणा करणारी ऐकात्म्य व्यवस्था मूलतः भिन्न होती याच्याशी त्याचा नक्कीच संबंध पोचतो. समाजाला एकात्म बनविणारी व्यवस्था चीनमध्ये इतकी साचेबंद झाली, किंवा व्यवस्थेमधून उत्पन्न होणारी एकात्मता इतकी परिपूर्ण होती म्हणा, की ज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतिकारक अशी काही नवी भर पडण्यासाठी आवश्यक ती 'फट' उरली नव्हती. एक सर्वदूर पोच असलेली नोकरशाही समाजाचा कारभार चालवी. नोकरशाहीत सर्वांना खुल्या असलेल्या परीक्षेच्या द्वारा भरती केली जाई आणि त्यामुळे महत्त्वाकांक्षी लायक तरुण प्रविष्ट होत. ती तरुण मंडळी व्यवस्थेचा भाग बनून प्रतिष्ठा पावत असत. एकच केंद्रीय सत्ता होती आणि निष्ठेचेही तेच एकमेव केंद्र होते. धर्मसत्ता व राज्यसत्ता यांच्यात अभेद होता. एकच व्यक्ती न्यायाधिकारी/दंडाधिकारी आणि धर्मगुरु असे. अभिजात ग्रंथांचे ('क्लासिक्स') अध्ययन व कन्फ्यूशियसच्या तत्त्वज्ञानाने समोर ठेवलेले आदर्श यांच्या द्वारा भावना व निष्ठा यांची एक एकजीव अशी मोठी शक्तिशाली व्यवस्था उभारलेली होती. ही ऐकात्म्य व्यवस्था इतकी एकात्म व शक्तिशाली होती की, ख्रिस्ती वा इस्लाम धर्मांच्या पर्यायी व्यवस्थांचा चीनमध्ये खरा शिरकाव होऊच शकला नाही. बौद्ध धर्म व ताओ पंथ हे केवळ लोकधर्म बनून राहिले. ते प्रस्थापित समाजव्यवस्थेला आव्हान देऊ शकले नाहीत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

युरपकडे पाहिले तर याउलट चित्र दिसेल, युरप अनेक राष्ट्र-राज्यांमध्ये विभागलेला तर होताच, पण धर्मपीठ व राज्यसत्ता यांच्यातही कलहपूर्ण संबंध होता. रोमन कॅथॉलिक चर्चचे सर्वोच्च धर्मप्रमुख (पोप) व रोमन साम्राज्याचे सम्राट यांच्यातल्या कलहाला एक दीर्घ इतिहास होता. प्रोटेस्टंट रेफर्मेशन या नावाने ओळखली जाणारी धर्मसुधारणेची चळवळ आणि तिच्या विरोधी काऊंटर-रेफर्मेशनची चळवळ यांनी रोमन कॅथॉलिक चर्चमध्येही दोन तट पडले. रोमन कॅथॉलिक चर्च गॅलिलिओची मुस्कटदावी करू शकली व चर्चला ब्रूनोला जिवंत जाळता आले हे खरे. पण इतक्या चिरफळ्या पडलेल्या होत्या की, एका प्रदेशात जे पाखंड समजले जाई त्याला शेजारच्या प्रदेशात मोठी धार्मिक मान्यता प्राप्त होई. अशा चिरफाळलेल्या व्यवस्थेच्या पोटात, त्या 'फटीं'नी निर्माण केलेल्या अवकाशात नवी वेगळी वंडखोर व्यवस्था आकाराला आली. हिला नवीनतेचे भय नव्हते. तथ्याचा स्वीकार करण्यास तिची बांधिलकी होती. पारंपरिक ग्रंथ/शब्दप्रामाण्य तिने झुगारून दिले होते. बाह्य निसर्गसृष्टी वास्तव आहे आणि तीच खरी महत्त्वाची आहे अशी तिने भूमिका घेतली होती. आणि प्रत्येक गोष्टीचा निरीक्षण-प्रयोग यांद्वारा पडताळा घेण्याची व ज्यांचा पडताळा मिळेल त्याच गोष्टी वास्तव म्हणून स्वीकारण्याची या उपव्यवस्थेची ठाम भूमिका होती. ही सारी घडामोड अजूनही काही अंगांनी गूढ राहिलेली आहे. पण एक गोष्ट स्पष्ट आहे की, ऐकात्म्य व्यवस्थेच्या स्वरूपाचा प्रभाव-परिणाम प्रचंड होता. चीनमध्ये रीत व परंपरा यांत न बसणारे विचार, वर्तन निर्मूल करण्यासाठी डोळ्यात तेल घालून काम करणाऱ्या यंत्रणा फार दीर्घकाळ यशस्वीपणे काम करीत राहिल्या. यामुळे चालत आलेल्या व्यवस्थेला नको एवढ्या चिरेबंदी निष्ठेचा लाभ झाला; चालत आलेल्या रीतिरिवाजांना आणि व्यवस्थांना लोक पुरते जखडलेले राहिले. उलटपक्षी, युरोपात प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात उभे ठाकणे तुलनेने सोपे होते. मार्टिन ल्यूथरने पोपविरुद्ध बंडाचे निशाण उंच केले. जागोजागचे राजे रोमन सम्राटाशी द्रोह करून स्वतंत्र झाले. युरपव्यापी सार्विक निष्ठा अशा नव्हत्याच. भिन्न भिन्न प्रदेशांत, लोकांमध्ये वेगवेगळ्या गोष्टींवर निष्ठा होत्या, ज्यांची पोच स्थानिक होती. म्हणजे कोणत्या गोष्टींवर (कोणता राजा, कोणता धर्मपंथ, कोणती विचारप्रणाली इत्यादी) निष्ठा ठेवायची हे ठरवायला माणसे स्वतंत्र होती. यथातथ्यतेवर, सत्यावर निष्ठा ठेवण्यास माणसांची मने स्वतंत्र झाली. अनुभवातून, निरीक्षणामधून, प्रयोगामधून जे सत्य म्हणून सिद्ध होते ते स्वीकारण्याची भूमिका हाच आधुनिक विज्ञानाच्या उदयाचा पाया आहे.

आजच्या काळाकडे आपण वळलो तर, अनेक देशांच्या बाबतीत त्या देशांतील समाजांची एकात्मता साधणाऱ्या ज्या व्यवस्था आहेत त्या व्यवस्था विज्ञानाधिष्ठित तंत्रज्ञानाच्या प्रसाराच्या व अंगिकाराच्या आड येत असल्याचे आढळते. भारताचे उदाहरण लक्षणीय आहे. गावपातळीवरील पारंपरिक ऐकात्म्य व्यवस्था ही कमालीची मजबूत होती. पारंपरिक जातिव्यवस्थेमध्ये प्रत्येकाचे स्थान व काम ठरलेले होते. गोष्टी वेगळ्या पद्धतीने करू पाहणाऱ्या कल्पक, अभिक्रमशील सुधारक व्यक्तीला या व्यवस्थेत जागा करून देणे फार अवघड जाते. अतिशय उच्च कोटीची एकात्मता साध्य झालेल्या व्यवस्थेच्या सुरक्षिततेला, स्थैर्याला व अधिमान्यतेला धोक्यात आणणारा माणूस म्हणूनच अशा सुधारक व्यक्तीकडे पाहिले जाते. पाश्चात्त्य शिक्षण घेऊन प्रस्थापित व्यवस्थेची चौकट फोडून बाहेर आलेल्या व्यक्ती किंवा पाकिस्तानामधून निर्वासित – ज्यांना त्यांच्या पारंपरिक व्यवस्थेमधून हद्दपार केले गेले अशा – म्हणून आलेल्या व्यक्ती यांनीच नवनिर्मितीच्या वेगळ्या वाटा चोखाळलेल्या दिसतात. दक्षिण अमेरिका खंडातील देशांमध्ये समाजाची धारणा धड न साधणारी अतिशय दुबळी अशी ऐकात्म्य व्यवस्था आढळते. आणि त्यामुळे विज्ञानाधिष्ठित तंत्रज्ञानाचा यशस्वी अंगीकार करण्यासाठी तेथे पायाच तयार होऊ शकलेला नाही असे आढळते. अंतर्गत कलह, यादवी यांनी या खंडातील अनेक देश ग्रस्त आहेत. एकात्म समाजाची बांधणीच होऊ शकलेली नसल्याने लष्करी राजवटीच्या आधारेच राष्ट्र-राज्य टिकवून धरावे लागण्याची पाळी पुन:पुन्हा येत राहिली आहे. लष्करी राजवटींना तंत्रवैज्ञानिक प्रगतीमध्ये क्वचितच रस असतो. एकंदरीत पाहता या विषयात मांडले जाणारे सर्व सिद्धान्त चिकित्सक दृष्टीने तपासून घेण्याची निकड सदैव ध्यानात ठेवली पाहिजे. तरी परंतु, समाजात कार्यरत असणारी ऐकात्म्य व्यवस्था आणि तंत्रज्ञान व्यवस्था यांच्यात परस्परांवर खोलवर परिणाम करणारा असा संबंध असतो ही कल्पना फार महत्त्वाची आहे आणि हा संबंध जाणून घेण्यासाठी पुष्कळ अधिक अभ्यास केला जाण्याची गरज आहे.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तंत्रज्ञानाची आंतरिक गतिकी

तंत्रवैज्ञानिक बदलांचा ऐकात्म्य व्यवस्थेवर सतत परिणाम होत असतो; हे बदल तिचा आकार बदलत असतात. याची हवी तेवढी उदाहरणे देता येतील. १८७० नंतरच्या काळात सर्व प्रकारच्या संघटनांच्या आकारमानात वाढ व्हायला सुरुवात झाल्याचे आढळते. मी या घडामोडीचे वर्णन अन्यत्र 'संघटनात्मक क्रांती' असे केले आहे. दूरध्वनी, तार-यंत्रे, डिक्टाफोन आदि दळणवळणाच्या साधनांमधील तंत्रवैज्ञानिक बदलांशी यांचा सरळ सरळ संबंध आहे. कार्यकारी/संचालक मंडळाचे संघटन तसेच नोकरशाही यंत्रणांमध्ये अंमलात आणलेली श्रमविभागणी यासारख्या सामाजिक रीतींमधल्या बदलांशीही याचा सरळ संबंध आहे. या बदलांमुळे/शोधांमुळे संघटनेच्या कमाल ('ऑप्टिमम') आकारमानात प्रचंड वाढ शक्य झाली. जनरल मोटर्स ही मोटारींचे उत्पादन करणारी कंपनी, युनायटेड ऑटो वर्कर्स ही कामगार संघटना, अमेरिकन असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स ही वैज्ञानिकांची संघटना, अमेरिकन मेडिकल असोसिएशन ही डॉक्टरांची संघटना, अमेरिकेचे संरक्षण खाते ('पेंटॅगॉन' या नावाने ओळखले जाणारे), सोविएत रशिया नावाचे संघराज्य, आणि मेट्रोपोलिटन इन्शुरन्स कंपनी ही विमा कंपनी ही सर्व महाकाय संघटनांची उदाहरणे आहेत. या संघटना १८७०च्या आधीच्या काळात अस्तित्वात येऊ शकल्या नसत्या. या प्रकारच्या बदलांमुळे ऐकात्म्य व्यवस्थेतही अनेक प्रकारचे बदल घडून येतात. छोट्या संघटनांवरील निष्ठा व महाकाय संघटनेत काम करणाऱ्यांची त्या संघटनेला असलेली निष्ठा यांत गुणात्मक फरक आहे. छोट्या कुटुंबात कार्यरत असलेली ऐकात्म्य व्यवस्था ही मोठ्या कंपनीत आढळणाऱ्या ऐकात्म्य व्यवस्थेपेक्षा खूप वेगळी असते. संघटनेचे आकारमान जसे मोठे होते तसे चालत आलेल्या प्रथा, रीती, रूढी यांच्या आधारे व्यवहार करण्याऐवजी कराराच्या आधारे व्यवहार करण्याकडे, तसेच पारस्परिकतेऐवजी कराराच्या आधारे विनिमय व्यवहार करण्याकडे वाटचाल होते. दुसरीकडे, संघटना मोठ्या झाल्या की, त्यांच्या आपसातील संबंधांमध्येही बदल घडून येतो. संघटनांचे आकारमान छोटे असते तेथे स्पर्धा खऱ्या अर्थाने समसमान व खुली असते. पण जेव्हा काही संघटना आकाराने प्रचंड मोठ्या बनतात तेव्हा अशा काही वेचक महाकाय संघटनांचे प्रभुत्व प्रस्थापित होण्याच्या दिशेने वाटचाल होते. ही गोष्ट आर्थिक व्यवहारांच्या क्षेत्रात जशी आढळून येते तशीच ती राष्ट्रांच्या समुदायामधील परस्परसंबंधांच्या क्षेत्रातही आढळून येते. काही थोड्या महासत्तांचे वर्चस्व जगात प्रस्थापित होते. अधिमान्यतेच्या संरचनेच्या स्वरूपावर याचा खोलवर परिणाम होतो.

दळणवळणाच्या क्षेत्रात जी तंत्रवैज्ञानिक क्रांती घडून आली आहे तिचा संघटनाच्या घाटावर व आकारमानावरच मोठा परिणाम घडून येत आहे असे नाही. मॅकलुहन यांनी सुचविल्याप्रमाणे, ज्ञानसंपादन करण्याच्या प्रक्रियेचे सारे रूपच पालटून गेले आहे. समाजाची संरचना व मनोधारणा यांच्यावरही प्रचंड परिणाम झालेला आहे. सामाजिक बदलाच्या साऱ्या गतिकीमध्ये ज्ञान संपादन केले जाण्याची प्रक्रिया ही पायाभूत प्रक्रिया आहे. दूरदर्शनचे उदाहरण घ्या. तंत्रवैज्ञानिक बदलांच्या निखळ आंतरिक गतिकीमधून दूरदर्शनचा शोध लागला असे म्हणता येईल. दूरदर्शन या माध्यमाचा प्रसार झाल्यामुळे जीवनाच्या सर्व अंगांमध्ये बदल घडून आले आहेत. कुटुंबव्यवस्था व वातावरण, राजकारण, विषय प्रतिपादण्याची रीत, नाटक व अन्य कला आणि औपचारिक शिक्षण या सर्वांवर दूरदर्शनचा खोलवर आघात झाला आहे व त्या आघातामधून या सर्व क्षेत्रांमधील व्यवहारांचे वळण बदलले आहे. ज्या ज्या पारंपरिक समाजांमध्ये दूरदर्शनचा प्रसार झाला तेथे तेथे दूरदर्शनने खळबळजनक परिणाम घडवून आणला आहे. आज दूरदर्शनवरच पोसली गेलेली एक सबंध पिढीच्या पिढी आपल्या डोळ्यांसमोर निपजली, वाढली आहे. वाढत्या वयात मुले पूर्वी आपल्या पालकांकडून ज्ञान, रीतिभाती, संस्कार, श्रेयकल्पना, नीतिविचार, मूल्ये आत्मसात करीत असत. आज दूरदर्शन एका प्रकारे पालकांबरोबर स्पर्धा करीत असते. दूरदर्शनवर जे पाहतो ते प्रमाण मानावयाचे की पालक सांगतात ते? पालकांच्या अधिकाराला आव्हान उपस्थित झाले आहे. यामुळे मुलांच्या मानसिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये खोलवर मोठे बदल घडून आले आहेत. दूरदर्शनमुळे आपल्याला मनोविश्लेपणशास्त्राची ('सायकोॲनॅलिसिस') फेरमांडणी करावी लागणार आहे. आपल्या अवतीभवतीच्या स्थानिक समुदायाशी पूर्वी आपली मनोमन जवळीक असे. दूरदर्शनच्या माध्यमामधून आपण जगाच्या दूरवरच्या प्रदेशांशी सरळ जोडले जातो. त्यामुळे स्थानिक समुदायच काय पण राष्ट्रीय समाजाविषयीही वाटणारी जवळीक दूरदर्शन नष्ट करीत आहे. सारी पृथ्वी म्हणजे एक अवकाशयान आहे ('स्पेसशिप अर्थ') ही प्रतिमा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

भविष्यकाळाच्या संदर्भात अगदी चपखल आहे. अंतराळातून घडणारे पृथ्वीचे दर्शन, अवकाशात भ्रमण करणारा हा पृथ्वी नावाचा ग्रह हे भावी काळाचे प्रतीक आहे. मानवजातीचे पृथ्वीव्यापी संघटन घडून येत आहे. दूरदर्शनमुळे जगातली अंतरे मिटली आहेत. मनाची जडणघडणही मग वेगळी व्हावी हे स्वाभाविकच म्हणायला हवे.

तंत्रज्ञान व्यवस्था ऐकात्म्य व्यवस्थेवर किती व कशी खोलवर व सार्वत्रिक परिणाम करते याचे दुसरे उदाहरण मोटार व तिच्याच जातकुळीतील खनिज इंधनावर चालणारी अन्य वाहने हे आहे. स्वयंचलित वाहने ही मुख्यत्वेकरून तंत्रवैज्ञानिक प्रगतीची फलश्रुती, देणगी आहे. या वाहनांनी आपल्या शहरांचा घाट पार बदलून टाकला आहे; कुटुंबसंस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणले आहे; मानवी संबंधांचे चित्र बदलले आहे. किरकोळ व्यापाराचा आकृतिबंधही पार बदलून टाकला आहे. ही वाहने आपल्या जीवनात येऊन साठसत्तर वर्षे झाली. त्यांनी घडवून आणलेल्या बदलांचा साक्षात अनुभव आपण घेत आहोत. पण त्यांच्याविषयीची जाण आजही फारशी आढळत नाही. ऐकात्म्य व्यवस्थेचे शहर हे एक रूप आहे. शहरांची एकात्मताच या वाहनांनी नष्ट केली आहे. समाजाच्या वर्गीय रचनेची पुष्टी एका टोकाला या वाहनांमुळे झाली आहे तर समाजातल्या वर्गीय विभागणीचा पायाच या वाहनांच्या मोठ्या प्रमाणावरील प्रसार व वापर यांमुळे उखडला गेला आहे. या वाहनांमुळे एक फार मोठा मध्यमवर्ग अस्तित्वात आला आहे. त्याच वेळी असा एक छोटा दारिद्र्यपीडित वर्ग निर्माण झाला आहे की, ज्याचे दारिद्र्य निवारता येत नाही. या दरिद्री लोकांची एक उप-संस्कृतीच आकारास आलेली आहे. यामुळे गुन्हेगारीच्या स्वरूपात व पोलिसी खात्याच्या चालचलणुकीत फरक झालेला आहे. याने जननदरावर परिणाम झालेला आहे. अविवाहित राहणे अवघड झाले तर दुसऱ्या टोकाला अविभक्त एकत्र कुटुंब ही व्यवस्थाही मोडकळीस आली. मोटारीत मावू शकेल एवढे छोटे चौकोनी कुटुंब हे आता सामाजिक व्यवहारांच्या साठी मुख्य एकक ठरले आहे.

शस्त्रास्त्रांच्या विषयात तंत्रवैज्ञानिक प्रगती झाली तिचा आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर अतिशय महत्त्वाचा परिणाम झाला आहे. सरंजामशाहीचा नाश घडवून आणण्यात सर्वात जास्त हातभार बंदूक/तोफ यांच्यासाठी वापरात येणाऱ्या दारूच्या शोधाने लावला. दारूगोळ्यांचा शोध वापरात आल्यावर आपल्या आश्रित-अंकित प्रजेचे संरक्षण करणे सरंजामदार-उमरावांच्या आवाक्याबाहेरचे झाले. त्यामुळे सरंजामदार-उमराव व त्याची अंकित प्रजा यांच्यातील 'विनिमय शर्ती' (एकाने संरक्षणाची हमी द्यावयाची व त्या हमीच्या मोबदल्यात प्रजेने सरंजामदाराची शोषक, लहरी, जुलमी राजवट स्वीकारावयाची) फार एकतर्फी झाल्या; प्रजेला त्या अनुकूल राहिल्या नाहीत. कारण सरंजामदार त्यांचे आता संरक्षण करू शकत नव्हता. दारूगोळ्याच्या तंत्रज्ञानामुळे सरंजामशाही निष्ठेचे दिवस भरले आणि राष्ट्र-राज्यावरील निष्ठा उत्कर्ष पावल्या, कारण प्रजेचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य तिच्यापाशी होते. आज अण्वस्त्रांचा शोध लागल्यावर आणि अर्धी पृथ्वी ओलांडून लक्ष्यावर अचूक मारा करण्याची क्षेपणास्त्रे हाती आल्यावर ही शक्यता फारच आहे की राष्ट्र-राज्यावरील निष्ठा शबल बनतील, कारण राष्ट्र-राज्यसत्ता नागरिकांच्या संरक्षणाची हमी घेऊ शकणार नाही. लष्करी दृष्टीने विचार करता, एका मर्यादेपर्यंत राष्ट्र-राज्य ही व्यवस्था नागरिकांचे संरक्षण करू शकते; अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे यांच्या आधारे युद्ध खेळले जाणार असेल तर ते युद्ध यशस्वीरीत्या खेळणे वा युद्ध रोखणे यापैकी कोणतीही गोष्ट एकेका राष्ट्राच्या आवाक्यातली राहात नाही. राष्ट्राचे सार्वभौमत्व ही पवित्र गोष्ट आहे; कोणत्याही परिस्थितीत राष्ट्राचे सार्वभौमत्व अबाधित राहिले पाहिजे व राष्ट्र अभंग राहिले पाहिजे ही भावना/मनोधारणा मग नष्ट होईल. नागरिकांच्या जीवाचे व मालमत्तेचे रक्षण देश करू शकत नाही ही गोष्ट स्पष्ट झाल्यावर मग, 'आम्ही आमच्या देशासाठी काय म्हणून कोणताही त्याग करावा, बलिदान द्यायला तयार व्हावे' हा प्रश्न नागरिक विचारणारच, व त्यांनी तो विचारावा ही गोष्ट समजू शकते. राजांचे व सम्राटांचे दिवस भरले व ते जसे लुप्त झाले तसे येत्या शंभर वर्षांच्या कालावधीत राष्ट्र-राज्यांचेही अस्तित्व संपुष्टात येईल ही गोष्ट अगदी शक्य आहे. राष्ट्र-राज्याला स्वतःची अधिमान्यता राखावयाची असेल तर, शस्त्रबळाच्या जोरावर अन्य राष्ट्र-राज्यांवर आक्रमण करण्याचे सामर्थ्य हे स्वतःच्या अधिमान्यतेचे अधिष्ठान राष्ट्र-राज्याला त्यागावे लागेल. ही एक मोठी उपरोधाची गोष्ट भासेल, पण एकतर्फी निःशस्त्रीकरण हीच खरी परिणामकारक व पर्याप्त राष्ट्रीय संरक्षणाची हमी आहे, असा निष्कर्ष व्यवहार्य ठरेल ही गोष्ट शक्य आहे. ऐकात्म्य व्यवस्थेवर तंत्रज्ञानाचे जे परिणाम झाले त्यामधूनच हा सगळा बदल घडून आला आहे.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

या संदर्भात आपण जी काही विधाने करू ती तपासून घेत राह्यला हवीत अशीच असतील; 'दगडावरची रेघ' असा दावा त्यांच्या वाजूने करणे गैर होईल. तंत्रवैज्ञानिक व्यवस्थेचे परिणाम मोठे व दूरवर पोचणारे असतील इतकेच आपण खात्रीपूर्वक म्हणू शकतो.[४]

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा धर्मसंस्था, धार्मिक व्यवहार यांच्यावरही परिणाम झाला आहे. या विषयावरही पुष्कळ काही लिहिले गेले आहे, पण परिणामांचे नेमके ज्ञान फारसे नाही. विश्वाची उत्पत्ती, जडणघडण व उत्क्रांती याविषयी आज विज्ञानाने जी मांडणी केलेली आहे त्याने विभिन्न धर्मांमध्ये विश्वाची उत्पत्ती, जडणघडण व व्यवहार यांच्यावद्दल ज्या अधिकृत मांडण्या केल्या गेल्या आहेत त्यांच्यावर खोलवर आघात झालेला आहे. जीवसृष्टी, मनुष्यजात यांची पृथ्वीवर निर्मिती कशी व कोणी केली याही वावतीत वैज्ञानिक जगतात शिष्टमान्य असलेली मांडणी (उत्क्रांतिवाद) आणि धर्मांमध्ये केल्या गेलेल्या मांडण्या यांत अंतर आहे आणि वैज्ञानिक मांडणीचा आघात धार्मिक श्रद्धांवर, सिद्धान्तांवर खोलवर झालेला आहे. मनुष्यस्वभावप्रकृती व नीतिविचार यांविषयी विभिन्न धर्मांनी जे सत्य म्हणून सांगितले आहे ते विज्ञानाच्या आधारे केलेल्या मांडणीपेक्षा वेगळे आहे. याही वावतीत विज्ञानाच्या उत्कर्षाचा मोठा आघात झाल्याचे आपणांस आढळून येते. इटालियन महाकवी दांते यांनी पाताळ व नरक यांच्या पृथ्वीवरील भौगोलिक स्थानाविषयी ख्रिश्चन धर्मग्रंथात दिलेली माहिती श्रद्धापूर्वक खरी मानली असण्याची काही शक्यता आहे. पण आज आपण दक्षिण ध्रुवावर प्रत्यक्ष पाऊल ठेवले असल्याने, नरक कोठे असलाच तर तो दक्षिण ध्रुवावर नाही हे ज्ञान आपणांस आहे. रोमन कॅथॉलिक चर्चच्या शिकवणीप्रमाणे विश्वाची रचना तिमजली होती. तळघरात नरक, पहिल्या मजल्यावर पृथ्वी आणि वरच्या मजल्यावर स्वर्ग. कोपर्निकसच्या सूर्यकेंद्री मांडणीमुळे विश्वरचनेचे हे चित्र कायमचे पुसले गेले. लैंगिक व्यवहार आणि संततिनियमन या दोन विषयांमध्ये धर्मांची पारंपरिक शिकवण आधुनिक वैद्यकाच्या आघाताखाली मूलतः वदलून घ्यावी लागली आहे. मृत्यूचे प्रमाण खाली आणणे, आयुर्मर्यादा लांबविणे या अर्थाने मृत्यूचे नियमन आणि संततिनियमन यांची जोडगोळी आहे. मृत्यूचे नियमन करण्यात आलेल्या यशामुळे संततिनियमन हाती घेणे अनिवार्य ठरले. ग्रंथप्रमाण्य व शब्दप्रामाण्य यांना नकार देणे हे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे एक अंग आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनामधून धर्मग्रंथांची ऐतिहासिक चिकित्सा होऊ लागली, परंपरा काय प्रमाण व सत्य मानते ते डोळे मिटून स्वीकारण्याऐवजी इहलौकिक पुराव्यांच्या आधारे त्याचे सत्यत्व व प्रामाण्य पडताळून पाहण्यावर भर दिला गेला तशी धर्मसंस्थेची व धार्मिक शिकवणुकीची सर्वंकष पकड ढिली पडली. या सर्व आपत्ती कोसळल्यावरही, त्यांचा सामना करीत धर्म आपला प्रभाव टिकवून आहे, आणि धर्म नाहीसे होतील याचे कोणतेच चिन्ह दिसत नाही. अमेरिकेमध्ये ६४ टक्के लोक चर्चचे सभासद आहेत. हे प्रमाण गेली दोनशे वर्षे सतत वाढतच गेले आहे ही लक्षात घेण्याची गोष्ट आहे. युरोपात नाझीवाद/फॅसिझम यांचा पाडाव झाल्यावर ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षांनी लोकांचा पाठिंबा मिळविला. साम्यवादी देशांमध्येही धर्मसंस्था ढासळत गेल्याचे दृश्य आढळत नाही; तिने स्वतःचे स्वत्व व अंतःसामर्थ्य टिकवून धरण्यात यश प्राप्त केले आहे. या राजवटींमध्ये धर्मसंस्थेचा व धार्मिक लोकांचा सौम्य स्वरूपात जो छळ झाला त्याने कस लागून धर्माची परिशुद्धी झाली असेच म्हटले पाहिजे. जपानमध्ये अनेक नवे धार्मिक पंथ गेल्या शंभर वर्षांमध्ये उदयास आले. वौद्ध धर्माला नवे धुमारे फुटत आहेत आणि वौद्ध धर्माला नवे तेज चढत असल्याचे दिसत आहे. अठराव्या शतकातील 'प्रवोधन युगा'तच ज्यांची मने अजून वास करीत आहेत – आणि वरेच वुद्धिवंत मनाने त्याच काळात आजही वावरत आहेत – ते या वास्तवाने चकित होतात. पण ही वस्तुस्थिती आहे याची दखल घ्यावीच लागेल. वैज्ञानिक व तंत्रवैज्ञानिक वदलांचे आघात पचवून, स्वतःमध्ये अनुरूप वदल घडवून आणण्याची अपवादभूत क्षमता धर्मांनी प्रकट केली आहे.

पारंपरिक रीतभात विरुद्ध करार

विभिन्न व्यवस्थांमधील आघात-प्रत्याघात व आंतरसंवंध कमालीचे गुंतागुंतीचे आहेत. हे गुंतागुंतीचे संवंध उलगडण्याची एकच एक गुरुकिल्ली नाही. अशी एक गुरुकिल्ली घेऊन सर्व दालनांची कुलपे काढण्याची गोष्ट जो कोणी करू पाहील त्याला लौकरच हे लक्षात येईल की, सगळ्या कुलपांना एक किल्ली चालत

४ स्वयंचलन व संगणकांचा परिणाम यावर लिहिण्याचे मी विचारपूर्वक टाळले आहे याचे मुख्य कारण या दोन विषयांवर इतके लिहिले गेले आहे आणि तरीही त्यांच्या परिणामांविषयी वस्तुतः आपले ज्ञान फार कमी आहे!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नाही. इतिहासाच्या ओघात मानवजातीची वाटचाल 'फ्रॉम स्टेटस टु कॉन्ट्रॅक्ट' अशी होत आली आहे अशी उपपत्ती सर हेन्री मेन यांनी मांडली. ही समाजशास्त्रातली एक प्रसिद्ध उपपत्ती आहे. अर्वाचीन काळाच्या अगोदरच्या काळातील पारंपरिक समाजांमध्ये समाजाची धारणा करणारी ऐकात्म्य व्यवस्था व्यक्तींचे सामाजिक स्थान व त्यांनी वठविण्याची भूमिका नेमून देत असे. व्यक्ती कोणत्या जातीत, वर्गात, खानदानात जन्माला आली आहे यावरून या गोष्टी ठरत. म्हणजे जन्माधिष्ठित दर्जा महत्त्वाचा होता. व्यक्तीव्यक्तींमध्ये 'करार' होऊन भूमिकांचे वाटप होत नसे. अर्वाचीन काळामध्ये व्यक्तीचे गुणविशेष, कौशल्ये, क्षमता, कर्तृत्व यांनुसार सर्वांना समानत्वाने संधी देणाऱ्या एका खुल्या विनिमय व्यवस्थेमध्ये, उभयपक्षी, गरजू व्यक्तींमध्ये विशिष्ट 'करार' होतात. हा करार केला जात असताना उभय व्यक्तींचा जन्मजात दर्जा विचारात घेतला जात नाही. युरोपच्या इतिहासात सरंजामशाही व्यवस्थेच्या जागी भांडवलशाहीची प्रतिष्ठापना झाली तसा असा बदल घडून आला आहे असे म्हणता येते ही गोष्ट खरी आहे.

विमा व्यवसायाचा उदय-उत्कर्ष हे या बदलाचे उद्‌बोधक उदाहरण आहे. जुन्या काळी वृद्धापकाळ, अपघात, मृत्यू अशा प्रसंगी/अवस्थेत सांभाळ केला जाण्याची हमी देणारी कोणती विमा कंपनी नव्हती; कोणीच विमा उतरवीत नसे. पारंपरिक ऐकात्म्य समाजव्यवस्थेतले तुमचे स्थान हीच विमा पॉलिसी असे. पालक वा साधु-संन्यासी वा सरंजामदाराचा आश्रित वा आणखी कोणच्या स्थानामुळे (स्टेटस) तुमच्या अडचणीच्या काळात योग्य व्यक्तींकडून सांभाळ केला जाई. आज अपघात, वृद्धापकाळ, आजारपण वा अन्य आपत्तींच्या काळात आपली व्यवस्था व्हावी यासाठी आपण आपल्या समाजव्यवस्थेतील स्थानावर विसंबून नसतो. आपण विमा कंपनीशी, काही उभयमान्य शर्तीवर विमा उतरवून, करार करून आपली व्यवस्था करतो. साम्यवादी देशांमध्ये, तसेच भांडवलशाही राष्ट्रांमध्ये कल्याणकारी राज्याची कल्पना मूर्त करण्याच्या दिशेने वाटचाल झाली याचा एक अर्थ असा की, करार पद्धतीचा अवलंब करून – विनिमय व्यवस्थेच्या चौकटीत – आपत्तीच्या काळात अनेकांचा सांभाळ केला जाऊ शकत नाही याचा अनुभव आला. आणि त्यामुळे पुन्हा एकदा व्यक्तीच्या स्थानाशी निगडित अशी व्यवस्था काही प्रमाणात कार्यान्वित केली जात आहे. खाजगी क्षेत्रातील विमा कंपनीकडे उतरविला जाणारा विमा आणि शासनाकडून काही शर्तीच्या पालनाच्या मोबदल्यात व्यक्तीला तिच्या किमान उपजीविकेची दिली जाणारी हमी ('सोशल सिक्युरिटी') या दोन्हींचे स्वरूप जरी कराराचे असले तरी या दोहोंमध्ये एक महत्त्वाचे अंतरही आहे. शासन आपल्या उपजीविकेची हमी घेते तेव्हा त्याचा आधार नागरिक हे समाज-व्यवस्थेतील आपले स्थान हा असतो. खाजगी विमा कंपनीशी होणाऱ्या करारामध्ये स्थानाचा काही विचार नसतो. करार ते स्थान अशी 'उफराटी' वाटचाल – जर तिचे असे मूल्यांकन करावयाचेच असले तर – आपणांस साम्यवादी देशांमध्ये विशेष ठळक स्वरूपात झालेली आढळते. साम्यवादी देशांमध्ये व्यक्ती ही समष्टीशी एकरूप मानलेली असते. समष्टीसाठी व्यक्तीने आत्मसमर्पण करावयास हवे, भविष्य उज्ज्वल हवे असेल तर वर्तमानकाळात त्याग व बलिदान करण्यास पुढे आले पाहिजे या प्रकारचे आवाहन सतत करून, त्याचा प्रचंड प्रभाव निर्माण करून लोकांकडून काम करवून घेण्याचा प्रयत्न जर यशस्वी झाला नाही तर उघडीवाघडी जुलूम-जबरदस्ती हाच एक मार्ग ऐकात्म्य व्यवस्थेच्या – राज्यसत्तेच्या – हाती शिल्लक राहतो. समाजात आत्मीय एकात्म संबंध निर्माण करणे आणि विशुद्ध पारस्परिकतेच्या आधारे समाजाची धारणा यशस्वीपणे करणे ही गोष्ट किती अवघड आहे याचे साम्यवादी देश हे एक अतिशय उद्‌बोधक उदाहरण आहे. निखळ विनिमयावर आधारलेल्या व्यवस्थेमधून अनिवार्यतः विषमता उत्पन्न होते व वाढीस लागते; अन्याय, शोषण, पिळवणूक यांचे मूळ विनिमयावर सर्व व्यवहार उभारण्यात आहे, या धारणेपोटी, या गैर गोष्टींना विरोध करण्याच्या, त्यांचे उच्चाटन करण्याच्या भूमिकेमधून समाजवाद/साम्यवाद या विचारप्रणालीचा प्राधान्येकरून उदय झाला. पैशासाठी नाही तर प्रेमासाठी लोक एकमेकांसाठी साऱ्या गोष्टी करतील अशा प्रकारच्या समाजाच्या निर्मितीची आस पण समाजवादाच्या उदयामागे होती. आवळा देऊन भोपळा काढण्याच्या स्वार्थी, लोभी वृत्तीवर व्यापारी विनिमय चालतो, त्याऐवजी निःस्वार्थी वृत्तीने सेवा करण्याच्या उदात्त भूमिकेतून सर्व व्यवहार जेथे होतील असा, जेथे सारा समाज म्हणजे एक विशाल एकत्र सुखी कुटुंबच जणू असेल असा समाज निर्माण करणे हे समाजवादाचे स्वप्न होते. दुर्दैवाची गोष्ट अशी की, लाभासाठी परस्परांनी राजीखुषीने मान्य केलेल्या शर्तीवर चालणाऱ्या विनिमय व्यवस्थेचे – बाजारपेठी व्यवस्थेचे – आणि तिचा आधार असलेल्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

खाजगी मालमत्तेच्या हक्काचे उच्चाटन केले की त्यांच्या जागी समाजवादी तत्त्वांवर चालणारा एकात्म समाज आपसूकपणे व अटळपणे अस्तित्वात येत नाही. आदर्श एकात्म व्यवस्थेच्या निर्मितीच्या प्रयत्नात किती चटकन जुलूमजबरदस्तीचा आश्रय घेतला जाऊ शकतो याचे भयचकित करणारे दर्शन आपणांस स्टालिनच्या कारकीर्दीत घडले. याहीपेक्षा अधिक भीषण व अमानुष अशा एकात्म व्यवस्थेचे दर्शन हिटलरच्या नाझी जर्मनीत घडले. उदारमतवादी भांडवलशाहीविषयीच्या ज्या असमाधानापोटी साम्यवादाची विचारप्रणाली उत्कर्ष पावली त्याच प्रकारच्या असमाधानापोटी नॅशनल सोशालिझम ('नाझीवाद') ही विचारप्रणालीही उदयास आली ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे.

या लेखात मी एक छोटीशी गोष्ट साधली आहे. अभ्यासाचा एक मोठा, विस्तृत असा विषय मी समोर ठेवण्याचे काम केले आहे. समाजाची धारणा करणाऱ्या ऐकात्म्य व्यवस्थेचे रहस्य आपणास फारच थोडे उलगडले आहे. तंत्रज्ञानाच्या गतिकीची जाण आपणांस जेवढी आहे तेवढीही एकात्मता निर्मितीच्या प्रक्रियेविषयी आपणांस माहिती नाही. आणि, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील घडामोडींमागची गतिकीही आपणांस फारशी उमगलेली आहे असे कोठे आहे? मात्र एका गोष्टीविषयी माझी पक्की खात्री पटली आहे. तंत्रज्ञान व्यवस्था आणि ऐकात्म्य व्यवस्था या दोन मोठ्या गतिमान व्यवस्थांच्या परस्परांशी होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांच्या सखोल अभ्यासामधूनच आपणास समाजाच्या वाटचालीच्या गतिकीविषयी ज्ञान व जाण प्राप्त होईल. तंत्रज्ञान व्यवस्थेत होणाऱ्या बदलांमागे कोणती गतिकी कार्यरत आहे याविषयी आपण अमेरिकन लोक संवेदनशील आहोत. पण ऐकात्म्य व्यवस्थेची गतिकी जाणून घेण्याविषयी कमालीची अनास्था आपल्या ठायी आढळते. भिन्नवंशीय लोकांमध्ये एकात्मता साधावी, शिक्षणाच्या क्षेत्रातून वंशभेद नाहीसे व्हावेत या दृष्टीने काही ऐकात्म्य धोरणे आपण अंगिकारिली आहेत असे म्हणता येईल. तसेच आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये सामंजस्य, एकात्मता निर्माण करण्यासाठी काही धोरणात्मक पावले आपण टाकायला सुरुवात केली आहे (उदा., सांस्कृतिक देवाण-घेवाण) असे म्हणता येईल. पण समाजामध्ये एकात्मता निर्माण करणाऱ्या व्यवस्थेच्या गाभ्याशी कोणते तत्त्व, सूत्र वा मूल्य आहे याविषयी आपल्या ठायी स्पष्टता नाही. आपण ज्या गांभीर्याने इतर विषयांचा अभ्यास करतो तेवढ्याच गंभीरतेने व उत्कटतेने समाजातील दैनंदिन व्यवहारामध्ये प्रेमाचे तत्त्व कसे अंतर्भूत करता येईल, प्रेम हा लौकिक व्यवहारांचा पाया कसा ठरेल याचाही विचार आपण करावयास हवा असे मी अनेक वर्षे आवर्जून प्रतिपादन करीत आहे. पण बहुधा माझे म्हणणे चेष्टेवारी उडवून लावले जाते. ज्या गोष्टींचा उपदेश केला जातो (उदा., खरे बोलावे, भूतमात्रांवर प्रेम करावे) त्या गोष्टी गंभीरपणे घ्यायच्या नसतात हा बोध आपल्या मनात पक्का ठसविला गेला आहे असे दिसते. ही सर्वात महागडी घोडचूक ठरण्याचा संभव आहे. आपण केलेली सारी तंत्रवैज्ञानिक प्रगती व साधलेली सारी आर्थिक भरभराट यांच्यामधून जर परस्परांवर प्रेम करण्यास असमर्थ असा, जबरदस्ती केल्याशिवाय निष्ठा न बाळगणारा, आणि स्वतःची अधिमान्यता प्रस्थापित करू वा टिकवून धरू न शकणारा असा समाजच अखेरीस आपण उभारणार असलो तर आपली सर्व तंत्रवैज्ञानिक व आर्थिक सिद्धी व्यर्थ जाणार आहे.

पत्रव्यवहार

नवभारत डिसेंबर १९९७ मध्ये श्री. शरद् पाटील यांनी त्यांच्या लेखात सत्यवतीबद्दल माहिती सांगितली आहे. ती शूद्रवर्णीय होती की क्षत्रीयवर्णी, ह्याचा नेमका उलगडा श्री. पाटील यांनी त्या ठिकाणी केला नाही. तो काळ मातृसावर्ण्याचा होता असे श्री. पाटील यांनी म्हटले आहे. मग सत्यवती क्षत्रीय ठरण्यासाठी तिची आई क्षत्रीय असावी लागणार. पण श्री. म.अ. मेहेंदळे यांच्या खुलाशाप्रमाणे सत्यवतीची आई अद्रिका नावाची अप्सरा होती. म्हणून मग सत्यवती ही क्षत्रीय ठरत नाही. मग तिची मुले शंतनूच्या नंतर गादीवर कशी बसली? ह्याचा उलगडा श्री. पाटील ह्यांनी करावा.

– *देवीदास बागूल*

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

रणजित देसाई यांची *स्वामी*

आ.ना. पेडणेकर

छत्तीस वर्षे झाली तरीही रणजित देसाई यांची *स्वामी* कादंबरी आजही लोकप्रिय आहे. तिच्या २४हून अधिक आवृत्त्या निघाल्या आहेत. मात्र तिचा सर्वांगीण अभ्यास झालेला नाही. प्रकाशित झाल्यावर श्री. शंकर सारडा यांना ती 'एक दर्जेदार कलाकृती' वाटली. प्रा. दमयंती पांढरीपांडे यांना त्यांचे मत तेव्हाच 'वादग्रस्त' वाटले. कित्येकांना ती गौरवशाली भूतकालासाठी आवडते. मात्र श्री. वि.स. खांडेकरांना, देसाईंनी केलेले इतिहासाचे उदात्तीकरण रुचले नव्हते.

प्रा. ना.सी. फडके म्हणतात त्याप्रमाणे, बहुतेक 'ऐतिहासिक कादंबऱ्यांना चरित्राचे रूपच' येते. *स्वामी* मधे थोरले माधवराव पेशवे यांचे १७६१-१७७२ या कालखंडातील कर्तृत्व, यशापयश सरळ कालक्रमानुसार चित्रित केलेले आहे. 'शेवटच्या, रमाबाईच्या सती-सोहळ्याने त्या कर्तृत्वाला मानवंदना दिली आहे,' असे कुरुंदकरांना वाटले होते. *स्वामी*त माधवराव केंद्रभागी आहेत हे खरे आहे.

तरीही ही काही एकपदरी सरळ चरित्रकथा नाही. माधवराव या मुख्य व्यक्तीभोवती राघोबा, रमाबाई, गोपिकाबाई, सखारामबापू, निजाम, हैदर अशा अनेक व्यक्ती आहेत. माधवरावांशी त्यांचे जुळणारे-बिघडणारे संबंध अनेक आशयवलये निर्माण करतात. माधवरावांचा इतरांवरील प्रभाव महत्त्वाचा आहे. इतरांचा माधवरावांवरील प्रभावही दुर्लक्षित करण्याजोगा नाही. घटनांबाबतही हेच म्हणता येईल.

प्रस्तावना सोडल्यास संहितेसाठी ३८० पृष्ठे आहेत. कादंबरीत स्थूल मानाने १२० प्रसंग आहेत. पाच-सहा विषय प्राधान्याने आलेले आहेत. प्रत्येकाला मिळालेला भार लक्षात घेतला पाहिजे. म्हणजे लेखकाने कोणत्या गोष्टींना महत्त्व दिले आहे, त्याचा मुख्य दृष्टिकोण कोणता हे समजून येईल.

राघोबा-माधवराव संबंधाने एक-चतुर्थांश भाग व्यापला आहे. निदान २४ प्रसंगांतून त्यांचे संबंध, परस्परांबद्दलच्या प्रतिक्रिया आढळतील. माधवरावांचे करारी, संभ्रमित, अगतिक, निष्ठुर असे विविध पैलू दिसतात. राघोबाचीही स्वार्थी, अविचारी, हलक्या कानांचा, उतावळा, तडफदार, लहरी, पश्चात्तापदग्ध इ. विविध रूपे दिसतात. आळेगावला माधवराव राघोबास शरण जातात. राक्षसभुवनाच्या लढाईत माधवराव राघोबास वाचवतात. माधवराव नंतर काकास कैद करतात. मृत्युशय्येवर माधवराव नारायणास राघोबाच्या हाती सोपवतात.

रमा-माधवराव संबंधांनीही जवळजवळ २४ प्रसंग व्यापलेले आहेत. हे कौटुंबिक चित्रण बरेचसे काल्पनिक, वादग्रस्त आहे. अल्पवयाच्या रमेबरोबरचे संवाद फडकेटाइप रोमँटिक असेही आहेत. माधवराव रमेला निसर्ग, मृत्यू, व्याधी, स्वकर्तृत्व यांबद्दलची चिंतने ऐकवतो. रमेला सती जाण्यापासून परावृत्त करू नये अशी इच्छा मृत्युपत्रात माधवरावांनी व्यक्त केली होती (संदर्भ : *गोविंदपंत बुंदेल्यांची कागदपत्रे*). त्यांनी कादंबरीत रमेला केलेला त्याबद्दलचा आग्रह पुरेसा स्पष्ट वाटत नाही. क्षयी पती आणि अजाण पत्नी ह्या गोष्टी देसाईंनी फारशा लक्षात घेतलेल्या नाहीत.

कादंबरीचा एक-पष्ठांश भाग माधवरावाच्या मोहिमांना वाहिलेला आहे. १६-१७ प्रसंगांतून कर्नाटकातील चार, निजामाविरुद्ध दोन, नागपूरकर भोसल्यांविरुद्ध दोन, हबशीशी दोन अशा मोहिमांची वर्णने आहेत. त्यातून माधवरावांचे डावपेच, शौर्य, नेतृत्वगुण, शिस्तप्रियता, संकटातही असणारी अविचल वृत्ती यांचे दर्शन होते.

कादंबरीच्या ५८ व्या पृष्ठापासून माधवरावांच्या आजारांचे उल्लेख येऊ लागतात. असे बारा-तेरा प्रसंग आहेत. प्रारंभी जिद्द, नंतर दैववाद, नंतर व्याधी-मृत्यू यांचा धैर्याने केलेला स्वीकार, रमेला दिलेला धीर, वेदनेतून क्रोधपूर्ण वागणे ह्या गोष्टी हेलावून टाकतात. वैद्यकीय उपचार आणि त्याचबरोबर रमेने आणि इतरांनी केलेले धार्मिक विधी यांनीही बराच भाग व्यापला आहे.

तीस-बत्तीस प्रसंगांतून शिस्तप्रियता, कठोर व्यवहार, प्रशासन, दूरदृष्टी, लष्करी डावपेचांची जाण, इतरांच्या रास्त मतांचा आदर, मुत्सद्देगिरी, जबाबदारीची जाणीव यातून माधवरावांचे राज्यकर्ता म्हणून विलोभनीय दर्शन घडते. अतिरेकी धार्मिक कर्मकांडाबाबतचा रामशास्त्र्यांचा इशारा ते मानतात.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मारेकरी घालणाऱ्या जाधवास दूरदृष्टीने माफ करतात. अनेकांची वेइमान उघड करणारी पत्रे जाळतात. निजाम, इंग्रज अधिकारी यांच्याशी ते फायदेशीर करार करतात. प्रसंगी राघोवाशी मवाळपणे वागतात, प्रसंगी कठोरपणेही. राज्यासाठी वैयक्तिक आवडीनिवडी वाजूला सारतात. अनेकांना उदारपणे क्षमा करतात.

सात-आठ प्रसंगांतून नियतीचे स्पष्टपणे दर्शन घडते. माधवरावांना वडिलांपासून राज्य मिळाले तसाच क्षयरोगही मिळाला. (मात्र याचा कादंवरीत स्पष्ट उल्लेख नाही.) रूढीमुळे एरव्ही (त्यावेळी तरी) लायक राघोवास पेशवेपद मिळत नाही. ऐन वेळी राघोवा अन्यत्र गडवड करतो. गोदावरीच्या पुराची निजामास पळून जायला मदत होते. रमावाई केवळ कर्मकांडातच गुंतून राहते. निःपक्षपाती न्याय न समजणारी आई माधवरावांच्या नशिवी येते. हिकमती वापू राघोवाच्या वाजूस जातो. सुखलाल सदाशिवरावासारखा दिसतो आणि तोतयाच्या वंडाची कटकट निस्तरणे माधवरावांना भाग पडते. माधवराव स्वतः दैववादी होते. (समोर येणारा हत्ती पाहून 'काय होईल ते होणार' असे म्हणत दूर झाले नाहीत अशी कथा सांगितली जाते.) दैवदुर्विलासिताचे सावट असलेली ही कहाणी आहे.

ही कादंवरी कितीशी ऐतिहासिक आहे? (कादंवऱ्यांचे ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक इ. भेद राजवाडे यांच्या मते निरर्थक आहेत.). *स्वामी* मध्ये पेशवेकालीन वातावरण, सामान्यांचे जीवन यांचे येणारे चित्रण वादग्रस्त आहे, तसेच अपुरेही आहे. अन्य कालात वावरतो असे वाचकांना वाटावे असे फार थोडे चित्रण आहे. कर्तवगार माणसाच्या दीप्तीतील अन्य पात्रे यांचे दर्शन होते, ते पुरेसे नाही. पानिपतच्या वाताहतीनंतर पेशव्यांनी गाठलेला उत्कर्षकाल कादंवरीत आहे. प्रारंभी पानिपत संग्रामाचे आघात, विधवांची प्रचंड संख्या, समाजात आलेले नैराश्य जाणवत नाही. पेशव्यांच्या वाड्यातही पुसट पडसाद उमटत नाहीत. रमा-माधवांचे कौटुंविक जीवन, श्रीपती-मैनेचे प्रेमप्रकरण वगळता अन्य व्यक्ती, घटना इतिहासाला धरून आहेत. पानिपतच्या अपयशाने खचलेले जनजीवन पार्श्वभूमीला नाही. माधवराव, नाना, होळकर यांना भयानक भूतकाळाच्या क्वचितच आठवणी येताना आढळतात. स्वतः माधवराव वडिलांवरोवर पानिपतच्या दिशेने जाऊन अर्ध्यावरून मागे आले होते. कादंवरीत त्यावद्दल काहीच स्मृती नाहीत. पुणे शहरात, वाड्यात, राज्यात विधवांची संख्या वेसुमार होती. पण त्यांची जाणीव कादंवरीत होत नाही. आजारी माधवरावांच्या भेटीला गंगापुराहून गोपिकावाई एकदा १७७१ साली आल्या होत्या पण परिणामकारकतेसाठी तो प्रसंग गाळलेला आहे. गोपिकावाई-रमावाई यांचे पटत नसे. दोघीत कुरवूर चालू असे. आदर्श संसारचित्र दाखवण्यासाठी देसाईंनी तिकडे दुर्लक्ष केले आहे. रमावाई धार्मिक कर्मकांडात गुंतलेली असे. तिने अनेक तीर्थस्थळांना भेटी दिल्या, वर्षासने सुरू केली. मात्र कादंवरीत हरिहरेश्वरच्या भेटीचा तेवढा उल्लेख आहे. आनंदीवाईला *पांडवप्रताप*, *हरिविजय* यांतील मजकुरावद्दल अज्ञान होते असे दाखवले आहे. ते खरे नव्हे. तिच्याकडे चांगला धर्मग्रंथसंग्रह होता. रमावाईने सती जाताना रामशास्त्र्यांना हिऱ्याची अंगठी दिली हा तपशील देसाईंना कुठे आढळला? माधवरावांना वरे वाटावे म्हणून अनेक धर्मक्षेत्री नेले होते. त्यांचा उल्लेख नाही. कटोऱ्यास त्यांची सुवर्णतुला झाली होती तिचा उल्लेख नाही. फक्त थेऊरचा शेवटी उल्लेख आहे.

माधवरावांमध्ये घटनाक्रमांना समजून घेणारी चिंतनशीलता नाही, हे नरहर कुरुंदकरांचे निरीक्षण वरोवर आहे. माधवरावांच्या अंतरंगाची ओळख न होणे ही कादंवरीतील कलात्मकतेच्या दृष्टीने मोठी उणीव आहे. केवळ रूढीमुळे कर्तवगार काकाला गादी मिळाली नाही हा विचार माधवरावांच्या मनात कधीच येत नाही. पानिपतच्या अपयशाचे पडसाद मनात उमटत नाहीत.

गोपिकावाई, सावत्रआई राधावाई ह्या दोघीही सती गेल्या नाहीत. मात्र नानासाहेवांची रखेली सती गेली. रमेने सती जावे असा आग्रह धरणाऱ्या माधवरावाच्या मनात यावद्दल काहीच विचार कसे आले नाहीत? मोहिमेत गावे वेचिराख होतात यावद्दल त्यांना एकदाच, फक्त एकदाच वाईट वाटते. पुणे शहराला नुकसानभरपाई दिली तशी इतर गावांना द्यावी, असे वाटले नाही काय? वेठविगारीविरुद्ध एकदाच कृती करताना दिसतात. लोककल्याणाची कामे करण्याऐवजी दौलत सांभाळणे आणि वेळीअवेळी धार्मिक कर्मकांडे करवून घेणे यात वराच वेळ जाताना दिसतो. आईवडिलांच्या दराऱ्यात आपण वाढलो ही एकमेव आठवण त्यांना होते. त्यांचे शत्रूला मित्र करण्याचे डावपेच चांगले रंगवलेले आहेत.

प्रा. म.वा. धोंड यांनी *स्वामी*च्या भाषेवर आक्षेप घेतले आहेत. त्यांचा *जाळ्यातील चंद्र* मधील लेख मुळातून वाचायला हवा. वखरीतील काही वाक्प्रचार देसाईंना वापरता आले

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

असते. सेवानिवृत्ती, मानबिंदू असे आधुनिक शब्द वापरायला नको होते. 'तुमचे जे नुकसान झाले ते सांगा, ज्यांनी मदत केली त्यांपैकी तुम्ही एक' असले आंग्लाळलेले प्रयोग टाळायला हवे होते. रांड (विधवा), फडकीण (फडकेवाई), गनीम (मराठे), दौलत (राज्य) असे मूळ शब्दच वापरायला हवे होते. ठसठशीत प्रतिमांतून खूप परिणाम साधता आला असता. उदा., शहराचा चिंधीचोळा केला, पेशवे धोत्रे वडवायला लागतील, शेणामेणाचा आहे तो लोखंडाचा होण्याआधी मोंगल गार झाला, पृथ्वीचा पाटावरवंटा केला, धण्यास दिगंबर करतील.....

वीस-पंचवीस ठिकाणी तरी कर्मकांडांची कौतुकपर वर्णने आहेत. होमहवने, अनुष्ठाने, देवालयांचे जीर्णोद्धार, वेलभंडार, त्रिसुपर्णाचा घोप, पापाचे प्रायश्चित्त, मृत्युंजय जप, गजाननावर संततधार इ. सतीच्या सोहळ्याचे वर्णन अतिशय भाविकतेने केले आहे. त्या प्रथेतील अमानुषता जाणवू नये, ही प्रथा म्हणजे काहीतरी दिव्य, अलौकिक, अनुकरणीय आहे असे वाचकांना वाटावे असा लेखकाचा उद्देश असावा अशी शंका यावी.

*स्वामी*च्या लोकप्रियतेची कारणे कोणती असावीत? नव्या महाराष्ट्राला एक आणखी दैवत लाभले. बारा वर्षांत माधवरावांनी उत्कर्ष साधला. पठाण-रोहिल्यांवर सूड उगवला. दक्षिणेवर कावू मिळवला. त्यांचे शिस्तशीर प्रशासन, मुत्सद्देगिरी, लष्करी डावपेचातील कुशलता इत्यादींमुळे ते आदर्श राज्यकर्ते वाटले. गतकाळातील परकीयांवरील विजय पुन्हा आठवण्यात आनंद, अभिमान वाटतो. नियती अखेरीस प्रभावी असते हे पटवून घ्यायला आवडते. पराक्रमी जीवनाला दैवदुर्विलासिताची जोड असल्याने नायकाकडे सहानुभूती जाते. माधवरावांवर ओढवलेल्या संकटांनी निर्माण होणारा भावकल्लोळही वाचकांना आवडतो. वेगाने धावणाऱ्या घटनांचे कालक्रमानुसारी निवेदन विनासायास समजून सहज रंजन होते म्हणून ही कादंबरी आवडते.

श्री. नंदा खरे यांनी *अंताजीची बखर* या कादंबरीत मराठ्यांच्या तथाकथित पराक्रमाचे वास्तव वर्णन करतानाच उपरोधाचा आश्रय घेऊन खऱ्या सत्याकडे लक्ष वेधले आहे. 'प्रत्येक इतिहास हा समकालीन इतिहास आहे', अशी दृष्टी असायला हवी. श्री. वि.स. खांडेकरांनी म्हटले आहे, 'भूतकाळातील त्याज्य टाकायला हवे. जे कालबाह्य आहे त्याची भलावण करता कामा नये... *स्वामी*तील इतिहासाचे उदात्तीकरण मला रुचणारे नाही.' नवऱ्याची इच्छा प्रमाण मानून, कर्मकांडात बुडालेल्या रमेच्या सती जाण्याचा गौरव करायला नको होता. त्या प्रथेमागील अमानुषता अधोरेखित व्हायला हवी होती. सती जाणाऱ्या रमेच्या पोषाखांचं, दागिन्यांचं, दातृत्वाचं गौरवशाली वर्णन टाळायला हवे होते. अनेक कर्मकांडांसाठी झालेल्या प्रचंड अपव्ययाबद्दल लेखकाने काही ठाम भूमिका घेतली नाही. घेतली असली तर अंध भाविकांची घेतली आहे. रामशास्त्र्यांनी न्याय करण्याऐवजी माधवरावांनीच अधिकाऱ्यास थोबाडणे, फटके मारणे, ४०० सैनिकांचे हातपाय तोडणे या गोष्टी वेदनेपोटी केल्या तरी समर्थनीय नव्हत्या असे वाचकांस वाटायला हवे होते. समर्थ प्रशासक माधवरावांनी रूढीबाहेर, कर्मकांडांबाहेर जाऊन लोककल्याणाची कामे केली असती का असा संदेह पडतो. येनकेन प्रकारेण दौलत सांभाळणे हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी शत्रू मित्र होत, मित्र शत्रू होत. तिथे धर्माचा प्रश्न येत नव्हता. केवळ दौलत राखण्याची स्ट्रॅटेजी होती. 'माधवरावांनी त्या समाजस्थितीस अनुसरून समता आणली' हा चरित्रलेखक श्री. स.अ. सहस्रबुद्धे यांचा दावा फोल आहे. थोरले माधवराव आणखी काही काळ जगते तरीही मराठेशाही फार काळ तगली असती असे नव्हे, असे काही इतिहासकारांचे मत आहे.

*स्वामी*त काही कलात्मकतेच्या जागा आहेत. शिकाऱ्याकडून चिंकारा मारला जातो तो प्रसंग माधवरावांचा एकाकीपणा सुचवतो. माधवराव-निजाम भेटीत दोघांची मैत्री वहरून येताना दिसते. माधवरावांच्या मृत्यूपूर्वीचे थेऊरचे वातावरण विलक्षण जिवंत, रेखीव झाले आहे. राक्षसभुवनाच्या लढाईतील हालचालींचे वर्णनही प्रत्ययकारी वाटावे. संधिसाधू, बुद्धिमान बापूंचे व्यक्तिचित्र जिवंत आहे. 'इतरांच्या पापांचे प्रायश्चित्त म्हणून मला व्याधींना तोंड द्यावे लागते' हे माधवरावांचे उत्तर अंतर्मुख करणारे आहे. दौलत सांभाळण्यासाठी असलेल्या माधवरावांच्या गुणांचे दर्शन देसाई चांगल्या तऱ्हेने घडवतात. कधी दरारा, कधी शोक, कधी संशय, कधी उत्साह, कधी क्लेश, कधी संभ्रम यांनी भरलेल्या शनिवारवाड्याचे वातावरण जिवंत झाले नाही. मात्र थेऊरचा परिसर खूप जिवंत झालेला आहे.

'ईट आला देवाचा' असं म्हणणारी निंबाळकरांची म्हातारी, 'यात्रेचा काही उपयोग झाला नाही' असा आक्रोश करणारी रमा, 'क्षत्रियकर्तव्ये आधी करा' असे माधवरावांना बजावणारे रामशास्त्री ही माणसे काही काळ का होईना भाविक मनाच्या श्रद्धेला छेद देतात. पण असे क्षण विरळाच.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

स्वामी कादंबरी अनेक अंतर्विरोधांवर तोललेली आहे. शत्रूंवर मात करणाऱ्या माधवरावांवर व्याधीच्या रूपाने मृत्यू मात करतो. माधव-राघोवा यांचे नाते पुष्कळदा प्रेम-द्वेषाचे आहे. माधवरावांना राघोवा कधी गंगोदक वाटतो, कधी देशद्रोही वाटतो. पुणेकरांस निजामाने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळते, अन्य गावांना नाही. दैववादी माधवराव काही वेळा ग्रहस्थितीची पर्वा करीत नाही. धार्मिक रमेला 'कुठे आहे परमेश्वर' असा शेवटी प्रश्न पडतो. गोपिकाबाई मुलापासून दूर जाते तरीही माय-लेकात प्रेमाचा पत्रव्यवहार असतो. कादंबरीचा प्रारंभ करारी प्रशासक अशा माधवरावाच्या दर्शनाने होतो तर शेवट थेऊरच्या अगतिक रुग्ण माधवरावांच्या अवस्थेने होतो. ज्याची कित्येक वेळा कानउघाडणी केली, ज्याला कठोर शिक्षा केली त्या राघोवाकडेच शेवटी माधवराव नारायणाला सोपवतात. पानिपतचा पराभव पुसून काढला ही वार्ता येत तेव्हाच माधवरावांचे दुखणे विकोपास जाते. कादंबरीच्या मध्याला चुलता-पुतण्या यांच्या मनमोकळ्या गप्पा होतात. तो भाग अंतर्विरोध मिटलेला असा आहे. तोतयाच्या परीक्षेच्या वेळीही काही क्षण दोन्ही पारडी तुल्यबळ होतात. निजाम, हैदर, मराठे यांची मैत्री-शत्रुत्वाची समीकरणे सारखी बदलत असतात. ज्याला अनेकदा शिक्षा केली त्याच बापूंकडून त्याने राज्याचे स्वप्न पुरे करावे, अशी माधवराव अपेक्षा करतात.

चुकीची दुरुस्ती

डॉ. रावसाहेब कसबे यांच्या पुस्तकावरील श्री. शरद् पाटील यांच्या समीक्षे (*नवभारत*, डिसेंबर ९७) संबंधी काही मुद्दे *नवभारता*च्या मे १९९८च्या अंकात मी मांडले आहेत त्यांत पृ. २१ वर चौथा मुद्दा मांडताना माझ्या हातून परस्परसंबद्ध दोन चुका झाल्या आहेत. चुकांबद्दल मी दिलगीर आहे. ह्या चुका व्हायला नको होत्या, त्या कशा झाल्या ह्याचे मलाच आश्चर्य वाटते.

(१) पहिली चूक अशी की सत्यवती ही दाशराजाची स्वतःची मुलगी असल्याचे मी मानले. वस्तुतः ती राजा वसु उपरिचराची कन्या हे सर्वश्रुत आहे. राजाला ती अद्रिका नावाच्या अप्सरेपासून झाली. (महाभारतातील कथेप्रमाणे अद्रिकेला मिळालेल्या शापामुळे ती मत्सी झाली होती. त्या अवस्थेत तिने वसु उपरिचराचे नदीत पडलेले वीर्य ग्रहण केले आणि त्यापासून तिने एक मुलगा आणि एक मुलगी अशा जुळ्याला जन्म दिला.) काही कोळ्यांना ती मत्सीच्या उदरात सापडली. कोळ्यांनी राजाला हे सांगितल्यावर त्याने मुलाला ठेवून घेतले आणि मुलगी दाशराजाला पालनपोषणार्थ दिली. ती ही सत्यवती. एका दाशाने तिला सांभाळले म्हणून ती दाशकन्या (१.९४.४४) अथवा दाशेयी (१.९४.४५). ह्या साऱ्या वस्तुस्थितीचे मला विस्मरण व्हायला नको होते.

(२) दुसरी चूक अशी की, "अपत्यं चैतदार्यस्य यो युष्माकं समो गुणैः। यस्य शुक्रात्सत्यवती प्रादुर्भूता यशस्विनी।।" (आदिपर्व ९४.७१) हा श्लोक दाशराज स्वतःला उद्देशून म्हणत आहे असे मी मानले. हा त्याचा श्लोक त्याला स्वतःला उद्देशून असणे शक्य नाही ही गोष्ट माझ्या नजरेतून सुटली. ह्या श्लोकात सत्यवती ही भीष्मासारख्या एका आर्याची मुलगी आहे असे दाशराज स्वतः भीष्माला सांगत आहे.

सत्यवतीच्या जन्माविषयीची वस्तुस्थिती काहीकाळ विसरल्यामुळे वरील चुका झाल्या.

चूक मान्य केल्यावर आता ह्या श्लोकाविषयी एक विचार मांडतो. सत्यवतीच्या जन्माचे संपूर्ण रहस्य कुणालाच माहीत नव्हते. दाशराजाला फक्त ती आपली मुलगी नाही एवढेच माहीत होते. सत्यवती स्वतःला दाशकन्या आहे असेच मानते (१.९४.४४), आणि ती तशी आहे असे मानूनच शंतनु तिला मागणी घालतो. तशाच समजुतीने भीष्म दाशराजाकडे जातो. सत्यवतीच्या कुलशीलाविषयी दाशराजाला कोणी विचारले नव्हते. तरी "क्षत्रियांसारखे गुण असलेल्या एका आर्याची ही मुलगी आहे" असे दाशराज भीष्माला ठामपणे सांगतो आणि सत्यवतीही खरी दाशकन्या नव्हे हे गुह्य प्रकट करतो. सत्यवती दाशकन्या असली तरी तिचा शंतनूचा विवाह होण्यास आणि तिच्या मुलांना राज्य मिळण्यास शंतनू, भीष्म किंवा त्यांच्या वृद्धामात्याला काही अडचण वाटली नाही. तथापि सत्यवती ही खरी दाशकन्या नव्हे, आर्यकन्या आहे असे भीष्मादिकांना कळलेले असावे ह्या हेतूने हा श्लोक कोणीतरी मागाहून भर घातला असावा असे म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाही.

– *म.अ. मेहेंदळे*

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वाद-संवाद

तत्त्वज्ञान आणि विज्ञान

देवीदास बागूल

'चार्वाकाचे पुनरुज्जीवन (१)' (*नवभारत*, मार्च १९९८) या त्यांच्या लेखात अर्जुनवाडकरांनी म्हटले आहे की, "साळुंख्यांच्या या प्रतिपादनात पुष्कळ घोटाळे आहेत. पहिला घोटाळा हा की, ते तत्त्वज्ञान आणि त्याचं उपयोजन यांचा काला करतात. काय आहे हे सांगणं तत्त्वज्ञानाचं काम आहे; काय करावे हे सांगणं, उपयोजनाचं. वैराग्यदृष्टी हे उपयोजन आहे, म्हणजे एक जीवनदृष्टी आहे, आणि ती यतिधर्माशी निगडित असून जैन आणि बौद्ध धर्मातही आपलं स्थान टिकवून आहे."

अर्जुनवाडकरांनी म्हटलं आहे की, 'काय आहे हे सांगणं तत्त्वज्ञानाचं काम आहे; काय करावं हे सांगणं उपयोजनाचं.'

इथेच थोडा भेद आहे. तत्त्वज्ञानाचं काम, काय आहे हे सांगणं असं खरंच आहे काय? तत्त्वज्ञान म्हणजे काय? आणि विज्ञान म्हणजे काय? दोन्ही शब्दांत ज्ञान हा शब्द आहे. तरीसुद्धा तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांच्या अर्थात फरक आहे. काय आहे हे सांगणं विज्ञानाचं काम आहे. इतके दिवस विज्ञान सांगत होतं की फक्त पदार्थ आहे. आणि तत्त्वज्ञान सांगत होतं की शक्ती आहे. (पण कसली शक्ती? ते नंतर पाहू.) पण आता विज्ञान सांगतं की पदार्थ नाही, तर ऊर्जा आहे. अणू तोडल्यामुळे विज्ञान सांगू लागलं की, शेवटी पदार्थ नसून ऊर्जा आहे. आणि तत्त्वज्ञानही आधीपासून सांगत आहे की, ऊर्जा आहे. त्या ऊर्जाला तत्त्वज्ञान आत्मा, चैतन्य असंही म्हणतं. मग विज्ञानाची ऊर्जा आणि तत्त्वज्ञानाची ऊर्जा एकच आहे काय? या प्रश्नाचं उत्तर मिळण्यासाठी अगोदर तत्त्वज्ञान म्हणजे काय ते समजावून घेऊ.

तत्त्वज्ञान ह्या शब्दात तत्त्व आणि ज्ञान असे दोन शब्द आहेत. तत्त्व म्हणजे तत्+त्व. उपनिषदांनी हा तत् शब्द वापरला आहे. त्यांनी ईश्वर शब्द वापरण्याऐवजी तत् शब्द वापरला. जगात सर्वत्र तत् आहे. ते आहे. जगात सर्वत्र 'ते' आहे असं पाहणं म्हणजे तत्त्व. तेपणा आहे याचं ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान. म्हणूनच तत्त्वज्ञान या शब्दाचं इंग्रजीत भाषांतर होऊ शकत नाही. पुन्हा एक आणखी गोष्ट लक्षात घ्यायची आहे. तत्त्वाचं ज्ञान म्हणजे तत्त्वाची माहिती नव्हे, परिचय नव्हे. या ठिकाणचा ज्ञान शब्दाचा अर्थ अनुभव असाच घ्यावा लागतो. जगात सर्वत्र 'ते पणा' भरलेला आहे असा अनुभव आलेल्या माणसालाच आपल्याकडे तत्त्वज्ञानी म्हणत असत. आणि ह्या अर्थानं संत तत्त्वज्ञानी होते. एकनाथांनी सर्वत्र 'ते पणा' अनुभवला म्हणून तहानलेल्या गाढवाला गंगाजल पाजलं. एकनाथ ते गंगाजल रामेश्वरला वाहण्यासाठी घेऊन चालले होते. पण वाटेत भेटलेल्या गाढवात त्यांना रामेश्वराचा 'ते पणा' दिसला. रामेश्वर आणि गाढव यात एकच 'तत्त्व' आहे, 'ते पणा' आहे याचा अनुभव एकनाथांना आला. तापलेल्या वाळवंटात महाराचे पोर आणि ईश्वर या दोहोत 'ते पणा' पाहूनच एकनाथांनी ते पोर उचलून कडेवर घेतले. एकनाथ रोडगे भाजत होते. एक कुत्रं आलं आणि एक रोडगा उचलून पळू लागलं. एकनाथ तुपाची वाटी घेऊन त्या कुत्र्याच्या मागे धावू लागले. म्हणाले, 'देवा, रोडगा नुसता खाऊ नका, ह्या तुपाशी खा. नुसता खाल्लात तर पोट दुखेल.' एकनाथ असं म्हणाले, कारण कुत्र्यामध्येसुद्धा त्यांना तत्त्व दिसलं, 'ते पणा' दिसला.

'विज्ञान' शब्दातल्या ज्ञान शब्दाचा अर्थ परिचय, माहिती असा आहे. Knowledge असा नाही, acquaintance असा आहे. ओळख, परिचय असा आहे. म्हणून knowledge is power यात 'ज्ञान म्हणजे शक्ती' असा जो आशय आहे त्यासाठी ते ज्ञान म्हणजे, अनुभवाचे ज्ञान. आणि असे अनुभवाचे ज्ञान असले तरच ती शक्ती – power प्राप्त होते, एरवी नाही. कंदिलाच्या तापलेल्या काचेला हात लावला तर हात भाजतो ही माहिती झाली. अनुमान झाले. हे अनुमान, ही माहिती असूनसुद्धा लहान मूल कंदिलाला हात लावतेच. कारण अजून माहितीचे knowledge मध्ये रूपांतर झालेले नसते. एकदा का हात भाजला की मग रूपांतर होते. मग knowledge ही शक्ती प्राप्त होते आणि ते मूल कंदिलाच्या तापलेल्या काचेला हात लावत नाही.

म्हणूनच तत्त्वज्ञान आणि विज्ञान या दोन शब्दांतील ज्ञानाज्ञानात फरक आहे. तत्त्वज्ञानातील ज्ञान या शब्दाच्या अर्थाबाबत गहन परिमाण आहे. या ज्ञानात जाणणे आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जगणे यात बिलकूल अंतर नाही, काडीमात्र अंतर नाही. या ठिकाणी तो अर्थ जगलात, तरच तो अर्थ जाणलात असं होईल. जेथे टु वी इज द ओन्ली वे टु नो.

विज्ञानातले ज्ञान असे आहे की, आपण पूर्वी जसे आहोत तसेच राहिलो तरी ज्ञान मिळवतो. एखादा गणित शिकतो, इतिहास शिकतो, आणखी काही शिकतो. ते शिकण्यासाठी त्या माणसाला स्वतःमध्ये वदल करावा लागत नाही. तो जसा आहे तसाच राहूनसुद्धा, म्हणजे रागीट असेल, तिरसट असेल, तर तसाच रागीट आणि स्वार्थी राहूनसुद्धा तो गणितामध्ये ज्ञानी होईल, इतिहासात व्यासंगी होईल.

पण तत्त्वज्ञानाच्या वावतीत रूपांतराशिवाय चालणारच नाही. ते रूपांतरण झाले नाही, तर काहीच समजणार नाही. तो पंडित होईल, पण संत होणार नाही. म्हणून तत्त्वज्ञान, वैराग्य, संत हे सगळे शब्द एकाच अर्थाचे आहेत. अर्जुनवाडकरांनी म्हटलं आहे की, 'काय आहे हे सांगणं तत्त्वज्ञानाचं काम आहे; काय करावं हे सांगणं, उपयोजनाचं. वैराग्यदृष्टी हे उपयोजन आहे.' हे म्हणणे वरोवर नाही. तत्त्वज्ञान तेव्हाच होतं जेव्हा वैराग्यदृष्टी वाणली असेल. वाणणे वेगळे, आणि माहीत असणे वेगळे.

पुन्हा या ठिकाणी वैराग्यदृष्टीचाही अर्थ समजून घेतला पाहिजे. वैराग्यदृष्टी प्राप्त झाली म्हणजे कशातच आवड राहिली नाही असा सर्वसाधारणपणे अर्थ केला जातो. जेथे जेथे माणसाला आवड निर्माण होते, राग म्हणजेच रस निर्माण होतो, तेथून तेथून स्वतःला दूर ठेवणे म्हणजे विरागी होणे, असा अर्थ केला जातो. वासनेपासून, रागापासून, आवडीपासून दूर राहणे म्हणजे वैराग्य असे म्हटले जाते. पण जेव्हा माणूस अशा रीतीने स्वतःला आवडीच्या पदार्थापासून, रागाच्या पदार्थापासून रोखत असेल तेव्हा तो एक प्रकारे दुसऱ्या टोकाला जाऊन थडकलेला असेल. विरुद्ध टोकावद्दल राग म्हणजेच आवड निर्माण केलेली असेल. म्हणजेच त्याने एका पदार्थाऐवजी दुसरा पदार्थ निवडला. तिकडे तो ओढला गेला. त्या विपयी त्याच्या मनात राग म्हणजे आवड निर्माण झाली. म्हणजे पुन्हा एका रागाच्या ऐवजी दुसरा राग आला. वैराग्य नाहीच आले. विगतः रागः; राग, आवड गेली असे झालेच नाही.

"मेरे मन ने कहा, यह वड़ा भवन मुझे मिल जाए, पर मैंने कहा कि नहीं लूंगा। मैं उदासीन हूं, मैं इस महल की तरफ देखूंगा ही नहीं। मैं सिर नीचा करके, आंख वन्द करके गुजर जाऊंगा। मैं उदासीन नहीं रहा, मैंने पक्ष ले लिया। मेरे भीतर दो पक्ष हो गए। एक, जो मांग करता था कि यह महल मिल जाए, और एक जो कहता था कि नहीं, महल से क्या होगा? इन पक्षों में मैंने एक पक्ष ले लिया, तो मैं उदासीन न रहा। उदासीन का अर्थ है कि मन का एक कोना कहता है महल मिल जाए, मन का एक कोना कहता है कि नहीं लेंगे, क्या रखा है महल में! तो इन दोनों के प्रति जो दूर खड़ा रहे, तटस्थ रह जाए, न्यूट्रल हो जाए, चुनाव न करे, च्वायसलेस हो। मन की ये दोनों वात चलती रहें, लेकिन द्वन्द्व में से कुछ भी न चुने।

"उदासीनता अचुनाव है। चुनाव ही नही करता। इसलिए उदासीन धन्यभागी है, क्योंकि उदासीन दुखी नहीं हो सकता। वह कहता है, हम मन का कोई भी विकल्प नहीं चुनते। हम मन में चुनाव ही नहीं करते। न यह, न वह। न पक्ष, न विपक्ष। हम तटस्थ हैं।

"उदासीनता वडी अद्‌भुत शांती है, क्योंकि जव आप चुनाव ही नहीं करते, तो धीरे-धीरे दोनो द्वन्द्व मर जाते हैं। और जिस दिन मन का द्वन्द्व सूख जाता है, उसी दिन मन भी सूख जाता है।" *(रजनीश/निर्वाण उपनिषद्)*

वैराग्याचा हा अर्थ लक्षात घेतला तर अर्जुनवाडकरांनी सांगितलेली चंद्रगुप्त, विक्रमादित्य, शालिवाहन, शातवाहन, रामदेवराय ही पराक्रमी नावे गैरलागू ठरतात. वैराग्यदृष्टी असलेल्यांची नावे घ्यायची तर पतंजली, शंकराचार्य, मीरा, कवीर, रामकृष्ण, गाडगेवावा अशीच नावे घ्यावी लागतात. रामकृष्णांना विचारले की लग्न करणार काय? तर, हो म्हणाले. आणि लग्न लावल्यावर शारदा ही शारदामाँ झाल्या. चुनाव नाहीच. फक्त परस्त्री मातेसमान मानणारा लोक सोडून रामकृष्णांनी परलोकात राहून स्वस्त्रीसुद्धा मातेसमान मानली. स्वस्त्री आणि परस्त्री अशी निवड, असा चुनाव त्यांनी केला नाही. मीरेनेही राजा भोजशी लग्न केले. चुनाव नाहीच. पण तिने जे पद गायिले त्यात तिने म्हटले आहे की,

करना फकिरी फिर क्या दिलगिरी। सदा मगन में रहनाजी।।
कोई दिन जोड़ी कोई दिन वंगला। कोई दिन जंगल वसना जी।।
कोई दिन हाथी, कोई दिन घोडा। कोई दिन पैदल चलना जी।।
कोई दिन भोजन, कोई दिन लाडू। कोई दिन फाकम फाका जी।।
कोई दिन ढोलिया, कोई दिन तलाई। कोई दिन भुईपर लोटना जी।।
मीरा कहे प्रभू गिरीधर नागर। आये पड़े सो सेहना जी।।

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ग्रंथ-समीक्षण

तटस्थ इतिहासकाराची वस्तुनिष्ठ दृष्टी?

वसंत पळशीकर

सत्तांतर १९४७ (खंड ३), गोविंद तळवलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७, रु. १५०.००

श्री. गोविंदराज तळवलकर दीर्घकाळ दै. 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक होते. महाराष्ट्रातीलच नव्हे तर महाराष्ट्रावाहेरील मराठीभाषिक उच्चशिक्षित मध्यमवर्गात त्यांचे नाव घरोघर झाले. त्यांच्या अग्रलेखांच्या लेखनशैलीची तुलना लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'तील अग्रलेखांशी केली गेली आहे. यापेक्षा अधिक मोठा वहुमान मराठी संपादक – पत्रकारासाठी असू शकणार नाही.

गोविंदरावांची ग्रंथसंपदाही वऱ्यापैकी दखल घेण्याजोगती आहे. ग्रंथवाचन हा त्यांचा विरंगुळा आहे. १९८३ साली *सत्तांतर १९४७* या नावाने भारताला मिळालेल्या स्वातंत्र्याच्या घडामोडीवर द्वि-खंडात्मक ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केला. तिसरा खंड गतवर्षी प्रसिद्ध झाला. तिन्ही खंडांचे प्रकाशन मौज प्रकाशन गृहाने केले आहे. मौज प्रकाशन गृहाशी प्रा. श्री. पु. भागवत यांचे नाव वाचकांच्या मनात जोडलेले राहिले आहे. प्रकाशन 'मौज'चे आहे म्हटले की त्याला एक वजन व अधिमान्यता प्राप्त होते.

सत्तांतर १९४७ च्या ३ ऱ्या खंडाच्या वेष्टनावर म्हटले आहे की, १८५७ चे वंड ते १५ ऑगस्ट १९४७ रोजी उदयाला आलेले स्वातंत्र्य या नव्वद वर्षांच्या काळातील ऐतिहासिक सत्तांतराचा साक्षेपी इतिहास या ग्रंथात आहे. "श्री. गोविंद तळवलकर यांनी या अनेकपेडी सत्तांतराचे निवेदन तटस्थ इतिहासकाराच्या वस्तुनिष्ठ दृष्टीने केले आहे.... त्यांचे घटनांचे व व्यक्तींचे मूल्यमापन मार्मिक आहे.... आधुनिक भारताच्या राजकीय इतिहासावरील मराठी ग्रंथांत 'सत्तांतर १९४७' या ग्रंथाचे स्थान अनन्यसाधारण आहे."

तिन्ही खंडांचे एकत्रित परीक्षण करता आले असते. पण येथे ३ऱ्या खंडाचे तेवढे विस्ताराने परीक्षण केले आहे. श्री. गोविंदराव तळवलकर यांच्यासारखा ज्येष्ठ, अभ्यासू व मातवर लेखक आणि मौज प्रकाशन गृहाने या ग्रंथावर आपली उठविलेली मुद्रा या दोन्ही गोष्टी विशेष असल्याने काहीशा विस्ताराने परीक्षण केले आहे. *सत्तांतर १९४७* चे आधीचे दोन खंड येथे विचारात घेतलेले नसले तरी ते पूर्वीच वाचलेले आहेत, ही गोष्ट येथे नमूद करावयास हवी.

१९८३ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या *सत्तांतर १९४७* या द्विखंडात्मक पुस्तकाविषयी गतवर्षी प्रसिद्ध झालेल्या ३ऱ्या खंडाच्या 'प्रस्तावने'त श्री. गोविंदराव तळवलकरांनी लिहिले आहे : "ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारास मर्यादा घालणारा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने केल्यापासून इ.स. १९४७ च्या ऑगस्टमध्ये भारत स्वतंत्र होईपर्यंत कोणते घटनात्मक बदल झाले याची चर्चा त्या पुस्तकाच्या दोन खंडांत केली आहे." जवावदार प्रातिनिधिक राज्यव्यवस्था भारतात प्रस्थापित करण्याच्या दिशेने क्रमशः टाकली गेलेली पावले हे भारतावरील साम्राज्यवादी ब्रिटिश राजवटीचे एक स्वागतार्ह अंग होते यात काही शंका नाही. 'लोकमताच्या दवावा'पोटीच ही पावले टाकली गेली असे नाही; तर, इंग्लंडमधील राजकीय विचार-प्रणाली, राजकीय पक्षांचे राजकारण आणि अनेक उच्चपदस्थ शास्ते यांनाही याचे श्रेय आहे. हे 'कथानक' नाट्यपूर्णही आहे. यात जसे काही 'नायक' आहेत तसे काही 'खलनायक'ही. लॉर्ड रिपन हे 'नायक' तर लॉर्ड कर्झन हे 'खलनायक'. पण कर्झन यांच्या कारकीर्दीतही त्यांनी काही मोठ्या हिताच्या गोष्टी केल्या, आणि त्यामुळे पूर्ण काळ्या रंगाने रंगवावीत अशी व्यक्तित्वे अपेक्षेच्या मानाने कमी. ब्रिटिश राजवटीचे एक अत्यंत वाचनीय, रोमांचक, नाट्यपूर्ण चित्रण फिलिप मेसन यांच्या द्विखंडात्मक ग्रंथात वाचावयास मिळते : *'मेन हू रूल्ड इंडिया* : खंड १ – *द फाऊंडर्स*; खंड २ : *द गार्डियन्स*. तेव्हा गोविंदरावांनी घटनात्मक बदलांची चर्चा करणारा ग्रंथ लिहावयाचा वेत करणे ठीकच होते.

एक 'पण' आडवा येतो. *सत्तांतर : १९४७* चे दोन खंड

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

त्यावेळी वाचतानाही आडवा आलेला. हे शीर्षक पुस्तकाला त्यांनी का दिले? एक संभाव्य उत्तर असे की, प्रा. निकोलस मॅनसर्घ यांनी संपादित केलेला *द ट्रान्स्फर ऑफ पॉवर* हा अनेकखंडी ग्रंथ गोविंदरावांच्या मनाची पकड घेऊन होता. हा ग्रंथ हे ब्रिटिश सरकारचे अधिकृत प्रकाशन आहे. ग्रंथाला दिलेले नाव, म्हटले तर, अचूक आहे. ज्या काळात सत्तांतर करण्याच्या संदर्भातील घडामोडी चालल्या होत्या त्या काळातले दस्तऐवज या ग्रंथाच्या अनेक खंडांमधून प्रसिद्ध करण्याचाच मुख्यतः हा प्रकल्प होता. आणि, तांत्रिकदृष्ट्या विचार केला तर, मालकीच्या घराचे दोन भाग करून दोन वारसदारांच्या हाती किल्ल्या देऊन गेल्यासारखे ब्रिटिश इथून गेले, ही गोष्ट खरीच होती. भारतीय स्वातंत्र्याकडे ब्रिटिश शासन कोणत्या नजरेतून पाहते ही गोष्टही ग्रंथाचे नाव आपल्याला सांगते. 'इंडिपेन्डन्स : इंडिया ॲण्ड पाकिस्तान', 'वर्थ ऑफ टू नेशन्स' अशी पर्यायी नावेही या ग्रंथासाठी विचारात घेता आली असती. ब्रिटिश साम्राज्यवादी अहंगंड या ग्रंथाच्या नावामधूनही प्रकट होतोः त्यांच्या दृष्टीने त्यांनी आमच्या पदरात सत्ता टाकली; आम्ही भारतीयांनी स्वराज्य संपादन केले नाही.

आता, विचार करण्यासारखी गोष्ट पुढील आहे. महात्मा गांधींनीही असे उद्‌गार काढल्याची गोष्ट वाचल्याचे आठवते की, हे आम्ही मिळवलेले स्वातंत्र्य कोठे आहे? सत्तांतराची घडामोड ही हिंदू-मुस्लिम, साऱ्याच भारतीयांच्या दृष्टीने लाजिरवाणी गोष्ट झाली. आमचे सत्वहरण आम्ही होऊ दिले. आणि, ब्रिटिशांच्या दृष्टीने विचार करतादेखील, त्यांनाही लांछनास्पद अशी गोष्ट त्यांनी केली, असा निवाडा गांधीजींनी मनोमन केला होता असा ठसा मनावर उमटतो.

गोविंदराव तळवलकर गांधींच्या भूमिकेमधून पाहत होते असे सूचनसुद्धा त्यांच्या पहिल्या दोन खंडांमध्ये नाही. यात गैर काही नाही. स्वातंत्र्यासाठी दीर्घकाळ लढा देऊन काँग्रेसने स्वातंत्र्य संपादित केले, असे काँग्रेसचे नेते आत्मगौरवाच्या भाषेत सांगत. (आजही सांगतात.) काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याच्या राजकारणात वेगवेगळ्या कारणांनी सहभागी नसलेले, काँग्रेसच्या विरोधात असलेले जे पक्ष व गट होते त्यांना ही गोष्ट रुचत नव्हती, पटत नव्हती. स्वातंत्र्याचे श्रेय इतरांनाही आहे, अशी मांडमी केली गेली आहे. गोविंदरावांना काँग्रेसला श्रेय देणाऱ्यांना काँग्रेसची खरी जागा/पायरी दाखवून द्यायची होती. जे घडले ते *सत्तांतर*, आणि त्याचे श्रेय ब्रिटिश उदारमतवादी संस्कृती, ब्रिटिशांची लोकशाही निष्ठा यांना आहे, असे त्यांचे मत बनले होते. *सत्तांतर : १९४७* खंड १ व २ वाचल्यावर मनावर ठसा उमटतो तो असा की, शीर्षकाची निवड विचारपूर्वक केलेली आहे; या सगळ्या घडामोडीत काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याचे गौण स्थान होते हे परखड सत्य त्यांना समोर ठेवावयाचे आहे, हा त्यांचा निवाडा आहे, हे ठसत होते. हे दुसरे, व वास्तव उत्तर.

चौदा वर्षांच्या नंतर *सत्तांतर : १९४७*, खंड ३ प्रसिद्ध करताना त्यांची भूमिका काय आहे? ते लिहितात, "तथापि घटनात्मक बदल हा भारतातील 'सत्तांतरा'च्या नाट्याचा एक भाग झाला. हे नाट्य पूर्णपणे रंगवायचे तर येथे झालेल्या विविध आंदोलनांची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तुत पुस्तकात त्याप्रमाणे ती घेण्यात आली आहे.... स्वातंत्र्याच्या या जगन्नाथाच्या रथाला अनेकांचे हात लागले. त्यांच्या या प्रयत्नांची रूपरेषा स्पष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे."

'स्वातंत्र्याची पन्नास वर्षे पूर्ण होत असताना' हा खंड वाचकांच्या हाती देता येत असल्याचा आनंदही तळवलकरांनी व्यक्त केला आहे. जे नाट्य घडले ते 'सत्तांतरा'चे होते असे त्यांचे अभ्यासांती मत बनले असेल, तर पन्नास वर्षे सत्तांतराचीच पूर्ण झाली, स्वातंत्र्याची नव्हे; स्वातंत्र्य अद्यापि मिळवावयाचे खरे तर शिल्लकच आहे, असे त्यांनी का म्हटले नाही? आणि जर सत्तांतराद्वारा का होईना पण १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले असा आजचा त्यांचा सुधारित निवाडा असेल, तर त्यांनी 'प्रस्तावने'त बदललेल्या मताचा खुलासा का केला नाही? ती गोष्ट उचित झाली असती.

'जगन्नाथाच्या रथा'ला अनेकांचे 'हात' लागतात ही गोष्ट खरीच आहे. पण दोन प्रश्न उपस्थित होतात. एक सर्वांचे 'हात' 'स्वातंत्र्या'च्या दिशेने रथ पुढे रेटण्यासाठी सर्वकाळ लागत होते असे म्हणता येते का? आणि, सर्व 'हात' सारख्याच ताकदीचे होते का?

आपण पहिला प्रश्न विचारात घेऊ. ज्या घटनात्मक बदलांवर गोविंदरावांनी पहिल्या दोन खंडांमध्ये त्यांचे लक्ष केंद्रित केले ते घटनात्मक बदल घडून येण्यात अनेकांचे हातभार लागले असे म्हणणे योग्य होईल. या 'नाटका'तली ठळक पात्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील. (१) ब्रिटिश राजकीय पक्ष; (२) ब्रिटिश प्रधानमंत्री, भारतमंत्री; (३) भारतमंत्र्याचे सल्लागार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मंडळ व 'इंडिया ऑफिसा'तील वरिष्ठ अधिकारी; (४) व्हाइसरॉय; (५) व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद व विभिन्न खात्यांचे सचिव; (६) प्रांतांचे गव्हर्नर; (७) लब्ध प्रतिष्ठित 'टाइम्स' सारखी ब्रिटिश वृत्तपत्रे; (८) भारतातील ब्रिटिश मालकीची वृत्तपत्रे; (९) ब्रिटिश आर्थिक हितसंबंधी गट; (१०) भारतातील ब्रिटिश व अँग्लो-इंडियन दबाव गट, आणि (११) ब्रिटिश पार्लमेंट. एकंदर किती व्यक्तींचा सहभाग महत्त्वाचा राहिला असा प्रश्न केला तर संख्या शे-दोनशेच्या घरात सहज जाईल.

ठळक घटनात्मक बदल व त्यांच्याशी निगडित घटना व हालचाली जरी आपण घेतल्या आणि पुरेशा खोलात उतरावयाचे म्हटले (जी गोष्ट आज चांगलीच आवाक्यातली आहे) तर अशा एकेका बदलाच्या वेळची रस्सीखेच, अंतर्विरोध समोर येतात ही गोष्ट तळवलकरांसारख्या ब्रिटिश स्रोतांशी खोलवर परिचय असलेल्या चोखंदळ समीक्षकाला पटेल. 'सत्तांतरा'च्या दिशेने वाटचाल होऊ नये, करणे प्राप्तच असेल तर ती जितकी अडथळ्यांच्या शर्यतीच्या स्वरूपाची व मंद राखता येईल तेवढी ठेवावी यासाठी प्रयत्न करणारी, कायदा झाल्यावरही नाना क्लृप्त्या लढवून खीळ घालणारी मंडळी जागोजाग आढळतात. यातले नाट्य खरेच चित्तवेधक व उद्बोधकही आहे, हेही त्यांना पटेल.

सत्तांतराच्या म्हणा किंवा स्वातंत्र्य संपादनाच्या म्हणा भारतात घडलेल्या भारतीयांच्यातील नाट्यातही काहींचे हात काही वेळा तरी हा 'जगन्नाथाचा रथ' पुढे नेण्याच्या कामी लागण्याच्या ऐवजी काँग्रेसचे हात व पाय मागे खेचण्यात त्यांची शक्ती खर्च होत होती का? काही वेळा 'जगन्नाथाच्या रथा'चा विसरच पडल्यासारखे काहींच्या बाबतीत दृश्य दिसत होते का?

आपल्या दृष्टीने मुस्लिम लीग व संस्थानिक हे खलनायक असल्याने त्यांची रणनीती, चाल व डावपेच यांच्याबद्दल आपण हातचे न राखता बोलू, लिहू शकतो. तिथे आपला पक्ष काँग्रेस हा बनतो; म्हणजे, काँग्रेस स्वातंत्र्यासाठी, प्रजेच्या हक्कांसाठी लढ्यात उतरली असताना ही मंडळी नकारात्मक, प्रतिगामी, घातक चाली खेळत होती असा निवाडा आपण, काँग्रेसच्या संदर्भातल्या त्यांच्या भूमिका तपासून करीत असतो. पण मग काँग्रेसच्या लढ्याचे व भूमिकेचे हे मध्यवर्तीपण इतर घटकांच्या संदर्भातही तेवढेच योग्य ठरत नाही का?

विभिन्न घटक-पात्रांचा कधीकधी तरी जगन्नाथही वेगळा होता, त्यांचे रथही वेगळे होते आणि त्यांना पोचावयाचे ती ठिकाणेही वेगळी होती असे म्हणणे जास्त यथार्थ ठरेल. साम्यवाद्यांना, अर्थातच, देश परतंत्र राहावा नको होता. पण जेव्हा केव्हा देश स्वतंत्र होईल तेव्हा काँग्रेस पुरेशी दुबळ्या स्थितीत असावी, म्हणजे साम्यवादी क्रांती करणे सोपे जाईल, असे त्यांचे राजकारणाचे आडाखे होते. त्यांचे बोलविते धनीही वेगळे होते. हिंदू महासभेचे तीन शत्रू होते असे म्हणता येईल. विशेषतः सावरकरांच्या प्रभुत्वाच्या कालखंडात. यात क्रमांक नं. १ वर गांधी व काँग्रेस होती. कारण 'अखंड भारता'चे राजकारण करण्याच्या आड मुस्लिम लीगपेक्षाही मोठा अडसर गांधींची काँग्रेस आहे असे त्यांचे मत होते. नंतर नंबर मुसलमान व लीग. आणि शेवटी ब्रिटिशांचा नंबर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारताचे स्वातंत्र्य हवे होते यात शंका नाही. पण ते ज्या समाजाचे पुढारीपण करीत होते त्या समाजासाठी म्हणून असलेल्या त्यांच्या मागण्या मान्य होऊन, त्याविषयी हमी देणारी व्यवस्था उत्पन्न झाल्याची त्यांची खात्री पटल्यावर ब्रिटिश जायला त्यांना हवे होते. व्यवहारात याचा अर्थ असा झाला की, त्यांनीही काँग्रेसची शक्ती खच्ची करण्याला, काँग्रेसपासून दूर राहण्याला अग्रक्रम दिला. म्हणजे नंबर एकवरील शत्रू गांधींची काँग्रेस हीच.

नेमस्तांचे राजकारण अंतिमतः स्वातंत्र्यासाठीच होते ही गोष्ट खरी. पण गांधींच्या काँग्रेसवर व १९२० सालनंतरच्या लढ्याबद्दल त्यांचा आक्षेप तात्त्विक व व्यावहारिक, दोन्ही पातळ्यांवर इतक्या मूलभूत स्वरूपाचा होता की, ते काँग्रेसमधून बाहेरच पडले. त्यांच्या आक्षेपाचा मुख्य मुद्दा दोन पदरी होता : एक, अडाणी, विकारी जनतेला प्रक्षुब्ध करून, 'रस्त्या'वर आणून राजकारण करणे अराजकाला आमंत्रण देणे आहे. पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्यास पात्र बनण्याआधीच घिसाडघाई करून काँग्रेस खऱ्या विधायक नेमस्त राजकीय प्रगतीची लय बिघडवीत आहे, हा दुसरा पदर.

वस्तुस्थिती अशी असताना जगन्नाथाच्या रथाचे रूपक तळवलकर त्यांच्या भूमिकेमधून वापरू शकतात का, असाच खरा प्रश्न आहे. ब्रिटिश तरी पुनःपुन्हा हाच युक्तिवाद तर करीत होते, की हा समाज व देश एकसंध भासतो ते आम्ही राज्य चालवीत आहोत म्हणून; वस्तुतः, ही आवळ्याभोपळ्यांची बांधलेली मोट आहे, आणि आम्ही जर राज्य सोडले तर तुम्ही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

एकमेकांच्या उरावर बसाल, अनागोंदी माजेल. आम्ही राज्य जिंकून घेतले तेव्हाची गत परत तुमची होईल. तेव्हा, सबूर; आस्तेकदम घटनात्मक बदल करीत करीत तुम्हाला आम्ही जेव्हा स्वराज्यास पात्र करू तेव्हा ते हाती घेण्याइतका शहाणपणा व धीर धरा.

काँग्रेसने चालविलेला स्वातंत्र्याचा लढा सोडता स्वातंत्र्यासाठी कोणीच लढले नाही हे खरे नाही. अगदी १९२० नंतरचा काळ घेतला तरी. सशस्त्र क्रांतिकारकांचे गटही लढत होतेच. पण जगन्नाथाच्या रथाचे रूपक वापरावयाचेच असेल तर ते, १८८५ नंतरच्या काळात, काँग्रेसच्या लढ्याला उद्देशूनच वापरणे सार्थ ठरते. लोकमान्य टिळकांना याचे भान होते, म्हणूनच १९१५ साली त्यांनी काँग्रेसच्या 'क्रीड'वर डोळे झांकून सह्या करून काँग्रेसमध्ये पुन्हा स्वतःच्या अनुयायांसह प्रवेश केला. आणि आझाद हिंद फौजेचे नेतृत्व करीत असतानाही, गांधींचे शत्रुत्व करण्यासाठी पुरेसे व्यक्तिगत कारण असतानाही, नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी गांधी व काँग्रेसचा लढा यांना मानवंदना दिली, याचेही स्पष्टीकरण हेच होते.

जगन्नाथाच्या रथाचे रूपक वापरावयाचेच झाले तर, सर्व हात सारख्या ताकदीचे होते का, हा दुसरा प्रश्न. ज्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना आणि ब्रिटिश उदारमतवादी लोकशाही सुसंस्कृततेला खरे श्रेय आहे असे गोविंदराव मानतात त्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनीही, सत्तांतर करावयाचे ठरविले तेव्हा, ताकदीच्या कसोटीवर मुस्लिम लीग व काँग्रेस यांचीच निवड केली.

वेगवेगळ्या कारणांनी ब्रिटिशांना गांधी व काँग्रेस प्रिय नव्हतेच, पण जिना व मुस्लिम लीग यांच्याबद्दलही अखेरच्या काळात अप्रीती निर्माण झाली होती. पण निवडणुकांच्या आखाड्यात आणि लढ्याच्या मैदानात काँग्रेस व लीग हेच दोन पक्ष ताकदवान सिद्ध झाले होते. काँग्रेसला खच्ची करून एकाकी पाडण्याचे जे राजकारण ब्रिटिश राज्यकर्ते खेळले होते त्या राजकारणामधून अखेरीस पाकिस्तानचे राजकारण व जिनांची ताकद उत्पन्न झाली. गोष्टी हाताबाहेर गेल्या होत्या.

गोविंदराव यांनी त्यांच्या *सत्तांतर* खंड ३ चे लेखन काँग्रेसच्या लढ्यास मध्यवर्ती ठेवून का केले नाही, हा कळीचा प्रश्न बनतो. त्यांनी जर *सत्तांतर* खंड १ व २ चे लेखन करताना स्वीकारलेला आकृतिबंध याही वेळी स्वीकारला असता तर काय झाले असते? ब्रिटिशांच्या हाती या देशातली सत्ता, वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या कालखंडात आली. सामान्यत, १८४९ साली महाराजा रणजितसिंह यांचे राज्य जिंकून घेतल्यावर इंग्रजांची सत्ता सर्व देशात प्रस्थापित झाली असे म्हणता येईल. राजकीय जाग येण्यासही याच सुमारास आरंभ झाला. विशेषतः मुंबई व बंगाल या इलाख्यांमधील राजधान्या व काही अन्य ठिकाणी. अल्पसंख्य श्रेष्ठी वर्गात ही जाग आली हे खरे, पण ती अस्सल जाग होती. महाराष्ट्राच्या संदर्भात भास्कर तर्खडकर (दादोबा पांडुरंगांचे भाऊ), लोकहितवादी आणि महात्मा फुले ही तीन तरी ठळक व महत्त्वाची नावे आहेत. या तिघांचा जरी एकत्र विचार केला तरी नाट्य ध्यानात येते. १८५७ चा उठाव हा, बाकी काही मत असो, ब्रिटिशांची सत्ता घालवून देण्यासाठी होता; आणि जवळपास यशस्वी ठरण्याइतका मोठा होता. कंपनीच्या कारभाराशी जोडलेली नवी शिक्षितांची पिढी मनाने या उठावामध्ये जोडली गेली नाही, यातही नाट्य आहे. १८५७ चा उठाव फसल्यानंतर इंग्रजांनी आपली दहशत ज्या प्रकारे बसवली त्यातली सूडबुद्धी, क्रौर्य, उन्मत्त अहंकार, हिंदी लोकांविषयी तुच्छभावाची पद्धतशीर जोपासना व त्यांच्यापासून निर्माण केलेले अंतर या गोष्टी नंतर येथे जे घडले त्याची पार्श्वभूमी म्हणून त्या नाट्याचा भाग आहेत. *सत्तांतर* खंड १ व २ चा आकृतिबंध स्वीकारला असता तर आरंभापासूनच गुंतागुंत असलेले, अंतर्गत ताणतणाव असलेले, नाट्य सादर करण्याची जबाबदारी पत्करावी लागली असती. एका अंगाने पाहता फुले, वासुदेव बळवंत फडके, रानडे, चिपळूणकर, हे समकालीन. यांच्याविषयी, यांना एकेकटे करून लिहिणे सोपे. पण यांचा विचार एकत्र करून लिहिले तर महाराष्ट्राला आलेली जाग कळते, व तिच्यातले नाट्य सादर होते. पुढच्या पिढीत लोकमान्यांनी आधी न्यायमूर्ती रानडे व नंतर नामदार गोखले यांना नमवीत स्वतःचे नेतृत्व महाराष्ट्रात व मग देशात प्रस्थापित केले. नाटकात नवे रंग येऊन मिसळले. 'आधी सामाजिक की आधी राजकीय?' हा वाद, यातले नाट्य मग पाहता आले असते. १९०५ च्या वंगभंग चळवळीत बंगालच्या लोकांच्या नजरेत हीरो ठरलेले रवींद्रनाथ वेगळी वाट धरतात, यातले नाट्य त्यांनीच कादंबऱ्यांच्या रूपात सादर केले आहे. याचे विवेचन आशिष नंदी यांच्या *इल्लेजिटिमसी ऑफ नॅशनॅलिझम* या पुस्तकात येते. स्वतः रवींद्रनाथांनी 'राष्ट्रवादा'चे विवेचनही व्याख्याने-निबंध रूपाने केले आहे. असेच आणखी पुष्कळ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तळवलकरांनी हे शिवधनुष्य उचलावयाचे नाही असेच ठरविले. हे नाट्य त्यांच्या हृदयाला वा बुद्धीला भिडलेलेच नाही, हे याचे एक कारण असू शकेल. त्यांना ब्रिटिशांच्या कृपाप्रसादाने घडून आलेले 'सत्तांतर'च दिसत राहिले. त्या प्रक्रियेत जे काही नाट्य आहे ते त्यांना भावले. पण, काही वेगळे कारणही असण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकमान्य टिळकांवर तळवलकरांनी लिहिलेय. *नवरोजी ते नेहरू* असेही त्यांचे एक पुस्तक आहे. पण स्वातंत्र्याच्या 'जगन्नाथाच्या रथा'ची यात्रा व त्यातील नाट्य रंगवायचे तर मग एका टप्प्यावर काँग्रेसने चालविलेल्या लढ्याचे मध्यवर्तीपण त्यांना समोर आणावेच लागले असते. वेगवेगळ्या कारणांनी गांधी व काँग्रेस यांच्याविषयी दुरावा, काहीसा तुच्छभाव त्यांच्या मनात घर करून राहिला असला तर ही वला ओढवून न घेण्यासाठी त्यांनी आकृतिबंधच बदलला असू शकतो. ज्या मानवेंद्रनाथ रॉय यांच्या स्मृतीस गोविंदरावांनी हे पुस्तक अर्पण केले आहे त्यांनाही गांधी व काँग्रेस यांच्याविषयी दुःस्वास व तुच्छभाव वाटत आला. पण जर हे नाट्य गोविंदरावांनी रंगविले असते तर त्यांना रॉय यांचाही यथार्थ, वस्तुनिष्ठ निवाडा करावा लागला असता. केवळ जिनांचा नाही तर सावरकरांचा व आंबेडकरांचाही निवाडा करावा लागला असता.

कारणे कोणतीही असोत, तळवलकरांनी निवडलेला आकृतिबंध असा आहे की, एका गुंतागुंतीच्या, भव्य पण, अंतिमतः, एका अंगाने केविलवाण्या तर, दुसऱ्या अंगाने, शोकात्म भीषण ठरलेल्या, आणि तरीही अर्थघन अशा नाट्याचे रूपांतर तो नाट्यहीन, फुटकळ, असंबद्ध अशा तुकड्यांमध्ये करतो. असे तुकडे की ते एका सुंदर, आकर्षक गोधडीतही एकत्र शिवले जाऊ शकत नाहीत; जिगसॉ पझलच्या तुकड्यांना जोडत गेल्यावर जसे शेवटी अर्थपूर्ण चित्र तयार होते तसेही हे तुकडे नाहीत. घटनात्मक बदलांच्या स्वरूपाचे खरे नाट्य मंचावर घडत असताना, त्याच कालखंडात आणखी काय काय चालले होते तेपण जाता जाता सांगतो, अशी काहीशी गोष्ट येथे घडलेली आहे.

या कारणाने पुस्तकाच्या आरंभी, अर्पणपत्रिकेनंतर, त्यांनी ज्या काव्यपंक्ती ठळकपणे छापल्या आहेत त्या, त्या काव्यपंक्तीं-मधील वीराग्रणींना खिजविण्यासाठीच टाकल्यासारख्या झाल्या आहेत. त्या काव्यपंक्ती अशा :

संगरीं वीराग्रणी जे धैर्यमेरू संकटीं
जन्मले या भारतीं
राष्ट्रचक्रोद्धारणी कर्णापरी ज्यांना मृती
गाऊं त्यांना आरती

'जे घडले त्याला तुम्ही, १९८३ साली, स्वातंत्र्याचे संपादन असे न म्हणता 'सत्तांतर १९४७' असे म्हणालात; याचे श्रेय बव्हंशी ब्रिटिशांनाच आहे असे तुमचे यथार्थवादी वस्तुनिष्ठ इतिहासकार म्हणून प्रामाणिक मत आहे; तर आरती त्यांचीच तुम्ही गायलीत हे ठीकच झाले. मग आता १४ वर्षांनंतर या पंक्ती उद्धृत करून आमच्या मनांच्या जखमेवर मीठ तरी चोळायला नको होते' असे हे वीराग्रणी म्हणतील. पुढे ते म्हणतील, 'वरे; हा ३ रा खंड आम्ही वाचला तर या काव्यपंक्ती लिहिणारा कवी व त्यावाचून हृदय उचंबळून येणारे भाविक भारतीय यांना तुम्ही मूर्खात काढत आहात असेच मत होते. कारण घडलेल्या इतिहासाकडे तसे पाहणेच तुम्ही बाद ठरविले आहे. तुम्ही एवढे विद्वान, भाराभर ग्रंथ वाचलेले. तुम्ही ग्रंथाची रचना केलीत तशी एरवी केली नसती.'

नऊ तुकड्यांचे हे पुस्तक आहे. 'रक्तरंजित पर्व', 'जेव्हा किसान जागा होतो', 'कामगारसंघटन', 'वेचाळीसचे आंदोलन', 'नेमस्त राजकारण', 'ब्रिटिश मित्र', 'राजा विरुद्ध प्रजा', 'काही वृत्तपत्रांची भूमिका' आणि 'स्वातंत्र्य की एकता'. यांपैकी काही तुकडे विचारात घेऊ.

(१) 'रक्तरंजित पर्व' या शीर्षकावरून हे एक पर्व – म्हणजे एक कालखंड – होते असे वाटते; "सामुदायिक पुरुषार्थाचे पर्व सुरू होण्याची ती पूर्वतयारी होती." या प्रकरणाच्या या शेवटच्या वाक्याने हा अर्थ गोविंदरावांच्या मनातही आहे असे म्हणता येते. 'रक्तरंजित' या शब्दावरून या पर्वात अमाप रक्त सांडले असेल अशी कल्पना होते.

रक्तरंजित हा शब्द १८५७ चा उठाव व नंतर ब्रिटिशांनी तो उठाव मोडून काढत असताना प्रकट केलेले क्रौर्य याला, तसेच १९४६-४७ या काळातील भीषण हत्याकांडाला – हिंदू व मुसलमान यांनी परस्परांची केलेली निर्घृण कत्तल – उद्देशून वापरता येईल. एरवी, १८९०-१९४५ या काळात सशस्त्र क्रांतिकारकांनी पाडलेल्या खुनांचे व त्याच्या बदल्यात क्रांतिकारकांचे सांडलेले रक्त यांचे प्रमाण बघितले तर ते नगण्य होते. अल्जीरिया स्वतंत्र होण्याच्या प्रयत्नात सांडलेले

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

रक्त तुलनेसाठी विचारात घेतले तर, आपले सशस्त्र क्रांतिकारक व त्यांची कृत्ये ही रोमॅंटिक व्यक्तिवादी अभिजन कृती होती या विदारक निष्कर्षावर यावे लागते. ध्येयनिष्ठा, धीरोदात्तपणा, समर्पणवृत्ती आणि त्यांच्यापैकी अनेकांनी केलेले बलिदान व सोसलेला तुरुंगवास व छळ यांसाठी त्यांची वीर म्हणून आपण पूजा जरूर बांधावी. पण तिथेच थांबावे. लोकमान्य तिथेच थांबले, हेही ओळखावे. एका पर्वात या गोष्टी घडल्या व मग सामूहिक पुरुषार्थाचे पर्व सुरू झाले असेही नाही. हा मार्ग अनुसरणारे छोटे गट नेहमीच होते. पण यांच्या कृत्यांचा व या गटांचा बंदोबस्त करण्यासाठी साधी पोलिसी कारवाई पुरी पडली; प्रति-दहशतवादी (काऊंटर-इन्सर्जन्सी) दले उभारावी लागली नाहीत.

१८५७ चा उठाव मोडून काढताना सांडलेले रक्त, निरपराधींचे गावोगाव सांडलेले रक्त येथून वस्तुतः या प्रकरणाची सुरुवात व्हायला हवी होती. आणि फाळणीच्या अलीकडे पलीकडे घडलेले ते एक वर्षाच्या काळातले रक्तरंजित पर्व; त्याबद्दलही मौन बाळगून कसे चालेल? या कत्तली आपण स्वतंत्र होण्यासाठी, स्वतंत्र होण्याचा भाग म्हणून करतो आहोत याच उन्मादाने माणसे पेटून हिंस्रतम झाली होती ना?

स्वातंत्र्याच्या लढ्यातल्या सामूहिक पुरुषार्थाच्या काळात ब्रिटिश सैन्यातल्या सोजिरांनी व पोलिसांनी सांडलेल्या रक्ताच्या घटनाही आहेत. जालियनवाला बाग ही त्यातली एक. जेथे लोकांनी उन्मत्त होऊन रक्त सांडले अशाही घटना आहेत. मोपल्यांचे बंड व चौरीचौऱ्याची पोलिसांची कत्तल ही याची उदाहरणे. याचाही ऊहापोह येत नाही.

'सशस्त्र क्रांतिकारक गट व त्यांचे योगदान' हे शीर्षक या प्रकरणाला वास्तविक द्यावयाला हवे होते.

जो प्रश्न उपस्थित करून विवेचन करावयास हवे होते तो प्रश्न तर तळवलकरांना पडलेलाही दिसत नाही. अन्य देशांमध्ये मध्यमवर्ग व सामान्य जनता यांच्यात पसरण्यात सशस्त्र क्रांतीचा मार्ग निवडलेल्यांना यश आले ते येथे का आले नाही? सशस्त्र क्रांतिकारक सामूहिक पुरुषार्थ जागविण्याविषयी एवढे उदासीन का राहिले? सामूहिक पुरुषार्थाचे पर्व सुरू झाल्यावरही अनेक तरुण सशस्त्र क्रांतिकारक बनून वैयक्तिक कृती करण्यावर भर का देत राहिले?

सशस्त्र क्रांतीच्या मार्गावरून चालू पाहणाऱ्या तरुणांशी लोकमान्यांचे सक्रिय संबंध होते. या मार्गाने जाणे समयोचित व व्यवहार्य का नाही हेही ते प्रसंगाने सांगत. सावरकर व त्यांचे सहकारी/अनुयायी यांच्याशी गांधींची चर्चा झाली होती. *हिंद स्वराज्य* मध्ये गांधी संवादाच्या रूपाने त्यांच्या झालेल्या बोलण्याचे सार सांगतात. रवींद्रनाथ टागोरांचे मत प्रकरणाच्या शेवटी गोविंदरावांनी काहीशा विस्ताराने दिले आहे. सामूहिक पुरुषार्थाच्या पर्वाचा आरंभ करणारे लोकमान्य आणि त्याचा प्रकर्ष साधणारे गांधी यांच्या मतांचाही काही ऊहापोह करणे योग्य झाले असते.

(२) 'जेव्हा किसान जागा होतो' या प्रकरणाचे शीर्षक कॉम्रेड गोदावरी परुळेकर यांच्या *जेव्हा माणूस जागा होतो* या पुस्तकाच्या शीर्षकावरून उचललेले आहे हे लक्षात येते.

ब्रिटिश राजवट प्रस्थापित होत असताना, १८५७ च्या आधीच्या काळात व नंतरही बराच काळपर्यंत नव्या राजवटीच्या नव्या, न उमगणाऱ्या व्यवस्थेमध्ये होणाऱ्या नागवणुकीविरुद्ध आदिवासी जमातींच्या झालेल्या उठावांबद्दल, तसेच बिगर-आदिवासी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मध्ये झालेल्या उद्रेकांविषयी माहिती या प्रकरणाच्या आरंभी संकलित करून सादर केलेली आहे. प्रकरणाच्या शेवटी प्रा. धनागरे यांचा, १९२० पर्यंतच्या किसानांच्या उठावांमधून राजकीय जागृती झाली नाही हा निष्कर्ष सर्वमान्य झाल्यासारखा आहे, असे तळवलकरांनी म्हटले आहे. म्हणजे, किसान जागा होण्याशी या उद्रेकांचा संबंध नाही. मग 'रक्तरंजित पर्वा'त यांची हकीकत समाविष्ट करणे अधिक योग्य झाले असते का? यापैकी काही उठावांचा तरी समावेश त्या प्रकरणात होणे अधिक उचित झाले असते.

या प्रकरणात जवळपास आरंभीच महात्मा जोतिराव फुले यांचे नाव यायला हवे होते. अखिल भारतीय पातळीवर त्यांचे या बाबतीतले लेखन व कार्य महत्त्वाचे आहे. फुले यांच्या पुढारीपणाखाली 'उठाव' झाला नाही हे खरे; चंपारण्यमध्ये गांधींनी एका समूहाचा प्रश्न घेऊन जसा तो सोडवला, तसे फुल्यांनी केले नाही असे म्हणता येईल. पण त्यांनी *शेतकऱ्याचा असूड* चे लेखन केले व त्या द्वारे शेतकरी समाजात राजकीय जागृती आणण्याचे सक्रिय प्रयत्न केले ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यांची मीमांसा आज आपण शंभर टक्के मान्य करू की नाही, किती लहान वा मोठ्या प्रदेशात त्यांनी जागृती निर्माण केली, ती किती काळ टिकली हे मुद्दे येथे अप्रस्तुत आहेत. ज्या काळात फुले लिहीत होते त्याच काळात न्यायमूर्ती

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

रानड्यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक सभा सक्रिय होती. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वा सारा वाढविण्याच्या मुद्यावरून शेतकऱ्यांचे प्रश्न मांडीत होती; काही आकडेवारी गोळा करून विश्लेपणही समोर ठेवीत होती. पण महात्मा फुले यांच्या विश्लेपणाची व्यापकता, सखोलता व धारदारपणा वेगळ्याच कोटीचा आहे. सामान्य 'शूद्रातिशूद्र' शेतकऱ्यांच्या ठायी राजकीय जाग आणण्याचा हा भारतातला, लोकांच्या भाषेत पार पाडलेला, पहिलाच उपक्रम असेल. याला तळवलकरांच्या लेखनात स्थान का मिळाले नाही?

किसानांमध्ये जाग म्हणजे कोणात जाग आली, जाग येणे याचा अर्थ-आशय काय, या प्रश्नांची उत्तरे आपणांस हे प्रकरण वाचून मिळत नाहीत. भारतीय शेतीत मालकीहक्क आणि हितसंबंध यांची एक उतरंडच आढळते. तीही जेथे रयतवारी पद्धती होती तिथे वेगळी व जमीनदारी पद्धती होती तिथे वेगळी. जमिनीवर रावणारे म्हटले तर कुळे, वटाईदार, सालदार, शेतमजूर आदि. वरचा मालकवर्ग हा गावोगाव प्रतिष्ठित. यापैकी जो मोठा जमीनदार, मालगुजार हा वेगळा काढणे शक्य होते. पण त्याखालचा वा खालचे मालक? त्यांचा समावेश 'किसान' मध्ये करावयाचा की नाही? उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील गावोगावचे पाटील-कुलकर्णी, ज्यांच्या वतनी जमिनी होत्या, ते? त्यांचीही शेती ते कुळांकरवी वा मजूर लावून करीत असले तर?

मुळशी सत्याग्रह हा कोणाचा लढा होता असे म्हणावे? नुकसानभरपाई पुरेशी मिळावी, जमिनीच्या किंमती रास्त मिळाव्यात, ही मागणी करणारे वरेच मालक हे 'गैरहजर जमीनदार' होते. पांढरपेशे, ब्राह्मण, पुण्यात स्थायिक. त्यातले काही सावकारही असणार. या प्रकरणाच्या शीर्षकातल्या किसानांमध्ये त्यांचा समावेश करावा? जी कुळे होती, वा जी गडीमाणसे प्रत्यक्ष रावत होती त्यांच्या दृष्टीने धरण होणे म्हणजे पोटावर गदा येणे होते. धरण झाले नाही तरच त्यांची शेती त्यांच्याकडे कूळ वा मजूर म्हणून राहणार होती. त्यांच्या दृष्टीने 'धरणच नको' हीच एकमेव अर्थपूर्ण मागणी होती. जे फक्त मालक होते, प्रत्यक्षात शेतकरी नव्हते, त्यांची धरण होण्याला हरकत नसणे समजू शकते. ही गुंतागुंत व त्याचे सत्याग्रहावरील परिणाम यांचा वऱ्यापैकी परामर्श प्रा. राजेंद्र व्होरा यांच्या मुळशी सत्याग्रहावरील पुस्तकात घेतला आहे. त्याची दखल गोविंदरावांनी घेतलेली नाही.

पण, याही पलीकडचा मुद्दा असा की, प्रा. धनागरे यांचा निष्कर्ष तळवलकर मान्य करतात, पण १९२० लाच हा फरक का पडतो याचा काही ऊहापोह करीत नाहीत. प्रा. धनागरे यांचा निष्कर्ष मला पूर्णपणे मान्य नाही. महात्मा फुलेंचे लेखन व सार्वजनिक सभेचे न्या. रानडे व लो. टिळक यांच्या नेतृत्वाखालील काम हे दोन ठळक अपवाद तर आपणांस माहीत आहेत. उठाव/उद्रेकांविषयीच त्यांचे विधान असले तर ते मान्य होईल. (तसे ते असावे.)

गांधींनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करण्याने फरक काय पडला, या प्रश्नाला गोविंदराव भिडत नाहीत. किसानाला जाग आणण्यातही स्वातंत्र्यलढ्याचे गांधीयुगातले महत्त्वपूर्ण योगदान मग त्यांना लक्षात घ्यावे लागेल. गांधींचा प्रभाव व त्यांचे माहात्म्य यांची नोंद ते गुप्तहेर खात्याच्या अधिकाऱ्याच्या अहवालाच्या आधारे करतात, पण ते गूढ उकलण्याचा प्रयत्न करीत नाहीत.

शेतकऱ्यांच्या विशिष्ट समस्या घेऊन केलेली आंदोलने वा होणारे उठाव/उद्रेक यांमधून राजकीय जागृती होतेच असे नाही. उलट व्यापक राजकीय आंदोलनात सहभागी झाल्याने सहभागी होणारे सगळेच समाज-घटक जागे होतात, व ही जाग त्यांचे त्यांचे प्रश्न सोडविण्याची दृष्टी व शक्ती त्यांना देते. कामगार, किसान यांच्यात वर्गीय भूमिकेतून संघटना बांधण्याचे व चळवळी करण्याचे कार्य १९२० नंतरच्या काळात साम्यवादी-समाजवादी-रॉयिस्ट यांनी केले. या त्यांच्या कामांमधून स्वातंत्र्याच्या जगन्नाथाच्या रथाला शक्ती प्राप्त झाली, की स्वातंत्र्यलढ्यामधून येत राहिलेल्या जागृतीमधून, सामूहिक पुरुषार्थाच्या सामर्थ्याच्या प्रत्ययामधून या वर्गीय संघटना बांधणीसाठी व चळवळीसाठी शक्ती मिळाली, असा प्रश्न विचारला तर उत्तर काय येते?

गांधींनी मुख्य दोनतीन गोष्टी साधल्या. एक, स्वातंत्र्याचा आशय व्यापक व खोल केला. कॉंग्रेसच्या नेत्यांमध्ये असा व्यापक, सर्वांगीण व सखोल विचार करण्याची दृष्टी न्या. रानडे यांच्या ठायी आपणांस आढळते. पण त्यांचे पट्टशिष्य गोखले यांनी पुढे एका संकुचित चाकोरीत राहून राजकारण करणे पसंत केले. त्यांनी सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी स्थापन केली त्यापाठीशी व्यापक दृष्टी होती खरी; पण राजकारणाचेच वळण त्यांनी बदलले नाही. इतर पुढाऱ्यांची दृष्टी तर संकुचित अर्थाने राजकीय स्वातंत्र्याच्या संपादनावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

होती. दोन, गांधींनी लोकांच्या मनातली ब्रिटिश राजवटीने बसविलेली दहशत घालविली. 'हा माणूस आलाय ना, आता ब्रिटिश सोजिराच्या वायोनेटाची ऐसी-की-तैसी; वायोनेटीचे या माणसापुढे काही चालत नाही,' ही लोकांची भावना झाली. चंपारण्यामधला लढा हा तसा विशिष्ट होता व लढा करण्याची वेळ आलीच नाही. गांधी विरुद्ध मळेवाले व सरकार असेच चित्र राहिले. पण शेतकऱ्यांच्या मनातली दहशत गेली. तेच १९२०-२२ या काळात देशभर घडले. तीन, स्वातंत्र्याचा लढा ही समाजातील श्रेष्ठी वर्गाने आपल्या मर्यादेत करावयाची गोष्ट आहे ही धारणा व भूमिका आमूल वदलली. स्वातंत्र्याच्या राजकारणाला सामूहिक पुरुषार्थाच्या राजकारणाचे रूप दिले.

१९२० च्या असहकार आंदोलनाच्या ओघात जी व्यापक जाग देशभर आली तिच्यामुळे किसानांमध्येही जाग येण्यास मोठी चालना मिळाली. यानंतरच्या काळात काँग्रेस संघटनेचा कायापालट झाला. ती तालुक्या-तालुक्यापर्यंत पोचली. शेतकऱ्यांचा, विशेषतः असंरक्षित कुळांचा प्रश्न काँग्रेसने हाती घेतला. किसानांमध्ये जाग येण्यात काँग्रेस व तिचे नेतृत्व यांचे योगदान महत्त्वाचे होते. हे प्रकरण वाचून याची कल्पना येत नाही.

(३) 'राजा विरुद्ध प्रजा' या प्रकरणात संस्थानांमधील घडामोडींची हकीकत येते. भारतातील राजेरजवाडे यांच्या चैनविलासाच्या सुरस आणि चमत्कारिक कथा परिचयाच्या आहेत. राजेरजवाड्यांची जागा घेणारे हुकूमशहा व लोकशाही राष्ट्रातील पंतप्रधान-राष्ट्राध्यक्ष आदींच्याही खाजगी जीवनाच्या कथा कमी सुरस आणि चमत्कारिक नसतात हेही आता आपणांस माहीत आहे.

मुद्दे दोनतीन आहेत. ब्रिटिश राजवटीचे, रेसिडेंटपदी काम करणाऱ्यांचे वागणे कसे राहिले याचीही चर्चा का नाही आली, हा एक. टिळक-आगरकरांनी डोंगरीच्या तुरुंगाची १०१ दिवस हवा व कदान्न खाल्ले ते एका संस्थानिकासाठीच ना? साताऱ्याचे संस्थान खालसा केले ते राजा चैनविलासी व विकृत होता म्हणून नाही ना? तो पाळीव प्राण्याला शोभेल असा निरुपद्रवी व लाचार वागण्याची खात्री वाटेना म्हणून ना?

या प्रकरणात कोल्हापूरचे शाहू छत्रपती, वडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांना त्यांनी जे काही केले त्याचे योग्य श्रेय का दिले गेले नाही? हा दुसरा मुद्दा. ही तर आपल्या घरची माणसे. भारतात आणखीही असे संस्थानिक असणार. सयाजीरावांचे ब्रिटिश राजवटीशी संवंध ताणतणावाचे राहिले. कारण, मूळ तहानुसार, आपण ब्रिटिशांचे मांडलिक नाही, मित्रराज्य आहोत, ही भूमिका वठविण्याचा त्यांनी त्यांच्या मर्यादेत प्रयत्न केला. लोकांना जाग आणण्याच्या विषयातही त्यांचे काहीएक कार्य आहे. महात्मा फुले यांना त्यांचे सक्रिय प्रोत्साहन होते. महाराष्ट्रात काय घडत आहे यावर लक्षही होते. त्यांनी डॉ. आंवेडकरांना परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी साहाय्य केले ही एक गोष्टही पुरेशी महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी आपल्या संस्थानात ठेवूनही घेतले होते. राजकीय जागृती आणण्याच्या संदर्भातील कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींचे योगदान मोठे आहे. वेदोक्त प्रकरणानंतर त्यांनी ब्राह्मणेतर राजकारणाची अनेक अंगांनी पुष्टी केली. आंवेडकरांच्या नेतृत्वाची उभारणी करण्यात त्यांनी सक्रिय रस घेऊन मदत केली. औंध संस्थानाचा उल्लेख जरूर आहे. पण संस्थान लहान आकाराचे असले तरी प्रकरणाच्या विषयाच्या संदर्भात महत्त्व मोठे, व म्हणून त्याची काही माहिती व विवेचनही यावयास हवे होते.

स्वातंत्र्य मिळून आज पन्नास वर्षे झाली. अनेक प्रसंगी असे अनुभवास आले आहे की, संस्थानिकांच्या घराण्यातील व्यक्ती राजकारणात उतरल्या तर लोकांचा त्यांना पाठिंबा मिळतो. उदाहरणे देण्याची गरज नाही इतकी ती परिचयाची आहेत. जर संस्थानिकांच्या राज्यातल्या प्रजेचा अनुभव केवळ जुलूमजवरदस्तीचा, शोषणाचा, अस्मानी-सुलतानीचा राहिला असता तर असे घडले असते का? लोकांची आत्मीयता, निष्ठा यांचे मूल्यांकन 'सरंजामशाही मानसिकता' असे करून मोकळे व्हायचे? राजा आणि प्रजा यांच्यातल्या नात्याचा मुद्दा हा तिसरा मुद्दा. हे नाते समजावून घेण्याची गरजही तळवलकरांना वाटलेली नाही.

गांधी सौराष्ट्रातील वारक्या संस्थानिकांकडे दिवाण म्हणून काम करणाऱ्याचे पुत्र. संस्थानी कारभाराच्या सगळ्या तऱ्हा आणि रंगढंग यांचा आतून परिचय त्यांना होता. पण असे दिसते की, राजा पारतंत्र्यात होता; प्रजा मात्र एका अर्थी स्वकीय सत्तेखाली होती. ब्रिटिशांनी राजाच्या तोंडात लगाम अडकविलेला असला तरी अंतर्गत स्वायत्तताही ठेवली होती. अशी व्यवस्था राखण्यात त्यांचा हितसंबंध होता, हे गोविंदरावांनी स्पष्ट केले आहेच. राजा आणि प्रजा मिळून एक समाज/लोक होते. राजाचा जुलूम फार वाढला तर त्यावरही एकाहून अधिक,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
अनुक्रमणिका

वऱ्यापैकी परिणामकारक उपाय लोकांजवळ होते. संस्थानिकांविषयी आपली पुष्कळ तक्रार आहे, बदलही खूप व्हायला हवेत, पण ते आपलेच आहेत आणि तेही पारतंत्र्यातच आहेत, आणि त्यांची आजची स्थिती ही पारतंत्र्याचा परिणाम पण काही अंशी आहे, ही समज गांधींच्या ठायी होती. संस्थानिकांविषयी आधुनिकतेच्या वा साम्यवादाच्या भूमिकेमधून येणारा शत्रुभाव वा तुच्छभाव नव्हता. स्वातंत्र्याच्या लढाईत ते आपल्याच पक्षाचे आहेत ही भावना व दृष्टी होती. म्हणून संस्थानिकांविरुद्ध काँग्रेसने चळवळ करण्याविषयी त्यांची भूमिका अनुकूल नव्हती. त्यांना हेही माहीत होते की, ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रजा ज्या क्षणी आत्मनिर्भर, समर्थ व स्वतंत्र होईल त्या क्षणी आडमुठ्या संस्थानिकांचे दिवस भरणारच आहेत. ब्रिटिशांच्या टेकूच्या खेरीज उभे राहण्याचे सामर्थ्य त्यांनी कधीच गमावले आहे.

काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याचे व एक राजकीय संघटना म्हणून काँग्रेसचे मध्यवर्तीपण कसे होते हे या बाबतीतही दिसून येते. संस्थानांमध्ये 'प्रजा परिषदां'चे काम जेथे जेथे वाढले तेथे तेथे काँग्रेसशी जोडून घेण्याने त्या चळवळींचे बळ वाढे. त्या संघटनांना काँग्रेस हा मोठा आधार होता, व पुष्टीही तिथून मिळे. आणि संस्थानिकांनाही, काँग्रेस मध्ये पडत आहे म्हटल्यावर वचक बसे. याला अपवाद जरूर होते; पण काँग्रेसचा पाठिंबा हा ब्रिटिश उच्च अधिकाऱ्यांनाही ध्यानात घ्यावा लागे.

संस्थानिकांची एक तिसरी शक्ती उभी करण्यात संस्थानिकांची मदत करणारी काही नामवंत मुत्सद्दी मंडळी होती. कर्तृत्ववान, चलाख, विद्वान. आणि काँग्रेसला शह देण्याच्या दृष्टीने अशी शक्ती निर्माण होण्यात ब्रिटिश शास्त्यांनाही रसही होता. पण वास्तव असे होते की, 'ब्रिटिश इंडिया'मध्ये काँग्रेस प्रबळ असल्याकारणाने व तिने प्रजेला जागृत केल्याने संस्थानांमधील प्रजा काँग्रेसविरोधात अशी तिसरी शक्ती उभी करण्यास तयार होणारच नव्हती.

नाट्य 'सत्तांतरा'चे म्हटले तरी, एक-तृतीयांश प्रदेश ताब्यात असलेल्या संस्थानांचे वेगळे संघटन बनवून त्यांनाही सत्ता हस्तांतरित करण्याची गोष्ट काँग्रेसमुळेच ब्रिटिश करू शकले नाहीत.

असो. येथवर तीन प्रकरणांचा परामर्श काहीसा तपशिलाने घेतला. यावर एक आक्षेप तळवलकर घेऊ शकतात की, मुख्य नाट्य आधीच्या दोन खंडांत येऊन गेले आहे; मुख्य विषयाला परिपूर्णता आणण्यासाठी हा तिसरा पूरक खंड लिहिला. तोही, कोणी कोणी 'याबद्दल-त्याबद्दल लिहिले नाहीत' असे म्हटले म्हणून.

तर, हेही खरे असू शकतेच. पण जे विषय येथे हाताळले आहेत ते इतके क्षुल्लक आहेत का की, काही रंजक, काही उद्बोधक माहिती काही ग्रंथांवरून संकलित करून देण्याने काम होईल? सत्तांतराच्या/स्वातंत्र्याच्या नाट्याशी नीट संबंध जोडला नाही तरी चालेल, कारण खरे तर तसा काही संबंध नव्हताच?

३ऱ्या खंडात 'बेचाळीसचे आंदोलन' असे एक प्रकरण आहे. त्यात आरंभी चळवळीचे स्वरूप व नेतृत्व-नियंत्रण या बाबतीत गांधी या वेळी कोणता वेगळा विचार करीत होते त्याची माहिती तळवलकरांनी दिली आहे आणि नंतर आंदोलनाचा व्याप किती मोठा होता व किती काळ टिकला याविषयीची माहिती काही ग्रंथांवरून संकलित करून दिली आहे.

१९४० साली गांधींनी अगदी निरुपद्रवी स्वरूपाचा वैयक्तिक सत्याग्रह हाती घेतला; सामूहिक चळवळ वा उठाव करण्याची भूमिका घेण्याचे नाकारले. यामागची कारणे देऊन, तिथून ते ४२ च्या 'छोडो भारत' घोषणेपर्यंत आणि 'करेंगे या मरेंगे' या संदेशापर्यंत कोणत्या वाटेने गांधी येऊन पोचले, याचा शोध तळवलकर का घेत नाहीत, असा प्रश्न पडतो.

१९३९ साली सत्तात्याग केल्यानंतर काँग्रेस संघटनेत एक पक्ष, ब्रिटन संकटात सापडल्याचा फायदा उठवून लढा पुकारावा, व या वेळी तो यशस्वीही होईल, असे म्हणणारा होता. यात काँग्रेस समाजवादीच फक्त होते असे नाही. मात्र पं. नेहरू मनाने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने होते. ब्रिटिशांनी एकतर्फी घोषणा करून भारताला युद्धात सहभागी केले, काँग्रेसची रास्त मागणी झिडकारली, याबद्दल त्यांना संताप आला होता. तरीदेखील जर्मनीचा पराभव होणे सर्वप्रथम महत्त्वाचे आहे असे त्यांचे पक्के मत होते.

भाषण-स्वातंत्र्य काढून घेतल्याच्या निषेधार्थ एकेकट्याने ठरावीक साच्याचे भाषण करून अटक करून घेण्याचा, युद्धप्रयत्नात कोणतीही अडचण उत्पन्न न करणारा वैयक्तिक सत्याग्रहाचा मार्ग गांधींनी जाणीवपूर्वक अवलंबिला. हिटलर-मुसोलिनींचा पक्ष हा दुरिताचा पक्ष आहे, असे त्यांचेही मत होते. भारताच्या स्वातंत्र्याला अनुकूल मत बाळगणाऱ्या परदेशी लोकमताचेही त्यांना भान असावे. या युद्धात अडथळा न

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आणण्याचे पथ्य काँग्रेस व गांधी किमान यांनी पाळावे ही अपेक्षा होती.

सिंगापूरचा पाडाव झाला. तिकडे युरोपात दोस्त राष्ट्रांची पीछेहाटच होत होती. जपानची मुसंडी थेट भारताच्या सीमेपर्यंत येऊन ठेपली. प्रसंग तसाच गुदरला तर, प्रदेश वेचिराख करीत, लोकांना वाऱ्यावर सोडून, माघार घेण्याचे आराखडे तयार केले जात आहेत याची माहिती गांधींपर्यंत आली. माघार पश्चिमेच्या, वायव्येच्या दिशेने घ्यावयाची होती. लोकप्रातिनिधिक सरकारच्या हाती राज्य न देण्याबद्दल ठाम असणारे शास्ते आता बेजबाबदारपणे पळ काढण्याच्या तयारीत होते.

'चांगलेच होईल की; जपानचे सैन्य भारताला स्वातंत्र्य देईल, सुभाषबाबू त्यांच्याबरोबर आहेत ना' या भ्रमात गांधी नव्हते. जपानची साम्राज्यवादी कुख्याती व त्यांचे मतलबी हेतू यांची त्यांना पूर्ण जाण होती. जपानचे सैन्य घुसून आतमध्ये आलेच तर येथे त्यांना गलितगात्र, भयभीत अवस्थेत जनतेने सामोरे जाऊन आगीतून उठून फुफाट्यात पडावयाचे नसेल तर काय घडायला हवे, हा गांधींपुढे प्रश्न उत्पन्न झाला. आसामच्या सीमेवर जपान रोखला गेला, तिकडे एल् अलामीनच्या लढाईत जर्मन सैन्याचा पराभव झाला, आणखी पलीकडे स्टालिनग्राडची लढाई जर्मनीच्या विरोधात गेली आणि ब्रिटिश सत्ता सावरली. पण हे अद्यापि अंधारात दडलेले भविष्य होते.

ब्रिटनलाही नावे ठेवण्याचा येथे मुद्दा नाही. ते राष्ट्र जिद्द हारले नव्हते. सर्वस्व पणाला लावून लढत होते. चर्चिल हे त्यांच्या जिद्दीचे, आत्मविश्वासाचे, न खचलेल्या मनोधैर्याचे प्रतीक होते. पण त्यांच्या रणनीतीचा भाग म्हणून ते भारतातून माघार घेणार होते. तीही लोकांची पर्वा न करता. प्रदेश उद्ध्वस्त करीत, जेणेकरून जपानला मुसंडी मारणे अवघड जावे. तरीही आपण ब्रिटिशांवर अवलंबून राहण्याची मानसिकता, पारतंत्र्याची मानसिकता टिकवून धरावयाची? ब्रिटिशांची भक्कम सत्ता केंद्रात आहे आणि लोकलढा आपण करीत आहोत असे चित्र गृहीत धरता येणार नाही हे गांधींच्या लक्षात आले असले पाहिजे. केंद्रीय नेतृत्व, त्याचे आदेश, त्याचे मार्गदर्शन व नियंत्रण हे त्या स्थितीत शक्य होईलच असे नाही. लोकांना जिथे तिथे स्वतःवर भरवसा ठेवायला लागणार आहे, निर्णय करावा लागणार आहे, कृती करावी लागणार आहे. आरंभ कोठून करावा?

१९९८ साली, मागे वळून, नंतरचा घडलेला इतिहास आरामात बसल्या खुर्चीत गृहीत धरून, गांधींची फार घाई झाली, असे म्हणायला आपण मोकळे आहोत. गांधींपर्यंत जी गोपनीय माहिती आली होती, जे आराखडे बनल्याचे कळले होते ते जर वास्तव होते असे ठरले तर, गांधी 'मोकळे' नव्हते ते प्रथम मान्य करायला हवे. ज्यांच्याशी आपला सत्याग्रही संघर्ष-संवाद चालू आहे तो प्रतिपक्षी – शत्रू नव्हे – जीवनमरणाच्या संकटात सापडलेला असताना लढा पुकारणे गांधींच्या रणनीतीत बसत नव्हते, ही गोष्ट दक्षिण आफ्रिकेतच स्पष्ट झालेली होती. वैयक्तिक सत्याग्रह या रणनीतीमधूनच आलेला निर्णय होता. हेच गांधी विवेक हरवून बसले, आणि हिंसा-अहिंसेचा विवेकही गमावून लढ्याची हाक देण्यास पुढे आले हे खरे नाही. ब्रिटिश एकतर्फी माघार घेणार म्हटल्यावर संदर्भ बदलले.

तर, आरंभ कोठून या प्रश्नाचे गांधींचे उत्तर असे आले : आपणच ब्रिटिशांना सांगायचे की 'भारत छोडो', कारण नाही तरी तुम्ही सोडायची तयारी चालविलीच आहे. तुम्हांला तुमची फिकीर आहे. आम्हांला आमची केली पाहिजे. तुमचे राज्य आहे असे आम्ही मानायचे सोडत आहोत. आम्ही स्वतंत्र आहोत. 'करेंगे या मरेंगे'. आमची चिंता वाहण्यासाठी तुम्ही आमच्यावर राज्य टिकवून आहात हे नाटक यापुढे नको. 'मायबाप सरकार' असे आम्ही तुम्हांला आजपर्यंत म्हणत आलो. चूक आमचीच होती. आज आम्ही ती दुरुस्त करून घेत आहोत. कृपया भारत सोडा.

जर आपण लोकांना, आपापल्या ठिकाणी तुम्ही स्वतंत्र झालात असे समजून गोष्टी हातात घ्या, राज्य चालवा, असे सांगणार असलो तर, हे काही काँग्रेस संघटनेने चालविलेले, नेत्याच्या आदेश व मार्गदर्शनानुसार चालण्याचे बंधन असलेले, आंदोलन असणार नाही. लोकांनी वा कोणीच साध्य-साधन विवेक करण्याची गरज उरलेली नाही, वा तो करीत बसू नका, असे गांधी म्हणाले नाहीत. ती जबाबदारी सर्वोच्च अधिकारी नेता म्हणून एरवी गांधी पार पाडीत. या वेळी लोकांनी विवेक करावयाचा होता. काँग्रेसच्या नेत्या-कार्यकर्त्यांनी, 'आता हिंसा करायला गांधींनी मोकळीक दिलेली आहे' असा अर्थ करावयाचा नव्हता.

गांधींच्या भूमिकेतील बदलाची कारणे, गांधींचे युक्तिवाद, त्यांचे अर्थ याच्या खोलात तळवलकर जात नाहीत. वेचाळीसचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आंदोलन हिंसक वळणाचे झाले. आणि ते तसे व्हायला गांधींचीही हरकत नव्हती; गांधींनी हे आधीच स्पष्ट केले होते, असे ते सांगतात ते एक अर्धसत्य आहे. इतिहासकाराच्या तथाकथित निष्पक्ष, तटस्थ, वस्तुनिष्ठ भूमिकेमधून, गांधींच्या भूमिकेत वदल का झाला हे खोलात जाऊन समजून घेण्याची व त्यांच्या भूमिकेची चिकित्सा करण्याची गरजही त्यांना जाणवलेली दिसत नाही. त्यांना प्रश्नही पडलेले दिसत नाहीत.

पूर्वपक्ष म्हणून गांधींची भूमिका नीटपणे मांडून मग तो खोडून काढायला इतिहासकार मोकळा राहतोच. आणि गांधी जेवढे स्वतःच्या आंतरिक वैचारिक प्रक्रियेविषयी दस्तऐवज पुरवितात तेवढे क्वचितच कोणी पुरविले असतील; तेव्हा ती भूमिका मांडायला अडचणही नाही. पण हे तळवलकरांनी केले नाही, कारण त्यांच्या लेखी सत्तांतराच्या नाट्याच्या दृष्टीने ही एक तशी खरे तर उपेक्षणीय घटना झाली. (सहा एक महिन्यात एक डोकेदुखी या पलीकडे ब्रिटिशांच्या दृष्टीने आंदोलन फार गंभीर राहिले नाही ही गोष्ट खरीच.) अधिक आक्षेपार्ह गोष्ट अशी की, 'या वेळी हिंसा करा, आता माझा विचार वदललेला आहे' असे गांधींनी लोकांना सांगितले अशी समजूत व्हावी अशा पद्धतीने तळवलकर आढावा सादर करतात. तोही, एका ब्रिटिश न्यायमूर्तीच्या अहवालावर विसंवून राहून!

जपानचे सैन्य येथे चालून आलेच तर स्वतंत्र व निर्भय वृत्तीने त्यांनी नव्या आक्रमकांचा प्रतिकार करावा यासाठी लोकांच्या मनाची तयारी करण्यासाठी वेचाळीसचा लढा होता. जपानी येतील तर ब्रिटिश राजवट तिचा मुकावला करण्याचे पाहणारच आहे, या समजुतीत लोक राहता कामा नयेत; ब्रिटिश माघार घेणार असल्याने, लोकांनीच प्रतिकाराची सिद्धता करावयाची आहे, ही गांधींची भूमिका होती.

त्यांना त्यांच्या कल्पनेतला लढा उभारण्याची संधी मिळेल असे गांधींना कसे वाटले असा प्रश्न पडतो. पण ८ ऑगस्टची धरपकड, नंतरची निर्दय दडपणूक या गोष्टी गांधींना अनपेक्षित होत्या असे लक्षात येते. १८५७ चा उठाव जसा चिरडला तसाच १९४२ चा उठावही तितक्याच निर्घृणपणे चिरडला गेला. असे घडणे अटळ होते.

वेचाळीसच्या आंदोलनाचा जोर फार काळ टिकला नाही. काही थोडी क्षेत्रे सोडली तर. पण नेत्यांची सरसकट धरपकड व निष्ठुर दडपशाही यांना न जुमानताही लोकांनी कारभार स्वतःच्या हाती घेतला. या आंदोलनाची तुलना १८५७ च्या उठावाशीच होऊ शकते. हा आघात अनुभवल्यावर, 'जिंकलो, पण आपण हरलो' हे दूरदर्शी ब्रिटिश शास्त्यांनी ओळखले. सिंगापूरच्या पाडावानंतर सैनिकांनी केलेली गद्दारी – आझाद हिंद सेनेची स्थापना – यापासूनही त्यांनी वोध घेतलाच असणार.

वेचाळीसचे आंदोलन हिंसक झाले याची जवावदारी सरकारने गांधी व काँग्रेस यांच्यावर टाकली. याला प्रत्युत्तर म्हणून गांधींनी सरकारशी पत्रव्यवहार केला. याची चिकित्सा तळवलकरांनी केलेली नाही. भूमिगत राहून आंदोलन चालविणाऱ्या नेत्यांनी घातपाती कृत्यांवर भर दिला, कारण त्यांच्यापैकी वहुतेकांची गांधींच्या अहिंसेवर तशी निष्ठा नव्हती. काँग्रेसचे कार्यकर्ते जेथे जेथे लोकांचे मार्गदर्शन व नेतृत्व करतील तेथे भर घातपाती कृत्यांवर नसेल तर स्वायत्त स्वशासनावर असेल, ही गांधींची अपेक्षा पूर्ण झाली नाही. वेचाळीसच्या आंदोलनाची शोकांतिका, सरकारने निर्घृणपणे ते चिरडण्याचे ठरविल्यावर सहाआठ महिन्यांमध्ये त्याचे कंवरडे मोडले यात नाही. गांधी काय म्हणत आहेत, त्यांना काय अभिप्रेत आहे हे काँग्रेसच्या नेतृत्वाच्या विविध स्तरांवरील नेत्यांनीही जाणले नाही ही शोकांतिका आहे. माणसाला हिंस्रतेची शिकवण देण्याची गरज नसते; वासनाविकार हा त्याचा एक स्थायी स्वभावच आहे. वासना-विकारांवर कावू मिळवून नैतिक विवेकाने अहिंसक कृती करण्याची शिकवण मात्र मुरवावी लागते. १९२० नंतरच्या काळात या दिशेने लोकांची वाटचाल लक्षणीय प्रमाणात झाली होती. १९४२ साली ती आणखी एक पाऊल पुढे जाण्याऐवजी तिची धूप झाली. १९४६-४७ साली ज्या भीषण दंगली उत्तर भारतात झाल्या त्यांमध्ये या गोष्टीचे प्रत्यंतर आले असे म्हणता येते. मुस्लिम लीगने आरंभिलेल्या हिंसक 'डायरेक्ट ॲक्शन'च्या रणनीतीचा प्रतिवाद संघटित सुजाण अहिंसक विवेकी लोकशक्तीच्या आधारे काँग्रेस करू शकली नाही.

गांधींनी 'छोडो भारत' आंदोलन छेडलेच नसते तर बरे झाले असते का? १९४२ ते ४५ या काळात काँग्रेस निष्क्रिय राहिली असती तर त्याचे राजकीय परिणाम काय झाले असते? १९३९ साली राजिनामे न देता काँग्रेसची मंत्रिमंडळे सत्तेवर राहिली असती व त्यांनी ब्रिटिशांशी सहकार्य केले असते तर काय घडले असते?

वेचाळीसचे आंदोलन हा गांधींच्या 'सत्याच्या प्रयोगा'चाच भाग होता. प्रयोग कधी कधी अंगलटही येतो हे आपणांस

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

माहीत आहे. पण प्रत्येक प्रयोग आपणांस शिकवीत असतो. ४२ च्या आंदोलनाच्या प्रयोगाचे फलित काय – विधायक व नकारात्मक, दोन्ही अंगांनी? तळवलकर या प्रकारचे कोणतेच प्रश्न उपस्थित करीत नाहीत.

'स्वातंत्र्य की एकता?' या शेवटच्या प्रकरणाचे शीर्षक बोलके आहे. भारत उपखंडाची एकता अभंग राहावी याचा आपण आग्रह राखला असता तर स्वातंत्र्यास आपण मुकलो असतो – जिना व मुस्लिम लीग यांनी आपल्या पायात कायम बेड्या ठोकल्या असत्या – असे सुचविलेले आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेतृत्वही बव्हंशी याच निष्कर्षावर येऊन पोचले की, भारताची एकता अभंग राखण्याच्या आग्रहापोटी खऱ्या अर्थाची एकता पण निर्माण होणार नाही व आपण कायम हातपाय बांधून घेऊ; त्यापेक्षा, फाळणीचा प्रस्ताव मान्य करावा व आपले स्वातंत्र्य संपादन करावे.

१९८३ सालानंतर फाळणीच्या विषयावर जे महत्त्वाचे ग्रंथ प्रसिद्ध झाले ते गोविंदरावांनी अभ्यासले आहेत. त्यांचा निष्कर्ष असा की, १९३७ साली उत्तर प्रदेशात नेहरूंनी प्रांतिक लीगी नेत्यांसोबत संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन केले असते तर फाळणी टळली असती हे म्हणणे खरे नाही. मुस्लिम नेत्यांच्या असमंजस मागण्या, ब्रिटिशांची 'फोडा नि राज्य टिकवा' ही नीती, आणि पाकिस्तानच्या मागणीभोवती मुस्लिम लोकमताचे संघटन करण्यात लीगच्या नेतृत्वाला आलेले यश या पार्श्वभूमीवर फाळणी अटळ बनली. फाळणीचा प्रस्ताव मान्य करण्यात नेहरू-पटेल आदी काँग्रेसच्या नेतृत्वाने राजकीय शहाणपणा व दूरदर्शी दृष्टी प्रकट केली. गोविंदरावांचा हा निवाडा आहे. आणि सामान्यतः आज सर्वांना मान्य असलेला हा निवाडा आहे.

काँग्रेस महासमितीच्या त्या निर्णायक बैठकीत गांधींनी काँग्रेसच्या नेत्यांच्या फाळणीच्या स्वीकाराला मान्यता देण्याचा सल्ला दिला, आणि स्वतःचा पराभव व हतबलता यांची कबुली दिली. याबेळपावेतो काँग्रेसच्या नेतृत्वाने गांधींना नाकारले होते; त्यांना एकाकी पाडले होते. "सत्तांतर व फाळणी यांच्या संबंधात म. गांधी, पं. नेहरू व काँग्रेसनेते यांची भूमिका एक होती" असे तळवलकरांनी म्हटले आहे ते बरोबर नाही.

गांधींची समज-उमज अशी की, हिंदू-मुस्लिम ऐक्य उत्पन्न झाले, अस्पृश्यता मिटली, जातपातीचा प्रभाव नष्ट झाला तरच हा देश व समाज खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार आहे. एकता आणि स्वतंत्रता यांच्यात त्यांच्या दृष्टीने अभेद होता. पण एकता ही मुस्लिम वा अन्य कोणत्याही समाजावर लादून साध्य करावयाची वा टिकवावयाची गोष्ट नाही हे त्यांना मान्यच होते. एक असलेल्या भारतीय समाजात ब्रिटिशांनी अनेक फुटीरपणाच्या पाचरी ठोकून ठेवल्या होत्या; किंवा असे म्हणा की, भारतीय समाजातील दुभंग रेषा लक्षात घेऊन त्यांनी कौशल्याने त्यांच्या आधारे फूट पाडलेली होती. वेगळे घर करण्याची मागणी करण्याचा मुसलमानांचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य केल्यावर, देश अखंड राखून स्वातंत्र्य कसे हस्तगत करावयाचे हे आव्हान उपस्थित झाले.

या देशाच्या एकतेला ब्रिटिशांची कधीच बांधिलकी नव्हती. हा देश कधी एक नव्हता, व भविष्यात आमचे राज्य नसेल तेव्हा एक राहू शकणार नाही; कारण, परस्परांशी न जुळणाऱ्या समूहांचा मिळून तो बनलेला आहे, ही तर ब्रिटिशांची भूमिका होती. प्रामाणिक व मतलबी हितसंबंधी, दोन्ही. एकतेचा आग्रह सोडावा, काँग्रेसने आपण हिंदू संघटना आहोत हे स्वीकारून वाटाघाटी करण्याचा समंजसपणा दाखवावा, संस्थानांचाही मुद्दा उपस्थित करू नये यासाठी ब्रिटिश मुत्सद्दी काँग्रेसच्या नेत्यांचे मन वळवीत होतेच. १९४२ नंतर जास्तच आवर्जून त्यांचा हा प्रयत्न राहिला.

१९४० नंतरच्या काळात, ब्रिटिशांना बाजूला ठेवून आपापसात लीग व काँग्रेसने भावी व्यवस्था ठरवावी यासाठी गांधींनी अथक प्रयत्न केले. धर्मांतराने येथील मुस्लिमांचे वेगळे राष्ट्र झालेले नाही; हिंदू व मुस्लिम मिळून एकच राष्ट्र आहे, हे जिनांनी मान्य केल्यास मार्ग काढता येईल अशी गांधींनी आशा बाळगली होती. पण जिनांनी धर्म व संस्कृती यामुळेच ही दोन वेगळी राष्ट्रे पडतात हे म्हणणे सोडण्यास नकार दिला. ही भूमिका घट्ट लावून धरूनच, अल्पसंख्य असूनही ब्रिटिशांच्या हातून आपण मुस्लिम समाजाच्या पदरात काही प्रांतांमध्ये कायम सत्ता, केंद्रात ५० टक्के सत्ता व व्हेटोचा सार्वत्रिक अधिकार, व उर्वरित प्रांतांमध्ये सत्तेत प्रमाणापेक्षा जास्त वाटा मिळवून घेऊ शकतो, कारण काहीही करून काँग्रेसला नमविणे हे ब्रिटिश सत्तेचे एक मुख्य उद्दिष्ट आहे, हे जिनांनी ओळखले होते. ब्रिटिश शास्त्यांपैकी बहुतेकांच्या मनात व भारतातील व ब्रिटिश प्रशासन यंत्रणेतील बव्हंश अधिकाऱ्यांच्या मनात काँग्रेसविषयीची ही खुन्नस रोमरोमात भिनलेली होती याकडे तळवलकर पूर्ण काणाडोळा करतात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जिनांनी हे पुरते व पक्के जाणले होते की, त्यांचे लक्ष्य साध्य व्हावयाचे तर ब्रिटिशांच्या हातूनच सत्तांतर व्हावयास हवे.

न्यायबुद्धी, लोकशाही निष्ठा, उदात्त तत्त्वांना बांधिलकी यापोटी सत्तांतराची वाटाघाट आपण करीत आहोत असे ब्रिटिशांनी भासविले जरूर. तसा दावाही अनेकानेक ब्रिटिश लेखकांनी केला आहे. तळवलकरांचेही मत असेच आहे हे स्पष्ट आहे. पण वर्षानुवर्षे काँग्रेसच्या संदर्भात दुष्टबुद्धीने व कुटिल राजनैतिक डावपेचांसह केलेली अन्याय्य व अविवेकी वर्तणूक न सोडता, स्वतःच्या अपराधांची कबुली न देता केलेल्या या वाटाघाटी होत्या. स्वतःच्या अविवेकी, मतलबी वागण्यामधून निर्माण झालेल्या गुंत्यातून नामुष्की न होऊ देता पळ कसा काढावा याचा विचारच अखेरीस प्रभावी होता.

देशाचे तुकडे करावयाचे तर ते आमचे आम्ही स्वतंत्र झाल्यावर करू, तो अधिकार तुमचा नाही; तुम्हांला सत्ता सोडायची म्हणता ना, सोडून जा, ही गांधींची भूमिका. गांधींनी एका वेळी असेही म्हटले की, सर्व सत्ता मुस्लिम लीग व जिना यांच्या हाती सोपवून जा, पण एकदाचे जा; आमच्या भविष्याची चिंता तुम्ही करू नका. अर्थातच, जिनांना हा प्रस्ताव मंजूर नव्हता. ब्रिटिशांच्या उपस्थितीत व प्रभुत्वाखाली काँग्रेसने संमत केलेल्या करारानुसार त्यांना वाटा हवा होता, कारण अन्य कोठल्याही प्रकारे तो मिळण्याची खात्री नव्हती. पण प्रश्न असा पडतो की, काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाने, अगतिक होऊन नव्हे तर, जिना व लीग यांची कशी जिरवली म्हणत, विजय खेचून आणलाय या वृत्तीने, आणि उर्वरित भारतात तरी आता आपण स्वातंत्र्य संपादन केले आहे या आत्मगौरवाच्या भावनेने सत्तांतराच्या प्रस्तावाला होकार कसा दिला? फाळणीचा प्रस्ताव स्वीकारण्यात आपले पूर्ण सत्त्वहरण होत आहे, स्वातंत्र्य नव्हे तर सत्तेचे दान स्वीकारून आपण आपले पुरते अवमूल्यन करून घेत आहोत हे कसे लक्षात आले नाही? गांधींशी या मुद्यावरून प्रतारणा करण्याइतके या नेत्यांचे मनोधैर्य खचले होते असे म्हणावे, की लॉर्ड माऊंटबॅटन यांनी मोठ्या कौशल्याने बुद्धिभेद केला असे म्हणावे? जिनांना जे पाकिस्तान हवे होते ते त्यांच्या पदरात न टाकण्याच्या रूपात माऊंटबॅटन यांनी आपली बाजू घेतली असे काँग्रेस नेत्यांना वाटले हे नक्की. गांधी असमंजस, अव्यवहार्य स्वरूपाची आदर्शवादी भूमिका टोकापर्यंत ताणत आहेत, या वाटाघाटींमधून त्यांना वगळणेच शहाणपणाचे होईल, अशा निष्कर्षावर येण्यास माऊंटबॅटन यांची हुशारी व मुत्सद्दीपण सहाय्यभूत झाले.

मुद्दा असा की गांधी व अन्य काँग्रेस नेते यांच्या भूमिकेत १९४६ सालीच मोठे अंतर पडले होते, याची दखल तळवलकर घेत नाहीत. नेहरू, पटेल आदी नेत्यांची भूमिका व्यवहारी व विवेकी होती असा गोविंदरावांचा निवाडा असण्याबद्दल तक्रार नाही. गांधींची वेगळी भूमिका होती, आणि काँग्रेसच्या नेतृत्वाने आपणाशी द्रोह केला हे गांधींचे मत बनले याची दखल त्यांनी घ्यायला हवी होती.

गांधींचा दारुण पराभव झाला. 'प्राण देईन पण फाळणीला आडवा येईन' हे त्यांचे शब्द गिळून, फाळणीचे पाप त्यांना आपल्या शिरावर घ्यावे लागले. कारण हे पाप त्यांच्या शिष्योत्तमांच्या/निकटच्या सहकाऱ्यांच्या हातून घडले होते. आपल्या तत्त्वांना व मूल्यांना एकनिष्ठ राहून पुन्हा जेव्हा हिंमत परत येईल तेव्हा स्वातंत्र्यासाठी लढण्याचा अधिकार कायमचा गमावून, सत्तेचा सौदा पटवून घेऊन नेहरू-पटेल आदींनी १९२० सालापासूनच्या साऱ्या लढ्यांमध्ये केलेली कमाई व्यर्थ ठरविली. दुधाची तहान ताकावर भागवली इतकेच नाही तर, ताकालाच दूध म्हटले. गांधींच्या मते एकताही गमावली आणि स्वातंत्र्याचाही सौदा केला. याचा पुरावा हवाच असला तर तो गोविंदरावांच्या पुस्तकाच्या शीर्षकाच्या स्वरूपातच समोर आहे. १९८३ साली त्यांनी 'सत्तांतर' हे शीर्षक निवडून आपणा सर्वांना मान खाली घालायला लावली. पण, सत्तांतर घडले ही वस्तुस्थितीच होती, व याचे स्मरण करून देण्याबद्दल गोविंदरावांना दोष देणे योग्य नाही.

सत्तांतर खंड ३ साठी निवडलेला आकृतिबंध आणि त्याअंतर्गत त्यांनी लिहिलेल्या नऊ प्रकरणांपैकी काहींचा विस्ताराने परामर्श घेतला. घटनात्मक बदलांचे, 'सुधारणां'चे मुख्य नाट्य घडत असताना देशात आणखीही जे जे काही घडत होते त्यातले महत्त्वाचे असे सगळे तळवलकरांनी टिपले आहे असे म्हणता येत नाही. उदाहरणार्थ, येथील उद्योजकांनी आधुनिक उद्योगांची येथे उभारणी केली तीही एक स्वातंत्र्यलढ्याचाच भाग होती, कारण त्यांनाही ब्रिटिश औद्योगिक व व्यापारी हितसंबंधांच्या विरोधावर मात करावी लागली.

ते असो. या पुस्तकातील लेखनाच्या दोन मर्यादा जास्त मोठ्या व डाचणाऱ्या आहेत. गोविंदराव प्रसंगी अखंडित वाचीत असतात असा त्यांचा रास्त लौकिक आहे. पण हे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वाचनच एक विशेष दुबळेपण निर्माण करीत असावे. या पुस्तकातल्या लेखनाचे स्वरूप वव्हंशी संकलनात्मक आहे.

अभ्यासपूर्ण व विश्वसनीय ग्रंथ कोणते ते एकदा ठरवले की काम सोपे होते. चिकित्सक दृष्टीने नव्याने प्रश्न उपस्थित करण्याचे कारण उरत नाही, स्वतंत्रपणे विवेचन-विश्लेपण करावे लागत नाही. आपल्याला भावणारे, पटणारे इतर कोणी कोणी काढलेले निष्कर्ष सादर करून काम भागते. गोविंदरावांकडून पुष्कळ जास्त अपेक्षा होती. जे शेवटी घडले त्या घटनांचे संकलित कथन म्हणजे यथार्थ, वस्तुनिष्ठ इतिहास अशी गोविंदरावांची इतिहासाची कल्पना असली तर मोठीच गफलत आहे असे म्हणावे लागेल. *सत्तांतर* ३ऱ्या खंडाचे वाचन नीरस, कंटाळवाणे होते. जी कारणमीमांसा व निष्कर्ष वाचावयास मिळतात ते अन्य कोणाचे तरी, अचिकित्सक वृत्तीने, गोविंदराव स्वीकारीत आहेत अशी छाप मनावर उमटते.

गोविंदरावांचा भरवसा व भिस्त इंग्रजी ग्रंथांवर असल्याचेही लक्षात येते. त्यांनी दिलेल्या 'निवडक संदर्भग्रंथां'च्या यादीत फक्त तीन मराठी भाषेतील ग्रंथ समाविष्ट आहेत. ज्या कालखंडाबद्दल ते लिहीत आहेत त्या कालखंडातील त्यांनी निवडलेल्या विषयांसंबंधी मराठी भाषेत कोणीच महत्त्वाचे लेखन केलेले नाही? जे तीन ग्रंथ त्यांच्या यादीत आढळतात ते पुढीलप्रमाणे : (१) गोदावरी परुळेकर : *जेव्हा माणूस जागा होतो*, (२) वि.दा. सावरकर : *माझी जन्मठेप*, आणि (३) *सार-संग्रह* : ('केसरी'च्या छोट्या फाइल्स) १९२९. त्यांना ज्या स्वरूपाचे पुस्तक लिहावयाचे होते ते लिहिण्यासाठी त्यांना मराठी भाषेतून या विषयांवर लिहिणाऱ्या कोणाचे लेखन वाचण्याची गरज नव्हती, आणि, पर्यायाने, वाचकांनाही सूचना अशा की, त्यांनीही मराठीतले वाङ्मय पाहिले नाही तरी चालेल.

प्रस्तावनेत तळवलकरांनी लिहिले आहे : "श्री. श्री.पु. भागवत यांनी पुस्तकाच्या लिखाणासंबंधी चर्चा केली व सूचना केल्या." मौज प्रकाशन गृहासाठी प्रकाशनार्थ हस्तलिखित निवडतात तेव्हा श्री.पु. अत्यंत बारकाईने व साक्षेपाने त्याचे चिकित्सक दृष्टिकोनातून वाचन करतात आणि संपादन करतात ही गोष्ट साऱ्या चोखंदळ मराठी वाचकांना परिचित आहे. विचारपूर्वक केलेला निवाडा म्हणून १९४७ साली जे घडले त्याला स्वातंत्र्य न म्हणता सत्तांतर म्हटले जात आहे; हा निवाडा गांधींच्या दृष्टिकोनामधून केलेला नाही तर तो ब्रिटिशांविषयीच्या गौरवाच्या भूमिकेतून केलेला आहे, ही गोष्ट श्री.पुं.च्या नजरेतून निसटली असणे शक्यच नाही. यावद्दल मतभेद असूनही, 'जे घडले त्याचा असाही अन्वय लावता येतो' अशी भूमिका घेऊन त्यांनी १९८३ साली *सत्तांतर*चे दोन खंड प्रसिद्ध केले असे असू शकते. पण हा एक विशिष्ट, संकुचित व आंशिक दृष्टिकोन आहे; तो विषयाला पूर्ण न्याय देत नाही, असे त्यांना वाटले नाही? सत्तांतराचे 'नाट्य' – १९८३ च्या मूळ द्विखंडी ग्रंथात ते नाट्य म्हणून सादर होत नाही ही गोष्ट वेगळी – सांगून झाले होते. तेव्हा, आणखी एक खंड लिहून गोष्ट पूर्ण करावयाची वात असेल तर, घटनात्मक सुधारणांशी समांतर चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याची गोष्टच सांगायला हवी; म्हणजे, या खंडांच्या लेखनाची दृष्टी स्वातंत्र्यलढ्यावर केंद्रित करणे गरजेचे होते. तसे आपण करीत आहोत असे आश्वासन एकीकडे तळवलकर देतात आणि दुसरीकडे आकृतिबंधच असा निवडतात आणि विषयाची हाताळणीही अशी करतात की, स्वातंत्र्यलढ्याचे समांतर नाट्य सादर होतच नाही. विस्कळीत स्वरूपात फुटकळ संकलित कथन हीच पद्धती राहते. ही गोष्ट श्री.पुं. ना खोलवर डाचली नाही? स्वातंत्र्यासाठी दीर्घ काळ लढा दिल्यावर, सामूहिक पुरुषार्थाचे एक मोठे पर्व (तळवलकरांचेच शब्द) घडल्यानंतर, ऐनवेळी काँग्रेसच्या नेतृत्वाने (अन्य राष्ट्रवादी पक्षांनीही) जिना व मुस्लिम लीगच्या दांडगाईच्या रक्तरंजित राजकारणापुढे कच खाऊन ब्रिटिशांच्या ओंजळीने सत्ता पदरात पाडून घेण्यात धन्यता मानली. म्हणजे, घडले ते सत्तांतरच हा निवाडा कायम ठेवून, स्वातंत्र्यलढ्याची ही करुण व केविलवाणी व आत्मवंचक अखेर ('not with a bang, but with a whimper') व्हावी यातले नाट्य हा *सत्तांतर* खंड ३ चा विषय असायला हवा, असे श्री.पुं.ना वाटले नाही का? गोविंदरावांशी त्यांनी चर्चा कशाची केली व सूचना कोणत्या केल्या? आणखी अनेक मराठी ग्रंथांची, लेखनाची दखल घ्यायला हवी, असे का नाही सुचवले? असे प्रश्न मनात उभे राहिले.

पुस्तकाच्या मलपृष्ठावरील मजकूर ज्या गौरवपूर्ण भाषेत पुस्तकाची व लेखकाची भलावण करतो ते वाचल्यावर तर प्रश्न अधिकच गडद व टोकदार होतात. 'तटस्थ इतिहासकाराच्या वस्तुनिष्ठ दृष्टी'चा नमुना म्हणून हा ग्रंथ सादर केला जावा ही चिंतेची बाब आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

PERFECT HOMES ... AT PERFECT LOCATIONS



SWAPNASHILP
Ganeshnagar, Off Karve Road
Luxurious 2 & 3 bedroom flats, Terrace flats & Row Houses
Facilities :
Swimming pool, Club House, Developed Garden & Children's play area etc.



TRINITY COURT
Koregaon Park
Luxurious 2 & 3 bedroom flats, Terrace flats & Duplex flats.
Facilities :
Swimming pool, Club House, developed garden & Children's play area etc.



GARNET RESIDENCY
Wanawadi,
Main Fatima Nagar Road.
Luxurious 2 & 3 bedroom flats, Terrace Flats & Duplex Flats.



GARDENIA
Opp. Viman Nagar
1,2 & 3 bedroom budget flats, Terrace flats & Pent houses

Projects approved for Finance by
HDFC, CITIBANK, GIC, LIC, CANFIN HOMES

READY POSSESSION FLATS
Sunshine Court - Kalyninagar
Chaitrangan - Kanchan Galli

NAIKNAVARE AND ASSOCIATES
PROMOTERS AND BUILDERS

Head Office : 1204/4 Ghole Road, Shivajinagar, Pune 411004 Phone : 91-212-323700 (4lines) Sales Phone : 91-212-321525 (2lines) Fax : 91-212-324286 *Website* : http://www.naiknavare.com. *Email* : sales@naiknavare.com
Mumbai : 1, Vidyabhuvan Society, 121, Keluskar Road, Above Gypsy Restaurant, Near Shivsena Bhavan, Shivaji Park, Dadar(W). Mumbai 400028 Phone : 91-22-4440621, 4440615 Fax : 91-22-4449414

Trikon/NNA/Nov. 97

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वैशिष्ट्यपूर्ण व खास ध्येय असलेला एक उद्योग समूह

शॉपिंग व कमर्शिअल कॉम्प्लेक्स 'रियाद', सौदी अरेबिया

दूरदृष्टीच्या, द्रष्ट्या व्यक्तीने, म्हणजेच श्री. बी. जी. शिर्के यांनी शिर्के-सिपोरेक्स उद्योग समूहाची स्थापना केली. जेव्हा त्याची सुरूवात केली तेव्हाच, त्यांनी या उद्योग समूहाच्या संपूर्ण ध्येयाची आखणी केलेली होती. स्थापत्य-बांधकाम शास्त्राचे संपूर्णतः औद्योगिकरण करून तंत्रज्ञानाच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट व किफायतशीर किंमत असलेल्या दर्जेदार उत्पादनांव्दारे देशाच्या इमारत बांधकाम साहित्याची (मटेरिअल्सची) गरज भागविणे हेच उद्दिष्ट होते.

आमचे मनुष्यबळ हीच आमची शक्ती :

आम्ही स्थापत्य शास्त्रज्ञ, अभियंते, रचनाकार, रासायनिक, तांत्रिक, व्यवस्थापन आणि वित्त या सारख्या विविध क्षेत्रातील व्यवसायिक व कामगार मिळून नऊ हजाराहून अधिक व्यक्तींची नेमणूक केलेली असून त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केली आहे. पुण्याजवळील मुंढवा येथील आमच्या ५३ एकराच्या प्लॉटमध्ये अत्याधुनिक संशोधन व विकासाच्या सोयी असलेले ९ अत्याधुनिक संपूर्ण सुसज्ज असे एकात्मिक कारखाने आहेत.

आमची वैशिष्ट्ये :

अत्याधुनिक पद्धतीने अति जलद गतीने, सर्वांना परवडण्याजोगी उच्च दर्जाची सर्व सोयी-सुविधा असलेली उपनगरे तयार करण्याचे आमचे ध्येय आहे. यासाठी आम्ही अशा मजबूत, त्वरीत उत्पादन करता येण्याजोग्या व परवडण्याजोग्या इमारत बांधकाम साहित्यांची अत्याधुनिक शास्त्र-तंत्राने निर्मिती करतो. बऱ्याच उत्पादनास भारतीय मानक संस्थेचा गुणवत्ता दर्जाप्रत ठरविण्याचा शिक्कामोर्तब आहे. तसेच बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. आय. एस. ओ. ९००१ व सिपोरेक्स इंडिया लि. आय. एस. ओ. ९००२ प्रमाणित कंपन्या आहेत. शिवाय सिपोरेक्स उत्पादनास भारतीय मानक संस्थेचा आय. एस. आय. शिक्कामोर्तब पण आहे. त्यामुळे आमची कामाची सर्वांगिण दर्जाप्रत, गती व किंमत सर्वांना परवडणारी असते. म्हणून देशात-परदेशात सर्वत्र आमच्या मालास मोठ्या प्रमाणावर मागणी आहे.

आमचे सहभाग :

आमचा स्वीडनच्या इंटरनॅशनेला सिपोरेक्स-अेबी, स्वीडन यांचेशी सहभाग आहे. तसेच आमच्या विविध उत्पादने व तंत्रज्ञानासाठी.

सेंट्रल ॲथलेटिक स्टेडियम श्री शिवछत्रपती क्रीडा नगरी, बालेवाडी, पुणे

अग्रगण्य कंपन्यांशी खालीलप्रमाणे तांत्रिक-सहकार्य आहे.
एल्बा, जर्मनी - ऑटोमेटिक वे-बॅचिंग व मिक्सिंग प्लॅन्टस, पोटेन एस.ए. फ्रान्स - टॉवर क्रेन्स (१ ते ५० टनांची क्षमता, उंची १०० मीटर्स पर्यंत), प्युराक स्वीडन - वेस्ट वॉटर ट्रीटमेन्ट प्लॅन्टस्, रीड सिस्टिमस्, यु. एस. ए. - प्रगत जीआयसी ग्रेन स्टोरेज सायलो सिस्टिमस्

आमचे मानाचे तुरे :

● स्थापत्य-बांधकाम शास्त्राचे संपूर्ण औद्योगिकरण ● प्रिफॅब साहित्य ● टर्नकी लंपसम-एक रकमी वट्ट ठेका पध्दती ● एकाच छताखाली आरंभापासून ते पूर्णत्वापर्यंतच्या सर्व महत्वाच्या सेवा ● आधुनिक धान्य साठवणूक व त्यांचे संरक्षण, हाताळणी इ. कोठारांची निर्मिती, उभारणी व स्थापना (इन्स्टॉलेशन) ● ३०० दिवसात क्रीडा नगरीचे बांधकाम-एक जागतीक विक्रम.

भविष्य-काळातील आमच्या योजना :

स्थापत्य व बांधकाम शास्त्राच्या औद्योगिकरणाचा सर्वत्र प्रसार-प्रचार. प्रत्येकास निवारा मिळवून देण्याचा प्रयत्न. भारतातील जंगले व नैसर्गिक साधन-संपत्तीचे रक्षण व पर्यावरणाचे संतुलन साधणे इ. इ. महत्वाच्या कामात कार्यरत असलेली शिर्के-सिपोरेक्स ही एक अग्रगण्य संस्था आहे. आमच्या तंत्रज्ञानाने व क्षमतेने गुणवत्तेत वस्तुनिष्ठ दर्जा राखणे हे आमचे ध्येय. उद्याच्या भारताचा एक अंगभूत व अविभाज्य घटक म्हणून नावारूपास येण्याच्या आशेने व आत्मविश्वासाने आम्ही मार्गप्रतिक्षा करीत आहोत.

DNV ACCREDITED BY THE DUTCH COUNCIL FOR CERTIFICATION Reg. No 34 ISO-9001 CERTIFICATED FIRM

SHIRKE शिर्के सिपोरेक्स उद्योग समूह SIPOREX

७२-७६, मुंढवा इंडस्ट्रिअल इस्टेट, पुणे : ४११ ०३६. फोन : ६७०१५१, ६७०७५५. फॅक्स : (०२१२) ६७१६१२, ६७०३१९
मुंबई : २६२४५७४/६७०३१९, २६२४८९४. बँगलोर : २२७७३६०, २२७७३६१. दिल्ली : ६४६४०७६, ६४६२३०८.
हैद्राबाद : ८४१७३८, ८४६५०८. नागपूर : ५३३५११.

DNV ACCREDITED BY THE DUTCH COUNCIL FOR CERTIFICATION Reg. No 34 ISO-9002 CERTIFICATED FIRM

हे मासिक श्री.ग. दीक्षित यांनी मुद्रा, ३८३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून मे.पुं. रेगे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई